


हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।
तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥

वर्ष ४० ] सप्टेंबर १९५५ [ अंक १

## संपादकीय समालोचन

**एक महत्त्वाचा उपक्रम :**—या वर्षारंभींच्या **परशुरामियनच्या** अंकापासून संपादक-समितीनें आपले नियतकालिकाविषयीं एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे, तो म्हणजे सर्व संपादकीय लिखाण मातृभाषेंतूनच करावयाचें. हें नियतकालिक १९१६ सालीं सुरू झालें. तेव्हांपासून संपादकीय मजकूर इंग्रजीमध्येंच लिहिला जात असे. आतां ही प्रथा बदलून तो मजकूर मातृभाषेंतूनच लिहिण्याचें धोरण संपादकसमितीनें स्वीकारलें आहे व तें काळाला अनुसरून योग्यच आहे असेंच कोणीहि म्हणेल.

**मराठी माध्यम :**—प्रादेशिक भाषांचें दैन्य दूर होण्याचीं चिन्हें सर्वत्र दिसत आहेत. आपल्या पुणें विद्यापीठानेंहि या वर्षापासून पहिल्या वर्षाचे विषय मराठींतून शिकविण्याची व प्रश्नोत्तरें मराठींतून लिहिण्याची मुभा विद्यार्थ्यांस दिली आहे. ही सवलत अर्थात् पुढील वर्षीं द्वितीय वर्षाचे विद्यार्थ्यांसहि मिळेल व इंग्रजीखेरीज सर्व विषय मराठींतून शिकण्याची सवलत मिळेल. आपल्या कॉलेजाचें धोरण या बाबतींत उदार व मातृभाषेला सर्वस्वीं पोषक असेंच आहे. प्राध्यापकांनींहि थोड्याच अवधींत मराठींतून आपापले विषय शिकविण्याची तयारी दाखविली. हा उपक्रम यशस्वी होत आहे. पहिल्या वर्षाच्या आर्ट्सच्या विद्यार्थ्यांचें ग्रहणशक्तीला आकलन

होण्याइतपत सर्व विषय हाताळले जात आहेत, असें विद्यार्थिमनाचा कानोसा घेतल्यास आढळून येईल.

शास्त्रीय विषयांचे बाबतींत मात्र विद्यार्थी प्रथम साशंक मनःस्थितींत होते, व कांहीं विद्यार्थ्यांनीं मराठींतून सर्व विषय शिकण्याची इच्छाहि दर्शविली. पण लगेच पुढील तांत्रिक शिक्षणक्रमाचा विचार मनांत येऊन, शेतकी, मेडिकल व इंजिनियरिंग अभ्यासक्रम घेण्याच्या दृष्टीनें त्या विद्यार्थ्यांनीं इंग्रजीचीच कास धरण्याचें ठरविलें. प्राध्यापकांनीं मात्र मराठींतून शिकविण्याची तयारी करून परिभाषा व इतर अडचणींना यशस्वी रीतीनें तोंड देण्याचें ठरविलें होतें. जोंपर्यंत केंद्र व राज्य सरकारांनीं या शिक्षणमाध्यमाचे बाबतींत, व चढाओढीचे परीक्षांबाबत निश्चित धोरण ठरवून असंदिग्ध स्वरूपांत लोकांपुढें मांडलें नाहीं, तोंपर्यंत हे विद्यार्थी इंग्रजी भाषेंतून शास्त्रीय विषय शिकून, वरच्या श्रेणींत पास होऊन, तांत्रिक शिक्षणसंस्थांमधून सुलभतेनें प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करणार हें उघड आहे. म्हणून शास्त्रशाखेकडे पहिल्या वर्षांत मातृभाषेंतून अभ्यासक्रम सुरू नसले तर तें मातृभाषेच्या अवहेलनेमुळें असें समजणें चुकीचें होईल.

**प्राध्यापकांची कामगिरी** :—वाङ्मय ( कला ) शाखेचे विषय हे शास्त्रीय विषयांइतके आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीवर अवलंबून नाहींत. त्यांचें मराठीकरण सोपें आहे व आपल्या महाविद्यालयानें त्याबाबतींत एक पाऊल पुढें टाकलें आहे. मुख्य प्रश्न पाठ्यपुस्तकांचा. या बाबतींत आपले प्राध्यापकवर्गानें स्पृहणीय कामगिरी केलेली आहे, हें खालील पहिल्या वर्षाकरितां लिहिलेल्या पुस्तकांचे व लेखकांचे नामावळींवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| प्राध्यापक केरकर | ( सहकार्यानें ) | कॉलेज जॉमेट्री |
| ,, गायधनी | ,, | प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास; रत्नावलि. |
| ,, सिरसीकर | ,, | नागरिक शास्त्रपरिचय. |
| ,, राजे | – | वनस्पति शास्त्रप्रवेश |
| ,, वाघ | – | भूगोल ( प्राकृतिक व प्रायोगिक ) छापत आहे. |
| ,, गद्रे | – | रघुवंश ( मराठी भाषांतरासहित ) |
| ,, सत्तिगिरी | – | इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांवरील मार्गदर्शिकांमध्यें दिलेले धड्यांचें मराठी सारांश व विवेचन. |

पुढच्या वर्षी द्वितीय वर्षाकरितां पाठ्यपुस्तकें लिहिण्याचें काम आपला प्राध्यापकवर्ग करीतच आहे. एकदां मराठी हें शिक्षणाचें माध्यम स्वीकारल्यानंतर तें पदवीपरीक्षेपर्यंत लागू करणें ओघानेंच येणार व त्याकरतांहि पाठ्यपुस्तकें तयार होऊं लागलीं आहेत. मुख्य अडचण आहे ती अशी कीं, पुणें विद्यापीठानें जरी विद्यार्थ्यांना मराठी माध्यमाची सवलत दिली असली, तरी या उपक्रमाचें यशापयश केन्द्रसरकार व राज्यसरकार यांचे धोरणावरच अवलंबून आहे.

**इंग्रजीचें ऋण** :—विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं इंग्रजी विद्येला वाघिणीची उपमा दिलेली आहे. तिच्या दुधावर जो पोसला तो लेंचापेंचा कधींच निपजूं नये. उत्साह, धैर्य, अश्लाघ्य कर्माचा तिरस्कार, स्वावलंबन, इत्यादि उदात्त गुण इंग्रजी भाषेंतील ग्रंथांच्या अध्ययनापासून उत्पन्न होणार आहेत, असें मराठी भाषेचे शिल्पकार व जाज्वल्य अभिमानी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनींच लिहून ठेवलें आहे. इंग्जी भाषेचें ऋण आपण कधींच विसरूं शकणार नाहीं. त्या परकीय भाषेनें आपणांस

इंग्रजीच नव्हे, तर सर्व पाश्चात्य वाङ्मयांतील रत्नांचें भांडार खुलें करून दिलें, पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाचीं भव्य दालनें उघडीं केलीं, नवीं राजकीय, सामाजिक ध्येयें आपणांपुढें ठेवलीं; व आज-तागायत विचार व कल्पना यांचे उत्तुंग शिखरावर नेऊन इंग्रजी भाषाच आपणास नवीं क्षितिजें दाखविण्याचें कार्य करीत आहे; तिनेंच शास्त्रीय दृष्टीचें दिव्यांजनहि प्राप्त करून दिलें आहे.

विचारवंतांना खेद वाटतो तो हा कीं, यापुढें पुढील पिढ्यांस हळूहळू ह्या इंग्रजी भाषेच्या किल्लीनें उघडणारे ज्ञानभांडागाराचे दरवाजे बंद होणार– या विषण्ण मनःस्थितीमध्यें सुद्धां आशेचे किरण डोकावतात कीं, आजपर्यंत इंग्रजीमधून शिकलेल्या वर्गानें पुढील पिढ्यांची आपलेवर आलेली जबाबदारी नीट ओळखून कर्तव्यतत्परतेनें ती पार पाडण्याचें ठरविल्यास, अद्यावत् पाश्चात्य ज्ञानविज्ञानाचा सतत ओघ चालू ठेवतां येईल, विविध कला व शास्त्रें यांची अद्यावत् माहिती इंग्रजीला पारख्या होत असलेल्या आपल्या समाजाला देतां येईल, व ही ज्ञान-परंपरा अखंड राखतां येईल. ही जबाबदारी विद्यापीठांची, तशीच साहित्यकर्त्यांची, शास्त्रकोविदांची, व प्रादेशिक भाषांचे पुरस्कर्त्यांची आहे.

तशीच दुसरी एक जबाबदारी साहित्य संस्थांची आहे, व यांत्रिक व जाहिरातबाजीच्या युगांत प्रकाशकांची व वर्तमानपत्रकर्त्यांची तर विशेष आहे. आपल्या मातृभाषेची आजची प्रकृति ओळखून तिला सुधारण्याचे प्रयत्न नेटानें केले पाहिजेत. इंग्रजी भाषेंतून घेतलेले कामचलाऊ शब्द व वाक्यप्रयोग आतांपर्यंत मानवले व पचले ते कायम ठेवून, घेडगुजरी, दुर्बोध भाषांतरित वाक्यप्रयोग करण्याचें निक्षून टाळलें पाहिजे. विशेषतः टीकावाङ्मयाचे क्षेत्रांत हा दोष फार जाणवतो. पण त्याचबरोबर शुद्धलेखन व अनुस्वार यांचेबाबत मतैक्य प्रस्थापित करून एकच पद्धत रूढ करणें, ही आजची मराठी भाषेच्या उन्नतीच्या दृष्टीनें महत्त्वाची गोष्ट आहे. व्याकरणशुद्ध बोलणें व लिहिणें हा विनोदाचा विषय होऊं पाहात आहे. 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' बहुजन समाजाची जी भाषा तीच मराठी भाषा, असा समज दृढावत आहे, व त्या तन्हेनेंच मराठीचा आविष्कार भाषणांतून व लिखाणांतून होत आहे. उच्च विचार असला, तरी तो शुद्ध उच्चारानें व सुगम भाषेमध्यें व्यक्त केल्यानें जास्ती परिणामकारक होतो, व त्या भाषेलाहि पुष्ट करतो, उन्नत करतो. दुर्बोध, पांडित्यपूर्ण लिखाण एका बाजूस व 'बहुजनहिताय' भोंगळ भाषा दुसऱ्या बाजूस, हीं दोन दिव्यें आपल्या भाषेपुढें आज आहेत. त्यांतून योग्य मार्ग कसा काढावा हाच आज साहित्यिक, साहित्य संस्था, वृत्तपत्रें व प्रकाशक यांनीं निकडीनें विचार करावयाचा आहे. नाहींतर इंग्रजी जाणत्यांनीं दुर्बोध भाषांतरें व रूपांतरें करून तीं मूलग्रंथ म्हणून मराठी वाचकांच्या गळीं उतरवावीं, व क्षणिक वाङ्मयकारांनीं वृत्तपत्रासारखें प्रभावी शस्त्र मा भाषेवरच चालवावें व भाषेचें खून पाडावे, हें भेसूर चित्र मराठी भाषेला• प्रादेशिक भाषांमध्यें मानाचें स्थान प्राप्त करून देण्याचे प्रयत्नांत सारखें भेडसावत राहणार.

केवळ विद्यापीठांचे शिक्षणक्रमांत मराठीमाध्यम सक्तीचें केल्यानेंच ही स्थिति सुधारणार नसून, त्याकरितां मराठी भाषाभिमानी सुशिक्षित वाचक, लेखक व साहित्य संस्था, प्रकाशक व वृत्तपत्रें यांनींच एकजुटीनें प्रयत्न केले पाहिजेत. यांत्रिक साधनांची सुलभता व नफेबाजीचें व्यापारी धोरण यांमुळें खपेल तें लिहावें, लिहवून घ्यावें, छापावें, अधिकृत शिक्कामोर्तब करून नेमून घ्यावें, या वाङ्मयक्षेत्रांत चाललेल्या धालमेलींत शुद्धाशुद्ध, सकस हिणकस, सुश्लिष्ट क्लिष्ट, हें तारतम्य सुचावें कसे? या बाबतींत श्री. श्री. ना. बनहट्टी यांचे मराठी भाषेवरील निबंध मुद्रक-प्रकाशकांस मार्गदर्शक

आहेत. शुद्ध छापण्याविषयींचा त्यांचा कटाक्ष आपल्या भाषेला उपकारकच ठरेल. महाविद्यालयें व पुणें विद्यापीठ मराठी भाषेची सेवा पवित्र कार्य म्हणून करावयास सुसज्ज होत आहेत. पण साहित्याशीं निकट संबंध असलेल्या इतरेजनांनीं उच्च ध्येयानें प्रेरित होऊन मायभाषेला समृद्ध व सर्वांगसुंदर करण्याचा चंग बांधला तरच विद्यापीठाचे प्रयत्न सफळ होतील.

**गुणगौरव:**—प्रा. डॉ. वाळिंबे यांस गेल्या वर्षी 'ज्ञानेश्वरींतील विदग्ध रसवृत्ति' या प्रबंधाबद्दल पुणें विद्यापीठानें 'पीएच्., डी.' पदवी देऊन, नव्या दृष्टिकोनांतून ज्ञानेश्वरीच्या वाङ्मयीन गुणांचें समालोचन करणाऱ्या त्यांच्या विद्वत्तेचा व अभ्यासू वृत्तीचा गौरव केला. या वर्षी मध्यप्रदेश शासनसाहित्यपरिषदेनें १९५०-१९५४ या चार वर्षांतील समालोचनात्मक वाङ्मयासाठीं ठेवलेलें, पंधराशें रुपयांचें, अखिल भारतीय पारितोषिक डॉ. वाळिंबे यांना देऊन त्यांचा सन्मान केला. ऑगस्ट १५ रोजीं नागपुरास भरलेल्या खास सत्कारसमारंभाचें डॉ. वाळिंबे यांस निमंत्रण देऊन, शासन साहित्य परिषदेनें त्यांना मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री पंडित रविशंकर शुक्ल यांचे हस्तें पारितोषिक अर्पण केलें. नागपूरसारख्या राजधानीचे नगरींत, विद्वज्जनांचे उपस्थितींत, मुख्य मंत्र्याकडून गौरवपूर्ण शब्दांनीं झालेला सन्मान हा डॉ. वाळिंबे यांचा तर व्यक्तिशः सन्मान आहेच, परंतु तो अखिल महाराष्ट्राचा सन्मान आहे. महाराष्ट्रांतील साहित्यसंस्थांना तर ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे. डॉ. वाळिंबे यांना प्रसिद्ध विदर्भसाहित्यमंदिरानें निमंत्रण देऊन 'प्राचीन भारतीयांची नाट्यदृष्टि' या विषयावर त्यांचीं दोन व्याख्यानें करविलीं. आपल्या महाविद्यालयाच्या एका प्राध्यापकाचा अशा तऱ्हेनें मोठ्या प्रमाणावर सरकारीरीत्या गौरव झाल्याबद्दल डॉ. वाळिंबे यांचेबद्दल त्यांचे सर्व सहकाऱ्यांस अभिमान वाटावा यांत नवल नाहीं. प्राध्यापकांनी त्यांचा 'कॉमनरूम' तर्फे योग्य सत्कार केला. त्यांच्या साहित्यसेवेचें योग्य चीज झाल्याबद्दल डॉ. वाळिंबे यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यांचे हातून अशीच मराठी साहित्यक्षेत्रांत भरीव कामगिरी होवो, अशी इच्छा प्रकट करतों.

आपल्या महाविद्यालयांतील 'प्रथम वर्ष कला, ब' या तुकडींतील विद्यार्थी श्री. गोपाळ विनायक प्रभुणे यानें गेल्या कार्तिकी एकादशीच्या दिवशीं साताऱ्यानजीक माहुलीस कृष्णा नदीचे पुरांत बुडत असलेल्या दोघां मुलांना आपला जीव धोक्यांत घालून मोठ्या धाडसानें वांचविलें. या शौर्याबद्दल त्याला साताऱ्याच्या डी. एस्. पी. नीं वीस रुपये बक्षिस देऊन शिवाय प्रशस्तिपत्रहि दिलें, साताऱ्याच्या रोटरी क्लबनेंहि त्यांस पदक देऊन गौरविलें, व नाशिक जिल्ह्याचें 'वीर बापूराव गायधनी' हें पारितोषिक त्यास मिळाल्याचें जाहीर झालें आहे. श्री. प्रभुणे याचें वय केवळ १८ वर्षांचें आहे. तो पोहोण्यांत तरबेज आहे. पण इतक्या लहान वयांत साहसी वृत्ति, व दुसऱ्याचा जीव वांचविण्याची परोपकारबुद्धि व प्रसंगावधान हे दुर्मिळ गुण त्याचेमध्यें प्रकट झालेले आहेत. श्री. प्रभुणे याने दाखविलेल्या शूर वृत्तीबद्दल आम्ही त्याचें अभिनंदन करतों.

**यवत येथील डी. एल्. डी. कॅम्प:**—खेडेगांवांतून मलेरियाचें उच्चाटन करण्यासाठीं, मुंबई सरकारतर्फे कॉलेज विद्यार्थ्यांच्या सहकार्यानें खेडेगांवांतून डी. डी. टी. मारण्याचा कार्यक्रम या वर्षी दि. १७ ते २४ जुलै असा ७ दिवसांचा झाला. आपल्या कॉलेजमधून ३४ विद्यार्थ्यांनीं या कार्यक्रमांत भाग घेतला. या विद्यार्थ्यांपैकीं कांहीं पिंपळवाडीला व इतर यवतचे कॅंपला उपस्थित होते. त्यांची नांवें, प्रथमवर्ष (वाङ्मयशाखा):— एम्. बी. तांबे, आर. जी. गोडसे, एम्. बी. पाटणकर

एस्. सी. गोखले, एम्. के. गोडबोले, एस्. डी. देशमुख, व्ही. एस्. देशपांडे, ए. टी. तांदळे, एम्. एम्. खेडकर, बी. बी. चव्हाण, व्ही. आर. भेलके, बी. एस्. गायकवाड, ए. एम्. जगताप. प्रथमवर्ष (शास्त्रशाखा) :— डब्ल्यू. के. धुले, जी. व्ही. पुराणिक, एस्. जे. इनामदार, ए. वाय. लेले, एस्. व्ही. बापट, पी. आर. भट, एस्. ए. पोतनीस, बी. एल्. ओक. द्वितीय वर्ष (वाङ्मयशाखा) :— एम्. पी. बाबळे, आर. व्ही. दंडवते, पी. व्ही. शेटे. द्वितीय वर्ष (शास्त्र) : — एम्. व्ही. कोल्हटकर, तृतीय व चतुर्थ वर्ष (वाङ्मय) :— श्री. बी. डी. आगलावे, पी. के. गारतकर, ए. आर. जोशी, एम् जी. आठवले, एम्. बसवय्या, व्ही. एन्. भावे, पी. जी. जोशी, एस्. के. नातू. व चतुर्थ वर्ष (शास्त्र) :—एस्. एम्. कृष्ण. या विद्यार्थ्यांचें नेतृत्व प्रा. वाघ, श्री. दि. के. देशपांडे, व श्री. द. व्यं. दाणी, या अध्यापकांनीं केलें. १६६२८ लोकसंख्या असलेल्या सुमारें १३ खेडेगांवांतून विद्यार्थ्यांनीं २५८३ घरांतून ३२२ पौंड डी. एल्. डी. (डॅलड्रीन) पावडर मारली. समाजसेवेचा हा एक पाठच होता असें म्हणावयास हरकत नाहीं. खेडेगांवांतील प्रत्येक घरांतून प्रवेश होत असल्यामुळें विद्यार्थ्यांना खेडुतांची राहणी, आचार-विचार, लोकसमजुती व खेड्यांतील जीवन जवळून पहावयास मिळालें. सर्व विद्यार्थ्यांनीं अत्यंत उत्साहानें भाग घेतल्याबद्दल व श्री. वाघ, श्री. देशपांडे व श्री. दाणी यांनीं योग्य मार्गदर्शन करून, आपल्यावर टाकलेली जबाबदारी व्यवस्थित पार पाडल्याबद्दल आम्ही या सर्वांचें अभिनंदन करतों.

**उद्‌घाटन-समारंभ :— वादविवाद मंडळाचें** उद्‌घाटन १४ जुलै रोजीं रमाबाई हॉलमध्यें खासदार श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांचे हस्तें झालें. प्रा. हुल्याळकर यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. याप्रसंगीं श्री. काकासाहेब म्हणाले, वक्तृत्वकलेचें महत्त्व आजच्या लोकशाहीच्या काळांत वर्तमानपत्राइतकें आहे. शब्दाची मोठी प्रभावी शक्ति आहे. ती इतकी कीं शब्दावर राष्ट्रें झुलतात व विलयासहि जातात. वादविवाद, चर्चा करण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीस आहे. पण बाष्कळ बोलणें म्हणजे वक्तृत्व नव्हे. ज्ञान हा वक्तृत्वाचा पाया आहे. सर्वांना समजेल असा मोठा आशय थोडक्यांत सांगणें ही कला आहे, व ती या लोकशाहीच्या काळांत फार उपयुक्त आहे. वक्तृत्व हें शास्त्रहि आहे व तें अनुभवांतून संपादन केलें पाहिजे व समाजशास्त्र, अर्थशास्त्र, संघटनाशास्त्र, या शास्त्रांच्या अभ्यासाची त्याला जोड हवी. 'जो बोलेल त्याचें राज्य; जागेल तो जगेल' हा आजचा मंत्र आहे आपण आपल्या देशाला जगविलें पाहिजे. वाचनानें प्रगल्भत्व येतें, लेखनानें सखोलत्व येतें व भाषणानें हजरजबाबीपणा येतो. उद्यांच्या सार्वजनिक जीवनांत वक्तृत्वाला प्राधान्य असल्यामुळें, तरुण विद्यार्थ्यांनीं बौद्धिक भांडवल आजपासून जमवावयास हवें. वक्तृत्व कलेच्या विकासाकरतांच हें वादविवाद मंडळ आहे. त्याचा भरपूर उपयोग करून घ्यावा अशी शेवटीं श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं विद्यार्थ्यांस सूचना केली. श्री. गाडगीळ यांनीं अधिकारवाणीनें केलेलें विषयाचें प्रतिपादन, रोचक शैली, व खोचक विनोद, यांमुळें नुसतें मार्गदर्शकच नव्हे, तर सभा जिंकणाऱ्या वक्तृत्वाचा एक नमुना म्हणूनहि श्रोत्यांचे मनावर ठसलें.

**कला मंडळ** -- या वर्षी कला मंडळाची स्थापना करण्यांत आली आहे. नाट्य, फोटोग्राफी, चित्रकला, भरतकाम वगैरे कलांची आवड विद्यार्थ्यांमध्यें निर्माण करून त्यांच्या उपजत कलाप्रवृत्तींना उत्तेजन देणें, हा या कलामंडळाचा मुख्य उद्देश आहे. या मंडळातर्फे या वर्षी

नाट्यप्रयोग, व्याख्यानें, मनोरंजक कार्यक्रम व कलावस्तूंचें प्रदर्शन, हीं कामें होतील. कलाविषयक ग्रंथालय व संग्रहालय, रंगपट ( Green Room ) व रंगभूमि सजावट हीं कायम स्वरूपाचीं कामेंहि सुरू होतील. या कलामंडळाचे अध्यक्ष प्राचार्य भिडे असून, प्रा. भावे, प्रा. हुल्याळकर व प्रा. मालेगांवकर हे उपाध्यक्ष, प्रा. राजे, व प्रा. भुपटकर हे कार्याधिकारी आहेत.

अध्ययनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांस कलामंडळाचे कार्यक्रमामध्यें भाग घेतां येणार नाहीं, असा निर्बंध कलामंडळानें घातलेला आहे. यंदा दिल्ली येथें भरणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन युवकमहोत्सवामध्यें होणाऱ्या स्पर्धांमध्यें भाग घेण्याची तयारी या कलामंडळाकडून कसोशीनें चालूं आहे व त्याची रंगीत तालीम १५ सप्टेंबर रोजीं विविध कार्यक्रमांचे रूपानें झाली.

कलामंडळाचा हा पहिला कार्यक्रम प्रा. भुपटकर व प्रा. राजे, यांचे मार्गदर्शनामुळें उत्तम वठला. गायन, वादन, नृत्य या कार्यक्रमांखेरीज लोकनृत्याचा मुलींचा कार्यक्रम बहारीचा झाला. शिवाय पर्जन्य कुंड ही रेडियो श्रुतिका, व 'नया जमाना' ही एकांकिका करून विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनीं आपल्या ठिकाणीं वसत असलेले सुप्त गुण प्रकट केले. कलामंडळाची सुरुवात मोठी आशादायक आहे. दिल्लीस भरणाऱ्या येत्या 'यूथफेस्टिव्हल' मध्यें कलामंडलाचे कलाकार सुयश मिळवितील अशी आम्ही आशा करतों.

या कलामंडळाचें उद्घाटन सुप्रसिद्ध नाट्यविशारद व नट श्री. पार्श्वनाथ आळतेकर यांनीं ११ जुलै रोजीं केलें. प्रो. भावे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. 'अभिनयांतील शिक्षणाचें स्थान' या विषयावर श्री. आळतेकर यांनीं पुढील विचार प्रकट केले. रंगभूमीचा ऱ्हास होण्याचें कारण नाट्यकला पद्धतशीरपणें शिकविली जात नाहीं. रंगभूमीचा पाया शिक्षण संस्थांमध्यें रुजला पाहिजे. भारताचें नाट्यशास्त्र या प्रमाणभूत ग्रंथाचें अध्यापन झालें पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रंगभूमीला चांगले दिवस आले आहेत. प्रचाराकरतां व करमणुकीकरतां सरकारनें ललित कलांकडे कृपादृष्टि वळविली आहे. व रंगभूमीला नवजीवन प्राप्त होत आहे. आतां शिक्षणसंस्थांमधून शिक्षण व अभिनय यांची सांगड व्हावयास हवी. केवळ नटालाच अभिनयाची गरज आहे असें नसून व्यवहारांतहि अभिनयाची गरज आहे. आवाजाचा चढउतार करण्यासाठीं आवाज कमावण्याचें शिक्षण घेतलें पाहिजे; व तें केवळ नाट्यकलेला उपकारक नसून, व्यवहारांत सुद्धां या स्वच्छ, स्पष्ट व गोड वाणीचा उपयोग करून घेतां येईल. अभिनयामध्यें भूमिकेशीं तादात्म्य पावण्याकरतां एकाग्रचित्त व्हावयास पाहिजे व याचाहि जसा स्टेजवर तसाच व्यवहारांत व अभ्यासांत उपयोग आहे. शब्दाचे मागे शक्ति, अर्थ, भावना आहेत, त्या प्रेक्षकांचे मनांवर बिंबविणें हें नटाचें काम आहे. पण याकरतां स्वर व नाद यांचें शास्त्रोक्त शिक्षण घेतलें पाहिजे. श्री आळतेकर यांनी आपलें व्याख्यानांत एकच प्याला व भाऊबंदकी या नाटकांतील स्वगतपर भाषणें, व केशवसुतांच्या स्फूर्ति व झपुर्झा या कविता, यांची शब्दोच्चाराचे आरोह अवरोहाचे दृष्टीनें प्रात्यक्षिकें करून दाखविलीं. कसलेल्या नाट्यविशारदाचे अनुभवाचे बोल ऐकत असतां, व नटाचा स्वरोच्चार कसा असावा व कसा नसावा हें प्रात्यक्षिक पहात असतां, अभिनयाच्या विविध अंगांचें शास्त्रोक्त शिक्षणाची आजच्या मराठी रंगभूमीच्या खालावलेल्या स्थितींत किती आवश्यकता आहे, हें दिसून आलें.

**मराठी वाङ्मय मंडळ** :—या मंडळाचें उद्घाटन श्री. गो. नि. दांडेकर यांनीं ता. २० जुलै रोजीं केलें. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे या वेळीं अध्यक्षस्थानीं होते. त्या वेळीं श्री. दांडेकर

म्हणाले कीं, साहित्यिक लोकांचे सुखदुःखाशीं समरस होतो. चांगल्या कथा अश्रूंतून निर्माण झाल्या आहेत. जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध आल्यावाचून, अनुभव घेतल्यावाचून जिवंत साहित्य निर्माण करतां येत नाहीं. सुखाचे मुखवटे लावून माणसें जीवन जगत असतात व दुःख लपवीत असतात. पण शांति हा जीवनाचा स्थायीभाव आहे व त्यावर उठणाऱ्या लाटा म्हणजेच सुख व दुःख. माणसाच्या जीवनाची मूळ भूमिका ज्ञानेश्वरीप्रमाणें शांतरसाची आहे व याला पोषक साहित्य निर्माण करणें साहित्यिकांचें काम आहे. श्री. दांडेकर हे एक कसलेले कादंबरीकार असल्यामुळें त्यांचें साहित्य व जीवन यांचे परस्परसंबंधाचे विचार श्रवणीय होते.

**लोकमान्य टिळक पुण्यतिथि** -- १ ऑगस्ट रोजीं लोकमान्य टिळक स्मारक ग्रंथालय व वादविवादमंडळातर्फे लोकमान्य टिळक पुण्यतिथि प्रो. हुल्याळकर यांचे अध्यक्षतेखालीं साजरी झाली. त्या समयीं डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचें वक्तृत्वपूर्ण व्याख्यान झालें. त्यांचे व्याख्यानाचा विषय 'लोकमान्य टिळक व जनता' हा होता. विषय नेहमीचाच, पण त्याची मांडणी तर्कशुद्ध, पण भावनांना उचंबळविणारी होती. चित्रकाराचे रंगकुंचल्यानें जसें चित्र हळू हळू साकार होऊं लागतें, त्याच कलात्मक पद्धतीनें डॉ. सहस्रबुद्धे यांनीं मुद्दे मांडीत मांडीत लोकमान्य टिळकांची प्रतिमा श्रोत्यांचे डोळ्यापुढे उभी केली. त्यांचे भाषणांतील मुद्दे असे. १८८० च्या सुमारास जर्मनी, इटली, जपान, चीन हीं राष्ट्रें संघटित झालीं. पण तीं सरंजामदार, भांडवलदार, लष्कर या शक्तींच्या आश्रयानें. लो. टिळकांनीं हें जाणलें की आतां या शक्ती जीर्ण झाल्या आहेत. जनता या प्रभावी शक्तीचा आश्रय केला पाहिजे. ती लोकशक्ति जागृत करण्यासाठीं त्यांनीं १८८० ते १९२० हीं चाळीस वर्षे प्रयत्न केले. 'लोक' शब्दाची त्यांची व्याप्ति मोठी होती. अखिल जनता, शेतकरी, कामकरी, अस्पृश्य, दलित, सर्व जनता एवढा लोक शब्दाचा त्यांचा अर्थ होता. यांचें राज्य तें स्वराज्य असें ते म्हणत. ही शक्ति जागृत करण्यासाठीं लो. टिळकांनीं कायद्याच्या कक्षेंतील उपाय व कायदेभंग या दोन्हींचा अवलंब करण्याचें ठरविलें. १८९२ सालापासून दुष्काळ, सर्व्हेसेटलमेंट इत्यादि बाबतींतील अन्यायाची जाणीव शेतकऱ्यांना देऊन त्यांना ब्रिटिशसत्तेशीं लढा करण्यासाठीं ते प्रेरणा देऊं लागले. १९०५ सालापासून लोकमान्य कायदेभंगाचा उपदेश करूं लागले. बहिष्कार योग हें त्यांच्या चळवळीचें नांव. कायदेभंग, करबंदी या सर्वांचा त्यांत समावेश होतो. या लोकजागृतीच्या जोरावरच महात्मा गांधींनीं टिळकांचे महाप्रयाणानंतर ब्रिटिश सरकारशीं लढा देण्याचें ठरवून असहकाराची चळवळ सुरू केली. म. गांधींच्या चळवळीला भरभक्कम अधिष्ठान लोकमान्यांनींच तयार करून ठेवलें होतें.

१५ ऑगस्ट रोजीं **स्वातंत्र्यदिन** थाटानें साजरा होऊन प्रा. भावे यांचें विद्यार्थ्यांस उद्देशून भाषण झालें. तसेंच १० सप्टेंबर रोजीं **हुतात्मा दाते स्मृतिदिन** प्रा. हुल्याळकर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला.

**कॉलेज वृत्त** :--या वर्षी हजेरीपटावर नांव दाखल करण्याचे मुदतींत एकंदर २१६५ विद्यार्थी होते. यांतील पहिल्या व दुसऱ्या वर्षाकरतां कला व विज्ञान शाखांकडे १५०६ व पदवी परीक्षेकरतां ६५९ विद्यार्थी आहेत. गेल्या वर्षीपेक्षां जवळजवळ ३०० विद्यार्थी अधिक आहेत.

**परीक्षांचे निकाल** :--या वर्षी परीक्षांचे निकाल समाधानकारक आहेत. इंटर आर्ट्सचे परीक्षेचा ५०.०८ टक्के निकाल लागला व श्री. म. रा. कोल्हटकर पहिल्या वर्गांत आला. इंटर सायन्स परीक्षेंत निकाल ५८ टक्के व ३० विद्यार्थी पहिल्या वर्गांत आले. त्यांचीं नांवें :—

पी. जी. देसाई, एम्. पी. आगाशे, एम्. डी. आपटे, ए. डी. बाळ, एस्. व्ही. भागवत, व्ही. व्ही. भिडे, एस्. डी. भोगळे, एस्. आर. दामले, एस्. व्ही. देवधर, के. डी. देशपांडे, बी. एस्. एकबोटे, व्ही. एल्. गद्रे, व्ही. आर. गद्रे, व्ही. जी. गोखले, एस्. व्ही. हर्डीकर, एन्. के हुल्याळकर, एस्. व्ही. जोशी, एम्. व्ही. कवठेकर, ए. एम्. मालेगांवकर, व्ही. व्ही. साठे, बी. एन्. वाळिंबे, पी. व्ही. साने, वाय. बी. तळवलकर, व्ही. सी. बापट, ए. पी. देशपांडे, कु. कुमद एस्. केळकर, एस्. एस्. कुलकर्णी, एस्. एम्. कुळकर्णी, कु. मोहिनी परांजपे, पी. टी. चौधरी.

बी. एस्सी. ( जनरल ) ६८·७ टक्के उत्तीर्ण झाले व श्री. ए. आर. पेंडसे पहिल्या वर्गांत आले.

बी. ए. (स्पेशल) ८५ टक्के उत्तीर्ण. तिघे पहिल्या वर्गांत :--( १ ) कु. नलिनी पराडकर ( २ ) श्री. वसंत गोविंद दिवेकर, गणित विषयांत एकटेच प्रथम वर्गांत व सर्व उमेद॰ वारांमध्यें तिसरे ( एकूण बेरजेमध्यें ) ( ३ ) कु. उषा अकोलकर, व ६८ दुसऱ्या वर्गांत.

बी. ए. ( जनरल ) ५६ टक्के उत्तीर्ण. दुसऱ्या वर्गांत ७. बी. ए. ( स्पेशल ) परीक्षेमध्यें कु. नलिनी पराडकर ही पहिल्या वर्गांत पहिली आली. वासुदेव गोविंद आपटे शिष्यवृत्ति व प्राचार्य र. दा. करमरकर पारितोषिक व गुरुवर्य महर्षि कर्वे पारितोषिक हीं मिळविण्याचा मान कु. पराडकरला मिळाला आहे.

तसेंच इंटर आर्टसचे परीक्षेमध्यें श्री. नरसिंह शेषाद्रि कुलकर्णी यांस लोकमान्य टिळक संस्कृत शिष्यवृत्ति, विष्णु दाजी साने संस्कृत पारितोषिक, व नारायणराव नगरकर शिष्यवृत्ति मिळाल्याचें विद्यापीठानें जाहीर केलें आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यांच्या पुढील अभ्यासक्रमामध्यें त्यांस सुयश चिंतितों.

**विद्यमान व माजी विद्यार्थ्यांचें सुयश :--** इंटरसायन्समधील विद्यार्थी व प्रा. भावे यांचा पुतण्या श्री. व्ही. वाय. भावे याची खडकवासल्याचे डिफेन्स ॲकॅडमीमध्यें जाइंट सर्व्हिसेस विंगमध्यें शिक्षण घेण्याकरतां व श्री. एस. डी. भिसे यांची डेहराडून येथें वैमानिक शिक्षणाकरतां निवड झाली आहे. श्री. जी. बी. नाडकर्णी बी. ए. (ऑनर्स) हे सिलेक्शन टेस्टमध्यें पहिले आले व ते डेहराडून येथील ॲकॅडमीमध्यें पुढील शिक्षणाकरतां रवाना झाले. श्री. श्री. स. रानडे हे १९४८ सालीं आपल्या कॉलेजमधून बी. एससी. झाले व १९५२ मध्यें पुणें विद्यापीठांत एम्. एससी. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिले आले. त्यांना स्मिथमुंट शिष्यवृत्ति व फुलब्राइट शिष्यवृत्ति मिळून ते वनस्पतिशास्त्रामध्यें संशोधन करून डॉक्टरेट मिळविण्याकरतां येल युनिव्हर्सिटी ( U. S. A. ) मध्यें दाखल झाले आहेत. श्री. चि. वि. वडगांवकर बी. एससी. हे टेक्स्टाइल इंजिनियरिंगच्या विशेष अभ्यासासाठीं मँचेस्टर येथें नुकतेच रवाना झाले. या सर्व विद्यमान व माजी विद्यार्थ्यांचें आम्ही अभिनंदन करतों व त्यांचे पुढील अभ्यासक्रमांत त्यांना उत्कृष्ट यश मिळून ते स्वतंत्र भारताचे एकनिष्ठ सेवक होवोत असें चिंतितों.

## इंटर सायन्सच्या परीक्षेमधील प्रथमश्रेणीचे कांहीं मानकरी

[ पहिल्या वर्गांत एकूण ३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ]



एम्. पी. आगाशे

★



व्ही. आर. गद्रे



ए. पी. देशपांडे



एम्. डी. आपटे



एन. के. हुलयाळकर



पी. टी. चौधरी

★



एस्. व्ही. हर्डीकर



**व्ही. जी. दिवेकर**
बी. ए. ( स्पेशल ) गणितामध्यें
एकमेव पहिल्या श्रेणींत
आले.



**एन्. एस्. कुलकर्णी**
यांना इंटर आर्टसच्या परीक्षेमध्यें
संस्कृतमध्यें पहिले आल्या-
बद्दल शिष्यवृत्त्या व एक
पारितोषिक मिळालें.



**एम्. आर. कोल्हटकर**
इंटर आर्ट्स परीक्षेमध्यें
प्रथमश्रेणींत



**श्री. गो. वि. प्रभुणे,**
एफ्. वाय. आर्ट्स. यांना
वीर बापू गायधनी
पारितोषिक मिळालें

**साहाय्यनिधि**:—गरीब विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाकरतां आर्थिक मदत देण्याचे हेतूने 'पुअर बॉइज फंड' गेल्या वर्षी उभारण्यांत आला. आतांपर्यंत ८९२ रुपये रोख जमा झाले आहेत. आपल्या साप्ताहिक करमणुकीकरतां जितक्या सढळ हातानें विद्यार्थी खर्च करतात, त्याच प्रमाणांत त्यांनीं या सत्कार्याला मदत करण्याचें ठरविलें, तर त्यांनीं आपल्या कॉलेज-जीवनाचें सार्थक केलें असें म्हणतां येईल व विद्यार्जनाकरतां धडपडणाऱ्या, पण केवळ आर्थिक मदतीचे अभावीं मध्येंच शिक्षणास रामराम ठोकण्याची पाळी आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणदान केल्याचें त्यांना श्रेय मिळेल.

गोवे विमोचन साहाय्यक समितीकडे मुलींच्या वसतिगृहामधील विद्यार्थिनींनीं करमणुकीचे कार्यक्रम करून, व मुलांचे वसतिगृहामधील विद्यार्थ्यांचे सहकार्यानें जवळजवळ ८०० रुपयांची रक्कम पाठविली आहे; हातीं घेतलेलें काम तडीस नेण्याचें व्रत आमच्या विद्यार्थिनी पाळीत आहेत ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

**प्राध्यापक वर्ग**:--वर्षारंभीं प्राचार्य भिडे एकाएकी आजारी झाले. वैद्यकीय उपायांनीं त्यांना बरें वाटूं लागलें. पण वैद्यकीय सल्ल्यामुळेंच त्यांना रजेवर जाणें भाग पडलें. प्रा. भावे व प्रा. हुल्याळकर यांनीं प्राचार्य भिडे यांचे गैरहजेरींत सर्व कामांची धुरा आपले अंगावर घेऊन, कॉलेजचें कामकाज व्यवस्थितपणानें सुरू केलें. अर्थात् त्यांना व सर्व प्राध्यापक वर्गाला प्राचार्य भिडे यांचे प्रकृतीविषयीं काळजी वाटणें साहजिक होतें, व त्यांचे गैरहजेरींत कॉलेज वातावरणांत तितकीशी प्रसन्नताहि नव्हती. परंतु लिहिण्यास आनंद वाटतो कीं, प्राचार्य भिडे आतां पूर्ण बरे झाले असून पूर्ववत् आपले कामावर रुजूं झाले आहेत.

प्राचार्य भिडे यांनीं प्राचार्यपदाचीं अधिकारसूत्रें हातीं घेतल्यापासून महत्त्वाच्या तीन योजना अमलांत आणल्या; त्या म्हणजे प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थ्यांकरतां 'ट्युटोरियल सिस्टिम,' वर्ग संघटना (क्लास ऑर्गनायझेशन) व पोहण्याचा तलाव. पैकीं पहिल्या दोन योजना या वर्षीहि चालू आहेत. ट्युटोरियल विभागाचे नियंत्रक म्हणून डॉ. परांजपे यांची नियुक्ति झाली असून ते मोठ्या शिस्तीनें व पद्धतशीरपणें ती योजना पार पाडीत आहेत. पोहोण्याचा तलाव पुरा होत आला असून पुढल्या सहामाहीमध्यें त्याचें उद्घाटन होण्याची शक्यता आहे.

प्रा. हुल्याळकर यांना विद्यापीठानें तत्त्वज्ञान विषयाच्या पीएच. डी. करतां संशोधन मार्गदर्शक Research Guide म्हणून मान्यता दिली आहे. तसेंच यंदा डिसेंबरमध्यें नागपूर येथें भरणाऱ्या तत्त्वज्ञान परिषदेमध्यें 'Should the state be secular ? या विषयावरील परिसंवादाकरतां (Symposium) त्यांना खास निमंत्रण आलें आहे. प्रा. मंगरूळकर यांची डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिटयूट या संशोधन संस्थेतर्फे भरविण्यांत आलेल्या (Linguistics) भाषाशास्त्राच्या वर्गाकरतां, फेलो म्हणून निवड झाली आहे. प्रा. काळे ह्यांची N. C. C. करतां अधिकारी म्हणून निवड होऊन ते लष्करी शिक्षणाकरतां तीन महिने बेळगांव येथें गेले होते. ते ऑगस्टमध्यें कामावर रुजूं झाले. त्यांचे रजेच्या मुदतींत श्री. कावळे यांनीं लेक्चरर म्हणून काम केलें. डॉ. सहस्रबुद्धे यांचे जागीं प्रा. देशपांडे यांची जिमखान्याचे व्हाइस प्रेसिडेंट म्हणून नियुक्ति झाली आहे व त्यांनीं उत्साहानें कामास सुरवात केली आहे. डॉ. सहस्रबुद्धे यांनीं पुन्हा स्वाध्याय सभा सुरू केली असून, दर गुरुवारच्या बैठकीमध्यें सुमारें ५५ विद्यार्थी व कांहीं प्राध्यापक यांचे उपस्थितींत 'आधुनिक-भारत' या आचार्य जावडेकर यांच्या ग्रंथाचें वाचन व चर्चा होत असते. डॉ. सहस्रबुद्धे यांनीं

विद्यार्थिवर्गाचे बुद्धीला व विचारांना चालना देण्याचें व्रत नेमानें व निष्ठेनें चालू ठेवलें आहे. त्यांनीं या वर्षी 'माझें चिंतन' हा निबंधसंग्रह प्रसिद्ध केला आहे. प्रा. सिरसीकर यांनीं बी. ए. चे विद्यार्थ्यांकरतां 'राज्यशास्त्र आणि शासनसंस्था' हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. प्रा. रा. म. गोखले हे पुणें येथें डिसेंबरमध्यें भरणाऱ्या भारतीय अर्थशास्त्र परिषद, व शेतकी अर्थ शास्त्रविषयक परिषद यांचे संयुक्त अधिवेशनाचे कार्यकारिणीचे एक सदस्य म्हणून निवडले गेले. फ्रेडरिक् शिलर या सुप्रसिद्ध जर्मन कवि व नाटककाराच्या १५० व्या मृत्युतिथीनिमित्त इंडोजर्मन कल्चरल सोसायटी व जर्मन कॉन्सुलेटतर्फे भरलेल्या मुंबईच्या खास समारंभास प्रा. चापेकर कॉलेजच्या वतीनें उपस्थित होते. त्यांनीं शिलरच्या बॅलड्स (लोकगीतें) यावर हि. हा. बडोद्याचे महाराज यांचे अध्यक्षतेखालीं एक निबंध वाचला. प्रा. आर. टी. कुळकर्णी यांची N. C. C. Armoured Squadron करतां अधिकारी म्हणून निवड होऊन ते चार महिन्यांचा लष्करी शिक्षणक्रम पुरा करून लवकरच परत येतील. प्रा. डी. व्ही. कुलकर्णी हे इंग्रजीच्या बोर्ड ऑफ स्टडीजचे सभासद म्हणून निवडून आले. प्रा. वाघ यांनीं गतवर्षीप्रमाणें या सहामाहींत लघुचित्रपट योजना अमलांत आणून, सांस्कृतिक व शैक्षणिक सहा चित्रपट प्रथमवर्ष (विज्ञान) ते बी. एस्सी. पर्यंतच्या विद्यार्थ्यांना श्री. के. ए. गोवंडे यांचे साहाय्यानें दाखविले. त्यामध्यें Tuberculosis, Atomic Energy, Sound recording and reproduction हे उत्कृष्ट चित्रपट होते.

अध्यापकांच्या नवीन नेमणुका :-श्री. एम्. आर्. राइलकर (एम्. एस्सी) मॅथ्स् व स्टॅटिस्टिक्स, श्री. एम्. व्ही. देशपांडे बी. एस्सी. (पहिला वर्ग) मॅथेमॅटिक्स, श्री. एस. आर. कावळे, एम्. ए. लॉजिक फिलॉसफी, श्री. व्ही. एम्. पारीख, एम्. एस्सी, केमिस्ट्री, श्री. आर. के. हुल्याळकर. एम्. एस्सी. केमिस्ट्री.

**आभार** :—संपादकीय कामांत साहाय्य केल्याबद्दल आम्ही संपादक-समिति व सहकारी प्राध्यापक यांचे आभारी आहों.

---

**शोचनीय मृत्यु** :— कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, सुप्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर रानडे (किवळेकर) यांचे घराण्यांतील श्री. **यशवंत विष्णु ऊर्फ काकासाहेब रानडे** यांस वयाचे ८३ व्या वर्षी रविवार ता. ३ जुलै रोजीं सकाळीं १० वाजतां देवाज्ञा झाली. कै. विष्णुपंत रानडे यांचे नंतर कै. काकासाहेब यांनीं वडिलार्जित कंत्राटाचा धंदा नेकीनें व धडाडीनें चालवून ओरिसा, ब्रह्मदेश, त्रावणकोर, कोचीन, त्रिचनापल्ली इत्यादि दूर दूरचे ठिकाणीं मोठमोठीं कामें पार पाडलीं व सर्वत्र लौकिक संपादन केला व आपल्या धंद्याची पत वाढवली, खूप संपत्ति मिळविली व तिचा विनियोगहि सत्कारणीं केला.

नूतन मराठी विद्यालयाचे मराठी शाळेंतील पहिल्या पंधरा विद्यार्थ्यांपैकीं ते एक होते. शि. प्र. मंडळीशीं आलेला हा संबंध पुढें जास्त निकट झाला व ते मंडळीच्या नियामकमंडळावर बरींच वर्षे सभासद होते. वडिलांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना धंदेशिक्षणाप्रीत्यर्थ आर्थिक मदत देण्याकरतां त्यांनीं एक ट्रस्ट करून तो मंडळीच्या स्वाधीन केला. त्याचा फायदा मंडळीनें चालविलेल्या महाविद्यालयांतील अनेक विद्यार्थ्यांनीं घेतला आहे.

कै. काकासाहेब वृत्तीनें सत्वशील व धार्मिक होते, पण त्यांत सनातनी दुरभिमान नव्हता व आधुनिक विचार व परदेशी खेळ यांच्याशीं ते सहज समरस होत असत. त्यांचा परिवार मोठा आहे व त्यांत मोठमोठे कर्तृत्ववान् पुरुष व स्त्रिया आहेत. त्या सर्वांच्या दुःखांत आम्ही सहभागी

आहों. कै. काकासाहेबांच्या निधनानिमित्त मंडळीच्या इतर संस्थांप्रमाणेंच आपलें महाविद्यालय सोमवार ४ जुलै रोजीं बंद ठेवण्यांत आलें होतें. ईश्वर कै. काकासाहेब यांचे आत्म्यास सद्गति देवो.

**कै. सदाशिव शिंदे**:—आपल्या महाविद्यालयाचे प्रथितयश माजी विद्यार्थी श्री. सदाशिव शिंदे यांना २२ जून रोजीं सायंकाळीं विषमज्वरानें मुंबई येथील इस्पितळांत तडकाफडकीं मृत्यु आला हें लिहिण्यास आम्हांस तीव्र दुःख होत आहे. कै. शिंदे हे आपले कॉलेजचे प्रसिद्ध क्रिकेटपटु. आपल्या क्रिकेट टीमचे कर्णधार म्हणून त्यांनीं आंतरमहाविद्यालयीन सामन्यांमधून दरवर्षी कॉलेजला अजिंक्यपद मिळवून दिलें. तसेंच आंतरविद्यापीठ सामन्यांत त्यांनीं आपल्या गोलंदाजीची चुणूक दाखविली. पहिल्यापासून प्रा. देवधर यांचे योग्य मार्गदर्शनानें त्यांच्या अंगचे गोलंदाजीचे गुण विकसित होऊं लागले व फसवे चेंडू टाकण्याचें तंत्र त्यांनीं आत्मसात् करून टाकलें.

१९४१ मध्यें महाराष्ट्रसंघाकडून ते मद्रासला रणजी करंडक सामन्यांत खेळले. १९४६ मध्यें व पुन्हा १९५२ मध्यें दोनदां त्यांची भारतीय क्रिकेट संघांत निवड होऊन ते इंग्लंडला गेले. भारतीय संघांतून ते ७ वेळां कसोटी सामन्यांत खेळले. त्यांपैकीं दिल्ली येथें त्यांची गुगली गोलंदाजी परिणामकारक ठरून त्यांनीं ९१ धावांत ६ खेळाडू बाद केले, हा त्यांच्या परिणामकारक गोलंदाजीचा उच्चांक होय. कै. शिंदे हें कॉलेजमधून बी. एस्सी., झाल्यावर बडोदे संस्थानांत व तें संस्थान विलीन झाल्यावर मुंबई सरकारच्या गृहखात्यामध्यें नोकरीस होते. महत्त्वाच्या सर्व प्रांतिक व राष्ट्रीय क्रिकेट सामन्यांत त्यांची निवड होत असे, व आपली जबाबदारी ओळखून, अंगचोरपणा न करतां, मोठ्या झुंजार वृत्तीनें आपली सर्वशक्ति व सर्व कौशल्य एकवटून गोलंदाजी करीत. त्यांचा प्रेमळ, दिलदार स्वभाव, त्यांची खिलाडू वृत्ति, यांमुळें त्यांनीं असंख्य स्नेही जोडले. तसेंच शिस्त, आज्ञाधारकपणा व कष्ट करण्याची तयारी ह्या दुर्मिळ गुणांमुळें त्यांनीं संघकर्णधाराचा व क्रिकेट नियामक मंडळाचा आदर संपादन केला. १४ वर्षें क्रिकेटचे खेळांत चमकून हा तारा एकाएकी अस्तंगत झाला. मृत्युसमयीं त्यांचें वय अवघें ३२ वर्षांचें होतें. त्यांच्या मातोश्री, पत्नी, मुलें व भाऊ यांचेवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या त्यांच्या दुःखांत आम्ही सहभागी आहों.

आम्ही कॉलेजच्या सर्व आजी व माजी विद्यार्थ्यांना अशी विनंती करतों कीं कै. शिंदे कुटुंबियांस मदत करण्याचे हेतूनें मुंबई व पुणें येथें श्री. विजय मर्चंट व प्रा. देवधर यांचे नेतृत्वाखालीं उभारण्यांत आलेल्या शिंदे स्मारकनिधीस त्यांनीं पवित्र कर्तव्य म्हणून सढळ हातानें मदत करावी. आपल्या जिमखान्यातर्फे कॉलेजांत देणगी स्वीकारण्यांत येईल.

**कै. गो. पु. रानडे**—१७ ऑगस्ट रोजीं आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी हे ४८ व्या वर्षी निधन पावले हें कळविण्यास वाईट वाटतें. नू. म. विद्यालयांत शिक्षण घेऊन ते आपले कॉलेजांत आले व १९३२ सालीं पदवीधर झाले. ते कॉलेजचे क्रिकेट सेक्रेटरी होते, व क्रिकेट व हॉकी व फुटबॉलमध्यें त्यांनीं प्रावीण्य संपादन केलें होतें. पुढें ते टाईम्स ऑफ इंडियासारख्या वर्तमानपत्रांतून क्रीडावृत्त लिहीत असत. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन व पी. वाय. सी. जिमखाना या संस्थांमध्यें ते प्रमुख कार्यकर्ते होते. क्रिकेट हॉकीचें शाळाकॉलेजांचे सामन्यांत पंच म्हणूनहि त्यांनीं काम केलें व कसोटी सामन्यांत स्कोअरर म्हणून त्यांची निवड झाली होती. क्रिडापटु असून शिवाय ते तज्ज्ञ टीकाकार होते. श्री. रानडे यांचे अकाली मृत्यूनें क्रीडाक्षेत्राची मोठी हानि झाली आहे. आम्ही कै. गो. पु. रानडे यांचे कुटुंबियांचें दुःखांत सहभागी आहों.

# स. प. कॉलेज जिमखाना

## अहवाल

आपल्या कॉलेजच्या जिमखान्याच्या कामास ह्या वर्षी मोठ्या उत्साहानें सुरवात झाली. गेली दोन वर्षे व्हाईस-प्रेसिडेंट असलेले डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे जागीं प्राध्यापक एस्. आर. देशपांडे यांची नेमणूक झाली आहे.

जिमखान्याच्या निवडणुका बुधवार दि. ६-९-५५ रोजीं घेण्यांत आल्या. एकूण मतदान पन्नास टक्क्याहून अधिक झालें. जिमखाना मॅनेजिंग कमिटीचे सभासद पुढीलप्रमाणें आहेत.

(१) प्रा. एस्. आर. देशपांडे Vice-President.
(२) श्री. बी. आर. जोशी Gymkhana Organizer.
(३) श्री. व्ही. एच्. गांगल General Secretary.
(४) ,, पी. आर. करमरकर Cricket ,,
(५) ,, एम्. जी. परांजपे Foot-ball ,,
(६) ,, ए. व्ही. राजवाडे Hockey ,,
(७) ,, डी. बी. इंदुले Tennis ,,
(८) ,, बी. डी. फाटक Indian games ,,
(९) ,, जे. जी. नलावडे Gymnasium ,,
(१०) ,, जे. एन्. आवटे Athletics & Acquatics Secretary.
(११) ,, एम्. एस्. सोमण Volley & Basketball ,,
(१२) ,, व्ही. आर. चांदोरकर Minor Games ,,
(१३) ,, एम्. एल. अभ्यंकर Students' Library & Reading Room ,,
(१४) ,, एम्. व्ही. नाटेकर L. T. M. & Debating Union ,,
(१५) मिस् पुष्पा राजमाचीकर Ladies' Sports ,,
(१६) मिस् नीला पटवर्धन Ladies' Ganeral ,,
(१७) मिस् शकुन्तला गद्रे Ladies' I. C. S. R. ,,
(१८) श्री. बी. बी. करंबेळकर Gents' I. C. S. R. ,,

जिमखाना मॅनेजिंग कमिटीच्या आतांपर्यंत पांच सभा झालेल्या आहेत. तसेच कोचेस् व स्टाफ-इन्-चार्ज ह्यांच्याहि दोन सभा घेण्यांत आलेल्या आहेत.

आपल्या बास्केट्-बॉल संघानें आंतरमहाविद्यालयीन "लीग" सामन्यांत प्रावीण्य मिळविलें आहे. आतांपर्यंत संपलेल्या आंतरमहाविद्यालयीन खेळांच्या सामन्यांत आपल्या कॉलेजनें हुतुतु, बास्केटबॉल कुस्ती व मुलींचे "रिंग टेनिस" व "थ्रो-बॉल" ह्यामध्यें पहिल्या क्रमांकाचें यश मिळविलें आहे. फूटबॉल, व्हॉलीबॉल व मुलींचा "सॉफ्ट-बॉल" ह्या सामन्यांत आपण "सेकंड-

## आंतरमहाविद्यालयीन सामने १९५५-५६




बॉस्केट बॉल - विजयी संघ



कुस्ती-विजयी संघ



मुलींचा थ्रोबॉल विजयी संघ



**एस् डी. भिसे**
यांची एन्. डी. ॲकॅडमीमध्यें
वैमानिक शिक्षणाकरतां
निवड झाली.



**जी. बी. नाडकर्णी**
यांची एन्. डी. ॲकॅडमी
(डेहराडून) मध्यें सैनिकी
शिक्षणाकरतां निवड झाली.



**एस्. एस्. रानडे**, बी. एस्सी.
वनस्पतीशास्त्राचे उच्च
संशोधनाकरितां अमेरिकेस
रवाना झाले.

बेस्ट " आहोंत. क्रिकेट व बॅडमिंटनमधें आतांपर्यंत आपण " फायनल्‌ "ला आहोंत. अशा तऱ्हेनें आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमधें आतांपर्यंत आपण पुष्कळ गुण मिळविलेले आहेत.

या वर्षी आपल्या कॉलेजमधें टेनिससाठीं नवीन तिसरें " कोर्ट " तयार करण्यांत आलें आहे व टेबल्‌-टेनिसची दोन नवीन टेबल्स्‌ विकत घेतलीं आहेत. मुलींच्या खेळांसाठीं नवीन स्वतंत्र क्रीडांगणें तयार करण्यांत आलीं आहेत, व त्यावर त्यांची प्रॅक्टिस जोरांत सुरू आहे.

जिमखान्यातर्फे कॉलेजमधें आतांपर्यंत दोन मोठे कार्यक्रम करण्यांत आले. गुरुवार दि० १४ जुलै १९५५ रोजीं श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या शुभ हस्तें आपल्या वक्तृत्वसभेचें उद्‌घाटन करण्यांत आलें व 'लोकमान्य टिळक मेमोरियल्‌ लायब्ररी'च्या वतीनें १ ऑगस्ट रोजीं डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचें " टिळक आणि जनता " या विषयावर उद्‌बोधक व्याख्यान झालें.

आपल्या कॉलेजचे P. T. Department ४ जुलै पासून व्यवस्थित सुरू असून नुकताच १५ ऑगस्ट रोजीं स्वातंत्र्यादिनाचे निमित्तानें त्या खात्याच्या विद्यमानें कवायतीचा आकर्षक कार्यक्रम करण्यांत आला. त्या खात्यातर्फे, श्री. बी. आर्‌. जोशी ह्यांच्या व्यवस्थेखालीं हुतुतु व खोखो ह्या खेळांचे तुकडीवार सामने घेण्यांत आले. एफ्‌. वाय्‌. सायन्स " ए " तुकडीनें हुतुतूमधें व एफ्‌. वाय्‌. आर्ट्‌स्‌ " बी " तुकडीनें खोखोमधें विजय मिळविला आहे. ह्या वर्षी आंतर-महाविद्यालयीन सामन्यांत भाग घेणाऱ्यांसाठीं, " Sports Batch " ची स्वतंत्र व्यवस्था करण्यांत आली आहे.

वि. ह. गांगल,
जनरल सेक्रेटरी

## विद्यार्थ्यांसाठीं श्रमदानाची योजना

पंचवार्षिक योजनेंत ग्रामविकास योजनांवर भर दिलेला आहे हें सर्वांना माहीत आहेच. या ग्रामविकास योजनांवर जो खर्च व्हावयाचा त्यांतील निम्मी रक्कम ग्रामीण जनतेनें स्वतःच्या श्रमाच्या रूपानें द्यावयाची व उरलेली रक्कम सरकारकडून खर्च होऊन त्या भागांतील सुखसोयी वाढवावयाच्या अशी ही योजना आहे. या योजनांत खेड्यांतील रस्ते सुधारणें, शाळा बांधणें, चावडी किंवा ग्रंथालयासाठीं इमारती बांधणें, सार्वजनिक उपयोगासाठीं विहिरी खोदणें, तळीं दुरुस्त करणें किंवा खणणें, त्याचप्रमाणें त्या गांवापासून जवळ जर एखादा मोठा रस्ता जात असेल तर त्या ठिकाणापर्यंत रस्ता तयार करणें इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. या योजनांत शहरांतील लोकांना विशेषतः विद्यार्थी वर्गाला भाग घेतां यावा म्हणून योजनेंत विशेष सोयी करून ठेवल्या आहेत. यांपैकीं एखाद्या योजनेंत जर विद्यार्थ्यांनीं भाग घेतला तर त्यांच्या श्रमदानाच्या मुदतींतील सर्व खर्च सरकारमार्फत होतो. त्याप्रमाणें त्यांच्या जाण्यायेण्याची व राहण्याची सर्व सोयहि सरकारतर्फे विनामूल्य होते. खर्च झाल्यास सरकारकडून परत मिळतो.

या योजनांत विद्यार्थ्यांनीं भाग घेतल्यास त्यांना शारीरिक श्रमाचें महत्त्व तर कळेलच परंतु ग्रामीण जनतेची राहणी, त्यांचे आचारविचार, त्यांच्या संवयी इत्यादि गोष्टींचा परिचय होऊन अनेक नवीन अनुभव येतील. पुढें पाठीमागें खेड्यांत राहण्याचा प्रसंग आला तर कठीण तर

वाटणार नाहींच परंतु त्या ठिकाणचें नेतृत्व घेतां येईल. याशिवाय नोकऱ्यांत प्रवेश मिळतांना सामाजिक कार्य केलेल्यांची प्रथम निवड होण्याची शक्यता दिसत आहे. या सर्व दृष्टीनें विचार करून विद्यार्थ्यांनीं यांत भाग घ्यावा असें सुचवावेसें वाटतें. विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें हा एक शिक्षणाचाच भाग आहे.

आपल्या कॉलेजतर्फे गेल्या जुलै महिन्यांत ३४ विद्यार्थ्यांनीं डी. डी. टी. स्प्रेइंग योजनेंत भाग घेऊन उत्कृष्ट काम करून दाखविलेलें आहे. यवत व जवळच्या १५-१६ खेड्यांत डी. डी. टी. चें द्रव मारून व शिबिरजीवनाचा अनुभव घेऊन पंचवार्षिक योजनेच्या पूर्ततेंत आपला हातभार लावलेला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत श्रमदानाला याहिपेक्षां जास्त वाव देऊन, योजनाकारांनीं विद्यार्थ्यांकडून सहकाराची अपेक्षा व्यक्त केली आहे. या वर्षी स्वाध्याय-सभेच्या वतीनें व आपल्या कॉलेजतर्फे आणखी एक नवीन योजना हातीं घेतली आहे. त्यांत जास्तींत जास्त मुलांनीं भाग घेऊन ती यशस्वी करावी अशी आग्रहाची सूचना आहे.

सासवडजवळील तीन मैलावरील 'कोडित' या गांवीं दिवाळी व उन्हाळ्याचे सुट्टींत आपल्या कॉलेजतर्फे जाऊन श्रमदानांत सहभागी व्हावयाचें आहे. सासवड ते कोडित हा तीन मैलांचा रस्ता श्रमदानानें तयार करावयाचा आहे. सरकारी मदत, कोडितमधील नागरीक व विद्यार्थी यांचें श्रमदान या त्रिवेणीसंगमांतून व सहकार्यांतून हा रस्ता तयार व्हावयाचा आहे. या कँपमधील राहण्याचा व इतर खर्च सरकारतर्फे दिला जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना यांत सहभागी व्हावयाचें असेल त्यांनी आपलीं नांवें माझ्याजवळ किंवा श्री. द. व्यं. दाणी यांचेजवळ नोंदवावींत. पुरेशा विद्यार्थिनी आल्यास त्यांचेसाठींहि एक योजना आहे. यासंबंधीं सविस्तर सूचना सूचनाफलकावर लावण्यांत येतील.

वि. के. देशपांडे.

# मराठी विभाग

## 'अज्ञात साहित्यसेवक शिलर'

लेखकः—**यशवन्त उपाध्ये**, ज्यू. बी. ए. ( जर्मन स्पेशल )

नागावलेल्या निष्णात सेनानायकांची जन्मभूमि म्हणून जर्मनीची ख्याति असेल; गेलीं शंभर सव्वाशें वर्षे जगज्जेत्या जर्मन राजेरजवाड्यांनीं सर्वत्र हलकल्लोळ उडविला असेल; पण या सर्वांहूनहि जर्मनांनीं केलेली अमोल वाङ्मयसेवा कधींहि कुणीहि विसरणार नाहीं. मृतवत् झालेल्या खण्डप्राय जर्मन राज्याला एकछत्री अंमलाखालीं आणण्याची, हा जर्मनी माझा आहे ही भावना जिवंत करण्याची कामगिरी ज्या थोर जर्मन साहित्यसेवकांनीं केली त्यांमध्यें गोएट् व शिलर ही जोडी अग्रगण्य होय. गोएट्पूर्वकालांत जर्मनी वाङ्मयाच्या क्षेत्रांत मागासलेला होता, त्याच्या वाङ्मयीन प्रगतीकडे कुणीहि ढुंकूनहि पहात नसे, पण गोएट् आणि शिलरच्या उदयामुळें तोच जर्मनी साहित्यदेवीच्या मुकुटांतील अग्रगण्य मणी झाला. एवंच आजच्या जर्मनीच्या घडणीला कारणीभूत झालेल्या जोहान खिस्तोफर फ्रेडरिक शिलर या सर्वमान्य कवीला मरण पावल्याला गेल्या ८ मेला १५० वर्षे पूर्ण झालीं. त्याची ही १५० वी पुण्यतिथि युरोप अमेरिकाभर मोठ्या थाटानें साजरी झाली. जगांतील साऱ्या ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यकोविदांनीं सरस्वतीच्या या थोर उपासकाला आपला मानाचा मुजरा केला. आपल्या पुणें विद्यापीठानेंहि सप्टेंबरमध्यें शिलर पुण्यतिथि साजरी केली. अशा थोरप्रतिभावान् साहित्यसेवकाच्या कार्याचें विवेचन पुढील कांहीं भागांत केलें आहे.

'टिळक–आगरकर' या दुकलीचें नांव घेतां क्षणींच चटकन् आपल्याला आधुनिक मराठी गद्याचा बोध होतो तद्वतच गोएट्–शिलर यांच्या नांवामुळें आजच्या जर्मन साहित्यसंभाराची कल्पना येते. गोएट्पूर्वकालांत जर्मनांची सर्वत्र पिछेहाट होती. मार्टिन ल्यूथर, ऑटोफॉनगेरिक, विल्यम दी कॉंकरर अशीं तुरळक जर्मन नांवें डोळ्यापुढून जात, पण यांपैकीं कुणीहि मनाची पकड घेत नसे. राजकारणामध्यें जर्मनी मागासलेला होता तर मग वाङ्मयाविषयीं कुणीं बोलावें ? सतराव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत जर्मन साहित्याला रंगरूपहि नव्हतें. लॅटीन व ग्रीक यांचें अध्ययन झाडून साऱ्या देशभर होई. होमर, सोफोक्लीज, सेनेका, इत्यादि दिवंगत प्राचीन साहित्यसेवकांचें अध्ययन केलें जाई. लॅटीनखेरीज इतर लोकभाषांमध्यें संभाषण करणें हा गुन्हा समजला जाई. गॉटिंजेन, हायडेलबेर्ग, बर्लिन इत्यादि विश्वविद्यालयांतील विद्वान प्राध्यापकहि

लोकभाषांचा द्वेष, तिरस्कार करीत; जर्मन भाषेमध्यें संभाषण करणें त्यांना कमीपणाचें वाटे. तर मग अशा परावलंबी जर्मनीमध्यें साहित्यसाधना घडणार तरी कशी? आणि ती घडविणारा द्रष्टा तरी कोण? लॅटिन व रोमन कॅथालिक चर्चच्या वर्चस्वाविरुद्ध बंड पुकारणारा युरोपांतील पहिला सुधारकाग्रणी म्हणजेच निर्भय मार्टिन ल्यूथर होय. " माझा मऱ्हाठाचि बोल कवतुकें। परि अमृतातेंहि पैजा जिंके " असा साधार गर्व करणाऱ्या ज्ञानेशाप्रमाणें मार्टिन ल्यूथर हा पराकोटींतला मानव होय. इहलोकांतील विरोधाची पर्वा न करतां मार्टिन ल्यूथरनें बायबलचें जर्मनमध्यें भाषांतर केलें. शिक्षणाचें माध्यम, आज आपण पाठपुरावा करतों तद्वत्, जर्मन असावें; लॅटिनचें पूर्ण उच्चाटन करावें व त्याची जागा जर्मन वाङ्मयानें क्रमशः घ्यावी अशी त्याची तळमळ होती. ल्यूथरच्या या चळवळीला भरघोस यश आलें असें म्हणावें लागेल. स्पेनॉर, गोटारील्ड, एंजेलस् सिलेसिस इत्यादि साहित्यकोविदांनीं ल्यूथरचें शिष्यत्व पत्करल्याकारणानें जर्मन साहित्यसाधनेला निराळें वळण लागलें. ह्या नंतरच्या काळांत इमानुएल कान्टच्या तर्कवादानें सर्व युरोपभर अधिसत्ता गाजविली. तत्त्वज्ञांचें माहेरघर समजल्या जाणाऱ्या फ्रान्समध्येंहि कान्टच्या तर्कवादाचा Rationalism चा प्रभाव फारच होता. प्राचीन रोम व ग्रीस हींच काय तें अप्रतिम साहित्य निर्माण करूं शकतात ह्या न्यूनगंडामुळें जर्मनसाहित्याचें फारच नुकसान झालें.

प्राचीन ग्रीस व रोम यांच्या वर्चस्वाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारणारे पहिले राष्ट्रसंत म्हणजे गोएट् व शिलर होत. यांपैकीं गोएट्चा जन्म १७४९ मध्ये म्हणजे शिलरच्यापूर्वी १० वर्षें आधीं झाला होता; आणि शिलरपेक्षा कांहीं बाबतींत त्याची (गोएट्ची) ध्येयदर्शी प्रतिभा वरचढ असल्याकारणानें तो श्रेष्ठच होय, पण या दोन मित्रांमध्यें फार साम्य तद्वत् भेद होता. पण गोएट् व शिलर या दोघांनीं मिळून युरोपिअन साहित्यगंगेला निराळीच कलाटणी दिली.

प्राचीन ग्रीक व रोमन प्रज्ञावंतांची नक्कल करणें गोएट्, शिलर यांना मुळींच मान्य नव्हतें. त्या दोघांनीं काव्याचें अंतरंग व बहिरंग पार बदललें. पूर्वीं प्राचीन साहित्यकोविदांच्या काव्याचें भाषांतर होई त्याच जर्मन काव्याला आतां जनतास्पर्शी होण्याची वेळ आली. सर्वसामान्य माणसाचे आनंदाचे प्रसंग, दुःखाचे प्रसंग हे काव्याचे विषय झाले. सर्वसामान्य माणूस जें चहातो, जें पाहतो तें काव्यामध्यें अवतीर्ण होऊं लागलें. लोकांच्या भावना, लोकांतील उदात्तता या काव्यामध्यें वास करूं लागल्या. 'Das schaudern ist der Menschheit bestes Teil' ही Faust मध्यें गोएट्नें आपल्या नव्या काव्यसंप्रदायाची व्याख्या केली आहे. ह्या नव्या काव्यसंप्रदायाचे प्रवर्तक शिलर व गोएट् होत, म्हणून शिलरहि याच तत्त्वाचा उपासक होता. गोएट् एका ठिकाणीं म्हणतो " Whatever gave me happiness or tormented me or in anyway occupied my thoughts, I transmuted into a picture, a poem and in this way made a final reckoning with it, both in order to give clear outlines to my ideas of external objects as well as to quiet my mind. All the things which I have published are but fragments of one long personal confession " (ज्यानीं ज्यांनीं माझ्या आयुष्यामध्यें प्रवेश केला त्यांना त्यांना वाङ्मयीन कलाकृतीमध्यें अमर करण्याचें काम मी करीत गेलों) या नव्या काव्यसंप्रदायामुळें साहित्यक्षेत्रांत अभूतपूर्व क्रान्ति झाली. या नव्या संप्रदायाचा इंग्लिश कवितेवरहि फार मोठ्या प्रमाणांत परिणाम

झाला. या कालखण्डांतील जर्मन कवितेचें विश्लेषण करूं लागलों तर क्षुल्लक विषयांतूनहि मोठा आशय बाहेर काढण्याची हातोटी या कविराजांना साधली होती असें म्हणणें सयुक्तिक होणार आहे. या नव्यानें उदयास येणाऱ्या संप्रदायानें जुन्या काव्यांतील उदात्ततेचा त्याग केला नाहीं. युरोपभर हिंडून जुन्या लोकवाङ्मयामध्यें विपुलशः आढळणाऱ्या कहाण्या, चुटके यांना आपल्या काव्यामध्यें काव्यविषय म्हणून स्थान दिलें. उदाहरणार्थ गोएट्च्या Erlkönig या लोकगीताची मध्यवर्ति कल्पना एका स्कॅंडिनेव्हीयन लोकगीतांतली आहे. शिलरच्या Die Burgscchaft ची कथा एका मध्ययुगीन कथेवरून घेतली आहे.

या शिलर संप्रदायामुळें जर्मन काव्य बहुतांशीं आत्मदर्शी ( ego-centric ) झालें. " My way as a poet was not to aim at the personification of some abstract idea. Impressions were made upon my heart, and my only duty as a poet was to round about and express them in an artistic way " — Goethe. [" कवि या नात्यानें मीं कधींहि अव्यक्त अमूर्त कल्पनांना व्यक्त केल्या नाहींत. माझ्या मनावर वारंवार ज्या प्रतिबिंबांनीं परिणाम घडविला जाई, की त्या स्मृतिचित्रांना काव्याच्या स्वरूपांत कसें आणावें एवढेंच मी पाही आणि मग त्यांना माझ्या साहित्यांत उतरवत असे. ] हीच या नव्या काव्यसंप्रदायाची काव्य कल्पना होती. काव्य जनतानुदर्शी असल्याविना त्या काव्याला कांहींहि मूल्य नाहीं. जें काव्य रस्त्यावरील भिकाऱ्याच्या मनामध्यें आपुलकी निर्माण करूं शकतें तेंच खरें काव्य. या काव्यखण्डाच्या पूर्वार्धांत म्हणजे इ. स. १७७४ ते १८०५ पर्यंत या दोघां ऋणानुबंधी मित्रांनीं आपापलीं काव्यें प्रसिद्ध करून या नव्या संप्रदायाला मूर्त स्वरूप दिलें. या पूर्वार्धांत त्यांनीं काव्य, लोकगीतें, नाट्य, गद्य अशा विविध मार्गांचा अवलंब करून आपल्या तत्त्वप्रणालीला लोकांपर्यंत नेऊन पोहोचवली. शिलर व गोएट् यांच्या संयुक्त प्रयत्नामुळें हा नवा संप्रदाय जर्मनींत रूढ झाला, इतकेंच नव्हें तर तो इतर भाषांमध्यें स्वतःला अनुयायी मिळवूं शकला.

' शिलरचा जन्म मारबाख येथें १७५९ सालीं झाला. स्टुटगार्टच्या प्रशालेमधून त्यानें वैद्यकीचें शिक्षण घेतलें. पदवीनंतर, १७८२ सालीं डॉक्टरेट मिळविल्यावर त्याचें मन त्या व्यवसायांत रमेना. त्याचा पिण्डच मुळीं साहित्यिकाचा असल्यामुळें तो Württenburg मधून चालता झाला. नंतर मान हाईम, लायप्झिग, ड्रेसडेन इत्यादि ठिकाणीं भटकेगिरी केल्यावर तो वायमारच्या आश्रयार्थ आला, पण १७८९ सालीं इतिहासाचा प्राध्यापक म्हणून ' येना ' विश्वविद्यालयांत त्याची नेमणूक झाली. मध्यंतरीं परत कांहीं काल तो इटलीमध्यें जाऊन आला. १७९९ पासून त्यानें वायमार राजदरबारीं कायमचा आश्रय घेतला. शिलरचें ऐहिक जीवन यातायातीचें होतें यांत संदेह नाहीं. पण त्यानें या इहलोकावर जी दिगन्त कीर्ति मिळविली ती मात्र• स्पृहणीय होय. Württenburg मधील वैद्यकीय चाकरीवर पाणी सोडल्यावर त्यानें स्वतःला साहित्यसेवेला वाहून घेतलें. गोएट् व शिलर या दोघां मित्रांनीं जो संप्रदाय पाडला होता त्याचें नेतृत्व शिलरकडे अप्रत्यक्षपणें आलें. त्यानें काव्य, नाटक, गद्य अशा अनेक क्षेत्रांत अनिर्बंधपणें स्वैरसंचार करून अफाट लोकप्रियता कमावली, पण त्याचबरोबर जर्मन साहित्याला युरोपीय साहित्याच्या अग्रभागीं नेऊन बसविलें.

' Maria sturt ' Die Jungfrau von Oleans हीं व अशीं एकाहून एक प्रभावी

नाटकें लिहून शिलरनें लेसिंगलाहि मागें टाकलें. Nathan der Weise लिहिणाऱ्या लेसिंगनें युरोपियन साहित्यांत अमाप क्रांति करून त्रिखंड कीर्ति मिळविली होती. त्याचें युरोपियन नाटककारांवरील वर्चस्व खरोखरच अवर्णनीय होतें. आजच्या नाटकाला आधुनिक स्वरूप देण्याचा यत्न खरोखरच जर कुणीं केला असेल तर लेसिंगनेंच होय. लेसिंगनें जर्मनीमधील साहित्यकोविदांना आपल्या Nathan der Weise या नाटकानें एक नवा आदर्श घालून दिला होता. आजपर्यंत जर्मन नाटकांतील पात्रें कृत्रिम असत, कथानकांत विसंगती असे, पात्रांच्या तोंडीं घातलेले अजोड बेडौल संवाद यामुळें प्रेक्षकांवर बराच ताण पडे; ह्या सर्व गैरसोईकडे पहिल्याप्रथम कुणीं लक्ष पुरविलें असेल तर लेसिंगनेंच होय. म्हणून आजच्या नाटकतंत्राचा आद्य पुरस्कर्ता निर्माता लेसिंग होय. लेसिंगच्या वर्चस्वाला आपल्या निर्दोष कलाकृतीनें शिलरनें सुरुंग लावला असें म्हणावें लागते. Nathan der Weise ची अमाप लोकप्रियता किंबहुना त्याहूनहि कित्येक पट लोकप्रियता शिलरच्या प्रत्येक नाटकाला मिळाली असें सर्वच टीकाकारांचें मत आहे.

Räuber हें शिलरचें पहिलें नाटक; शिलर पदवीधर होण्यापूर्वीच त्यानें हें नाटक लिहिलें. लेखकाची पहिली कलाकृति म्हणून त्या कलाकृतीमधील दोषस्थळांकडे दुर्लक्ष करण्याचा साहित्यटीकाकारांचा एक संकेत ठरून गेला आहे. त्यानुसार चिकित्साच करावयाची म्हटली तर शिलरच्या अनुपम नाट्यकृतीमध्यें दोष सहसा नाहींत. अद्वितीय स्वभावरेखन, पचनीं पडेल इतकाच ध्येयवाद, भविष्यकाळाविषयीं उज्ज्वल आशावाद हे शिलरच्या साहित्याचे विशेष गुण येथेंहि अगदीं ओतप्रोत भरलेले दिसतील. Räuber चें स्वैर भाषांतर आपल्या मराठी भाषेमध्यें कै. दे. भ. शिवरामपंत परांजप्यांनीं केलें होतें तेंहि अगदीं लोकप्रिय झालें होतें. Räuber मध्यें सत् व असत् यांमधील झगडा चांगल्याच वास्तवदर्शीपणें दाखविला गेल्याचा टीकाकारांचा दावा आहे.

यानंतर शिलरचे महत्त्वाचें नाटक म्हणजे Kabale und Liebe (१७८४) होय. हेंहि नाटक पहिल्या नाटकाप्रमाणें लोकप्रिय झालें. Räuber चे प्रयोग चालू असतां कै. गडकरी मास्तराप्रमाणें शिलर नटांना मार्गदर्शन करण्यासाठीं जाई. शिलर ज्या ड्यूक ऑफ वूटेनबर्गच्या नोकरीस होता त्याला आपल्या वैद्यकीय सर्जननें अशा हलक्या धंद्याच्या माणसांशीं संबंध ठेवलेला आवडत नसे. शिलर हा कलासेवक खरा. त्याला असलें अपमानास्पद जीवन जगणें आवडत नसे. सन १७८२ मध्यें त्यानें सरदारी नोकरीला रामराम ठोकला व नाटक कंपनींतील साध्या मास्तराची नोकरी मिळविण्याच्या इरायानें आपल्या जीवनास नवें वळण दिलें. शिलरसारख्या साहित्य-कोविदाला त्याच्या अजरामर कलाकृतीमुळें कांहींच फायदा झाला नाहीं. आतां त्याची दारिद्र्याशींच जन्म-गांठ पडली होती असें म्हणावें लागेल. Räuber नंतरच्या या Kabale und Liebe मुळें शिलरच्या भटक्या जीवनाला थोडीशी स्थिरता आली. पण Kabale und Liebe यांनीं त्याला भरघोस लोकप्रियता दिली असें म्हणणें मात्र धाष्ट्याचें काम आहे हें नमूद करावेंसें वाटतें. Don Carlos व Fiesco या दोन अजरामर कलाकृतींनीं शिलरला युरोपांतील नाटककारांच्या अग्रभागीं नेलें म्हणूनच तो शेक्सपिअर, शॉ, इब्सेन यांच्या प्रभावळीमध्यें गणला जातो. Fiesco या नाटकाची कल्पना अभिनव असूनहि तंत्र व मंत्र अगदींच वेगळे आहेत. शेक्सपिअरच्या तंत्राला माघार घ्यावयास लावण्याजोगें अभूतपूर्व स्वभावरेखन, वास्तवता, मोजके

व रेखीव संवाद, छानछोकीचे संवाद यामुळें शिलरचें तंत्र अत्युत्कृष्ट म्हणून गौरविल्यास नवल नाहीं. बर्नाड शॉप्रमाणें शिलर आपल्या पात्रांना प्रचारकांची भूमिका देत नाहीं. जीवितांत आढळणाऱ्या सर्वसामान्य माणसांना शिलर आपल्या नाटकामध्यें नाचवतो; पण असें करूनहि त्यांना तो अतिरेकी माणसासारखें वागवूनहि त्यांचें हंसें करीत नाहीं. Fiesco मुळें शिलर ऐतिहासिक नाटककार म्हणून साहित्यदेवीच्या दरबारीं उदयास आला. यानंतरचें त्याचें गाजलेलें नाटक Die Jungfrau von Orlens हें Saint Joan च्या संविधानकावर आधारलेलें आहे. पण शिलरची भूमिका प्रचारकाची नसल्यामुळें, व प्रेक्षकांच्या मनाचा ताबा घेईल असेंच नाटक लिहिण्याचें असल्यामुळें त्यानें या नाटकामध्यें खूपच प्रणयरम्य वातावरण तयार केलें. शिलरपुढें ध्येयदर्शी-पणाचा आव आणण्याचें कांहींच कारण नसल्याकारणानें, त्यानें आपल्या लेखणीचा स्वैरविलास चालविला, म्हणून त्याच्या टीकाकारांचा त्याच्यावर रोष आहे. स्वतः बर्नाड शॉनेंहि Romantic non-sense म्हणून शिलरला शालजोडींतले दिले असले तरी शॉच्या प्रचारकी जोनपेक्षां शिलरची प्रणयी जोन परवडली. या नाटकांतील भाषा अति उठावदार आहे.

Braut von Messina व William Tell या उरलेल्या दोन कलाकृतींपैकीं दुसरी कृति अद्वितीय आहे हें सर्व टीकाकारांचें निर्विवाद मत आहे. स्विस स्वातंत्र्यवीर विल्यम टेलच्या जीवनांशीं समरस होऊन ही कलाकृति लिहिली असल्यामुळें, उदात्त देशाभिमानाचा जाज्वल्य अभिमान असल्यामुळें ही कलाकृति फारच लोकप्रिय झाली. 'विल्यम टेल'ची व्यक्तिरेखा लिहितांना शिलरनें आपल्या लेखणीला बहारदार वळण दिलें असाच टीकाकारांचा निर्वाळा आहे. शिलरच्या ह्या शेवटल्या नाटकानें त्याला त्रिखंडात्मक महत्त्व आणून दिलें. विल्यम टेल ही शिलरची अजोड कलाकृति होय.

नाटककार म्हणून शिलरनें कीर्ति मिळविली. त्याचा भाषाविलास, त्याचा ध्येयवाद, त्याचा जाज्वल्य देशाभिमान, त्याची सत्प्रवृत्तीवरील श्रद्धा हीं त्याच्या नाटकाचीं अनेक यशोबीजें होत. नाटककार शिलरनें वास्तवतावादाचा कट्टा पुरस्कार केल्यामुळें त्याचीं नाटकें इतर नाटककारांच्या नाटकांहून अगदीं वेगळीं झालीं. इतकेंच नव्हे तर याच वास्तवतावादामुळें शिलरनें नाटककारामध्यें एक नवा पंथ पाडला असें म्हणावें लागेल. गोएट्नें Faust लिहून जर्मन नाट्यसृष्टीमध्यें जी क्रांति केली तिचीं बीजें शिलरच्या नाटकामध्यें आढळतील. शिलरवर नाटककार या नात्यानें फार अनकूल व प्रतिकूल टीका झाली. त्याच्या जीवश्चकंठश्च मित्रांनींहि शिलर नाट्यसृष्टीला बिघडवीत असल्याचा आरोपहि केला होता, पण हे दोघे मित्र मात्र आपल्या नव्या पंथापासून विचलित झाले नाहींत. या सर्व नाटकांचीं इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज इत्यादि भाषांमध्यें भाषांतरें झालीं आहेत व तीं सर्वच्या सर्व फारच लोकप्रिय झालीं आहेत. "कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी।" असें भवभूतीनें म्हटलें आहे तें खरेंच आहे. कारण शिलरच्या नाटकांना आज बरेच भक्त सांपडतात!

नाटककार शिलर हा कवि म्हणूनहि प्रसिद्ध आहे. युरोपांतील उच्चवर्गीयांच्या भाषा लोकभाषा बनविण्याची कामगिरी शिलरच्या पंथानें सुरू केली. शिलर कवि म्हणून फारच गाजला. पोवाडे (ballad) लिहिण्यामध्यें त्याचा हातखंडा होता. सत् आणि असत् यामध्यें झगडा दाखवून अंतिम यश मात्र सत्प्रवृत्तींना देत असे. Die Burgschaft ही नयनमनोहर कविता उदाहरणार्थ घ्या. या कवितेमध्यें सिओनीस हा देशभक्त आपल्या जुलमी राजावर

तलवारीचे वार करतांना पकडला जातो. अर्थात् त्याला देहान्ताची शिक्षा ठेवलेलीच. पण जुलमी राजानें तुझी शेवटची इच्छा काय म्हणून विचारतां, डिओनीस तीन दिवसांचा अवधि आपल्या भगिनीच्या लग्नाकरितां मागून घेतो. आपण येणार असल्याचा ओलीस ( Burgschaft ) म्हणून तो एका मित्राला ठेवून जातो व तिसरे दिवशीं परत न आल्यास राजा मित्राला फांशी देणार होता. हा देशभक्त घरीं जाऊन बहिणीचें लग्न लावून एक दिवस आगाऊच परत येण्यासाठीं निघतो. मध्यंतरीं नदीला पूर आल्यामुळें त्याची कुचंबणा होते, पण तो सारेल पाण्यांतून पोहून परत येतो. मग दरोडेखोरांच्या टोळीशीं सामना देऊन तो राजवाड्यांत येतो तेव्हां त्याला उशीर झाल्यामुळें राजा त्याच्या मित्राला फांशीच्या वेदीवर न्यायला तयार झालेला असतो. त्याला आपला मित्र विश्वासघात करणार नसल्याचा आत्मविश्वास होता म्हणून राजाने त्याला जंग जंग छळलें तरी तो आपल्या मित्राला वाईट म्हणूं इच्छित नव्हता. डिओनीस वधस्तंभाजवळ अवतीर्ण होऊन मला फांशीं द्या, अनेक अडचणीमुळें मला येतां आलें नाहीं पण आतां मी आलों आहें तशी मला फांशीं द्या, असें विनवूं लागला. मग त्यांना राजाकडे नेण्यांत आलें. तेथें त्या जुलमा राजाला मानवी जीवितामध्यें कांहींतरी 'चांगलें' असल्याचा साक्षात्कार झाल्यामुळें तो त्या देशभक्त क्रांतिकारकांना आपले मित्र म्हणून गौरव करतो; वस्तुतः डिओनीस या देशभक्तावर पडलेल्या असंख्य अडचणींचा पाढा शिलर वाचतो पण तो अगदीं कौशल्यानें व चातुर्यानें. Taucher हा पोवाडाहि अशाच सत्प्रवृत्तींचा विजय शोकान्तिकेनें दाखविण्यासाठीं आहे. Taucher हा एक अगदीं रोमांचकारी पोवाडा भाग आहे. समुद्राच्या तळाचा शोध घेणारा निकोलस नांवाचा एक शिकावू सरदार ( Knappe ) आपल्या राजाची इच्छा पुरी करण्याच्या इराद्यानें राजानें टाकलेला सुवर्णकप परत आणण्यासाठीं समुद्रतळाशीं जातो. वाटेंत देवमासा, सीलमासे, अजस्र सुसरी व द्विपाद प्राणी यांनीं त्याला छेडलें. पण कर्मधर्मसंयोगाने तो सुवर्णकप एका निमुळत्या खडक वर आदळला होता व निकोल्स तथेंच आला. निकोल्सला एक हिंस्र द्विपाद जलप्राणी गट्ट करणार एवढ्यांत प्रवाहाची दिशा बदलून तो प्रवाहाच्या टोंकावर जमिनीवर आणून टाकला जातो. राजाला खालील भयानक राज्याची कल्पना देऊन, " हे राजा, चांगला राजा होण्याची तुझी इच्छा असेल तर दुसऱ्याच्या जिवाशीं खेळण्याच्या फंदांत पडूं नकोस ! " असा उपदेश करतो. पण राजा बोले प्रजा चाले. राजानें आतां त्याला, राजाची तरुण लावण्यवती राजकन्या विरोध करीत असतांहि, परत समुद्राच्या तळाशीं काय काय आहे हें पाहून येण्यास फर्माविलें. राजाज्ञा शिरसावंद्य मानीत असतां निकोल्सचा प्राण गेला.

शिलरनें इतिहासकार म्हणूनहि कीर्ति मिळविली. वक्रोक्ति व उपहास हे त्याच्या लिखाणाचे स्थायी अलंकार होत. याच अलंकारामुळें उपहासकार टीकाकार ( Rhetoric ) म्हणून त्याची गणना अतिशय आदरानें केली जाते. त्याच्या वाङ्मयखण्डांचें भराभर इंग्लिश व फ्रेंचमध्यें भाषान्तर झालें, त्यामुळें त्याला सर्व युरोपभर मोठा अनुयायी वर्ग लाभला.

सन १८०५ च्या ९ मे ला शिलर अगदीं तरुणपणीं निवर्तला, पण त्याचें कार्य त्याच्या मृत्यूनें थांबणारें नव्हतें. राम गणेश गडकऱ्याप्रमाणें शिलर हा त्याच्या मृत्यूमुळेंच अमर झाला. दोघेहि साहित्यिक अगदीं तरुणपणीं मरण पावले. शब्द त्यांच्या मनामध्यें येत मग त्यांना अर्थ येई. भाषेचा फुलोरा हें दोघांच्याहि लेखनाचें वैशिष्टय आहे. शिवरामपंत परांजप्यांप्रमाणें

शिलर ओघवती, अलंकारप्रचुर, दृष्टान्त आणि उपमा यांनीं भरगच्च भरलेली भाषा वापरी· व्हिक्टर ह्यूगोसारख्या परभाषी साहित्यिकावर शिलरचा प्रभाव आहे.

शिलरचें साहित्यांतील स्थान कोणतें ? दहापंधरा ग्रंथराजांचा लेखक हेंच का ? मुळींच· नाहीं. एका नव्या संप्रदायाचा प्रवर्तक म्हणून शिलरची कामगिरी आपण पूर्वी पाहिलेली आहेच, पण Realism वास्तवतावादाचा युरोपांतील आद्य प्रणेता या नात्यानें शिलर अजरामर आहे. गोएट् कलावादी ( idealist ) होता म्हणून वास्तवसत्याची गळचेपी करणें त्याला जमे, पण शिलर मात्र realist असल्यामुळें त्यानें आपल्या साहित्यसंभारामध्यें सर्वत्र वास्तववादाचाच पुरस्कार केला. वास्तवतावादी विचारप्रणालीला त्याला परकीय भाषांमध्यें अनुयायी मिळाल्यामुळें शिलरचा पंथ आज जगामध्यें फारच मोठा आहे.

वरील सर्व विवेचनावरून शिलरची कामगिरी एकमेवाद्वितीय होती हें कुणीहि नाकारणार नाहीं; त्याचें कार्य एकट्या जर्मनीपुरतें न होतां तें साऱ्या विश्वाकरितां झालें, म्हणून ' साहित्य-देवीचा तूच सेवक खरा ' असा त्याला सर्वांनीं मानाचा मुजरा केला आहे. "झाले बहु होतील बहु परंतु यासम हा !"

---

# निसर्गाच्या सान्निध्यांत

लेखक :—**सुरेश भामरे**, सी. बी. ए.

निसर्गाची महति खरोखरीच अनन्य नि अवर्णनीय व विलोभनीय आहे यांत शंका नाहीं रविवारचा तो दिवस होता. त्यांतून हा श्रावणाचा महिना असल्यामुळें, म्हटलं, जावं निसर्गाच्या सान्निध्यांत. निसर्गाच्या ह्या सुखद स्पर्शासाठीं मी आसुसलों होतों, पण यापूर्वी सवड मिळेल तेव्हां ना ! श्रावणाचा महिना असल्याकारणानें त्या सुंदर निसर्गावर अधिकच मनोहर रंगाची छटा विलसत होती. जिकडे नजर फेंकावी तिकडे हिरव्या रंगाची मुक्तहस्तानें उधळपट्टी केलेली दिसत होती. या हरित सृष्टीवर, नाना तऱ्हेच्या व नाना रंगाच्या रानफुलांची जो कलाकुसर झालेली होती, ती बघतांना बघणारांचें भान हरपून गेल्याखेरीज रहात नसे.

सुटीचा दिवस असल्याकारणानें मानवी व्यवहारापासून मी मुक्त होतों—त्या दिवशीं तरी मानवापासून अलिप्त रहाण्याचें माझ्या मनानें ठरवलं होतं—मी नवजोमानें निसर्गाच्या हरेक दालनांत पदार्पण करीत होतों. सागराचें पहिलें वहिलें दर्शन. वालुकामय प्रदेशाकडील रम्य सहल, नि तुडुंब भरलेल्या हिमनदीवर सुखद रात्र, यांचें हुबेहूब वर्णन अजूनपर्यंत कोणी केलें नाहीं असें हॅमर्टन गर्वानें म्हणतो त्याची सत्यता हळूहळू पटूं लागते; त्याचें कारण हेंच असावें कीं, आपण आपल्या तुटपुंज्या विचारसरणीनें ह्या अगाध सृष्टींतली गूढरम्यता शब्दांच्या द्वारें प्रकटच करूं शकत नाहीं.

सौंदर्याबद्दल आसक्ति आणि श्रद्धा असणें ही नैसर्गिक देणगी आहे. निसर्गाविषयीं आसक्ति असणारा आपलं देहभान विसरून निसर्गाशीं अल्पकाळ तरी समरस होतो. बागडत बागडत त्या

भव्य वनांतील फुलांच्या ताटव्यापाशीं मी आलों. फुलांच्या मोहक रंगांत आणि सौंदर्यांत कसला तरी गूड ईश्वरी संकेत सांठविलेला असावा. निसर्गाचें अतिशय कोमल रूप म्हणजे फूल होय. फुलांची योजना विधात्यानें मानवाच्या अननुभूत समाधानासाठींच केली आहे. कारण बालकांना तीं विलक्षण प्रिय वाटतात व विलासी लोकांना तीं कीर्तीच्या एषणेसाठीं त्यावीशीं वाटतात. पुनीत अंतःकरणाच्या विभूतींना त्यांतलं मार्दव आणि मांगल्य अतिशय विलोभनीय वाटतें. फुलांचा मस्त मधुर सुगंध वाहून आणणाऱ्या चंचल वायूच्या शीतल झुळकी, आपल्या मधुर चिवचिवाटानें रसिक हृदयाला वेड लावणारे आतुर पक्षीगण, आपल्या उद्योगधंद्यांत सदैव मग्न असणारे कीटकादि क्षुद्रगण, रंगीबेरंगी फुलाफळांनीं लहडलेले गर्द वृक्षराज, भरघोस पिकांनीं दाटलेलीं पिवळीं धमक शेतें, या सर्वांत अननुभूत उन्माद व सौंदर्य सांठविलेलं नाहीं असें कोण म्हणेल ?

फुलानंतर पर्णसंभाराचा निर्देश करणें अत्यावश्यक आहे. वृक्षांचीं पानें पाहिलीं म्हणजे अंतःकरण कसल्यातरी सुखद उर्मीनें भरून येतें. विलोभनीय असे वैचित्र्यदायक वृक्ष पाहिले म्हणजे, व आपल्या वासंतिक यौवनांत मस्तमधुर सुगंधाची लयलूट करण्याचा त्यांचा हव्यास पाहिला म्हणजे, कांहींशा अनिर्वचनीय धुंदीनं मनं भारावल्यासारखीं होतात आणि बायरनच्या उक्तीप्रमाणें—"I live not in myself, but become that portion of that around me" या उद्गारांतील मर्म तत्काळ पटतें. सौंदर्यसमीक्षक बायरननें स्वच्छ कबुली दिली आहे कीं—"Ye Elements! In whose ennobling stir, I feel myself exalted. There is a pleasure in the pathless wood; there is a rapture on the lonely shore"

जिथें बायरनसारख्या प्रणयपीडित कवीची सृष्टीसौंदर्याविषयीं इतकी आनंददायक व हळुवार भावना, तिथें वर्ड्स्वर्थसारख्या प्रसन्न सात्त्विक मनाच्या निसर्गोपासकाविषयीं अधिक काय सांगावयास हवें ? निसर्गप्रेमी वर्ड्स्वर्थ आपल्या मधुर काव्यांत म्हणतो " प्रातःकाळच्या निद्राधीन लंडन शहराइतकी जगांत अन्य कोणतीहि गोष्ट मला तरी निदान अधिक हृद्य व प्रशांत भासत नाहीं." अशा विचारानें भारावून मी बागडत बागडत जलाशयाच्या समीप येऊन ठेपलों. जलाशयाचेंहि महत्त्व सृष्टिसौंदर्यांत सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. लहान लहान निर्झर कधीं संथपणें तर कधीं उच्छृंखलपणें वाहतांना आढळतील. निर्मळ नि सुरम्य सरोवरें यांच्यांत रसरशीतपणा भरला नाहीं असें कोण म्हणेल ! दिवसभराच्या अव्याहत श्रमानें श्रांत झालेल्या मनाला प्रशांत जलाशयाच्या कांठीं मनमुराद रमण्यांत जें अवीट सौख्य नि समाधान लाभतें, त्याचें वर्णन करणें आवांक्याबाहेरचें काम आहे.

अशा तऱ्हेनें निसर्गाच्या विविध दालनांतून बागडतांना अपार आनंदाचा लाभ झाला व निसर्गाविषयीं अधिकच आवड निर्माण झाली व सागराच्या कांठीं आलों. सागराच्या भव्य दर्शनानें माझें मन उचंबळून आलें व माझ्या कोमल भावना थरारून येऊन शरीरावर सुखाच्या व हर्षाच्या झिणझिण्या उठल्याविना राहिल्या नाहींत. हंसतखेळत पाठशिवणीचा खेळ खेळणाऱ्या त्या लहानमोठ्या लाटा, विविध रंगांचा सडा पडल्यामुळें अतिशय लोभस वाटणारं दरियाचं फेसाळ पाणी, सीमारेषावरून जगाचा शेवटचा निरोप घेण्याच्या गडबडींत असलेलें रक्तिमापूर्ण सूर्यबिंब, क्षितिजाच्या सौम्य नीलिम्यावर उठावदार दिसणारा सागराचा रुपेरी पार्श्वभाग-

अन् यापेक्षांहि अधिक हृद्य म्हणजे विशाल किनाऱ्यावरच्या भुसभुशीत पिवळसर वाळूचा थकलेल्या गात्रांना विश्रांति देणारा सुखद स्पर्श. वारंवार दृष्टीसमोर दृश्यें हीं बोलपटाप्रमाणें जात होतीं. तोंच बाजूला पसरलेली पर्वतराजी अतिशय कमनीय वाटली—

पर्वत हे विश्वांतील भव्य व पवित्र मंदिरें होत. खडक हे मंदिरावरचें गवाक्ष होत. पृथ्वीतळावर रजनीची छाया पसरूं लागली, हळू हळू चंद्रमा वर येऊं लागला होता. आकाशांत चांदण्या चकमत होत्या. मी चांदण्या रात्रीचें तसेंच त्या भुसभुशीत पिवळसर वाळूचें सुख मनमुराद लुटण्यांत देहभान विसरून गेलों होतों—अशा एकान्त समयीं हृदयाला चटका लावून देणारी एक अंधुकशी कल्पना चाटून गेली कीं या निसर्गाच्या सान्निध्यांत, त्या निसर्गाचें मनमुराद सुख लुटण्यांत प्रेमळ अशा साथीची जाणीव भासत होती—निसर्गाचं हें विलोभनीय सुख एकटाच अनुभवीत होतों. चंदेरी आकाशांत प्रशांतपणें लुकलुकणाऱ्या तारकापुंजाकडे भारावलेल्या अंतःकरणानें न्याहाळल्यानंतर मृदु भावना संवेदल्या, व मनमुराद सौंदर्याचा उपभोग घेत निसर्गाचे गोडवे गात गात मी घरीं येऊन धडकलों.

---

## रुद्रासंबंधीं थोडेसें

लेखक:—**मुकुन्द लक्ष्मण अभ्यंकर,** ज्युनिअर बी. ए.

विष्णूवर पवमानाचा अभिषेक व शिवावर रुद्राचा अभिषेक करण्याची आपलेकडे सार्वत्रिक चाल आहे. विशेषतः महाशिवरात्र जवळ आली असतां आणि श्रावण महिना आला असतां रुद्राभिषेकाची एकच गर्दी उडून रहाते. हल्लींच्या तरुण पिढींत याबद्दल अनास्था मात्र आढळून येते. परंतु नीट लक्ष देऊन रुद्रपठण ऐकल्यास व अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांतहि ज्ञान आणि मनोरंजन आहे असें आढळून येईल.

याज्ञवल्क्य स्मृतींत रुद्रपठनानें पापांचा नाश होतो असें सांगितलें आहे. तर वायुपुराणांत पृथ्वीदानापेक्षां एका रुद्रपाठाचें पुण्य अधिक आहे असें लिहिलें आहे. सर्व रुद्रपठनाचें जेवढें पुण्य आहे तेवढेंच त्याच्या अनुवाकाचें व ऋचांचें, जपाचें व होमाचें आहे. भट्टभास्करानें आपल्या रुद्रभाष्यांत कोणत्या ऋचेनें कसें हवन करावें व त्यापासून कोणकोणत्या सिद्धि प्राप्त होतात याचें सविस्तर विवेचन केलें आहे. त्यांत खरेपणाचा अंश कितपत आहे हा प्रश्न सोडून दिला तरी त्यामुळें मनोरंजन होतें हें निश्चित !

रुद्राचे नमक व चमक असे दोन भेद आहेत. खाडिलकरांनीं आपल्या भाऊबंदकी नाटकांत घातलेली नमकशास्त्री व चमकशास्त्री आणि त्यायोगें निर्माण केलेला विनोद बहुतांशीं रुद्रावरच आधारित आहे. असो. नमकाचे आणि चमकाचे प्रत्येकीं ११ अनुवाक आहेत. एकादशिनि करणारा ११ वेळां नमक व एक वेळ चमक म्हणतो. सर्व रुद्राचा ऋषी एक नाहीं. बहुतेक अनुवाकांचे ऋषी भिन्न आहेत. आणि कांहीं अनुवाकांमध्यें तर ऋचांचे निरनिराळे ऋषी आहेत. एकट्या नमकाचीच गोष्ट पाहूं गेल्यास त्याचे अत्रि, आत्रेय, कण्व, कश्यप, काश्यप, काल, गौतम, दुर्वास, देवरात, देवल, नारद, पुलह, भगवान, मरुत्वान, मंडूक, मांडव्य, महादेव, वैयाघ्र, वैराज, स्कंद, शंभू, हेमकोष हे ऋषी आहेत. आणि इतक्या सर्वांनीं केलेले अनुवाक व ऋचा एकत्र करून सध्यांचा नमक दुसऱ्या एकाद्या ऋषीनें बनविला असावा असें मला वाटतें,

कारण कांहीं अनुवाकांची एकमेकांशीं संगति लागत नाहीं आणि अर्थाच्या बाबतींतहि परस्परांशीं असंबद्धता दिसते.

रुद्रास आरंभ ' नमस्ते रुद्र मन्यवे ', या ऋचेपासून झाला आहे व यांत रागावलेल्या रुद्रास प्रसन्न करण्याचा भक्त प्रयत्न करीत आहे असा अर्थ अभिप्रेत आहे. तसेंच पहिल्या अनुवाकांत ' शिवेन वचसा त्वा गिरिशाच्छा वदामसि ' म्हणजे हे गिरीशा, चांगल्या शब्दांनीं आम्ही तुझी स्तुति करतों अशी प्रतिज्ञा केलेली आहे. आणि रुष्ट देवतेस प्रसन्न करण्याचा हाच खरा उपाय आहे. यापुढच्या ८ अनुवाकांमध्यें रुद्राच्या निरनिराळ्या रूपांस नमस्कार केलेले आहेत. नंतरच्या १० व्या अनुवाकांत

' मानो महान्तमुत मानो अर्भकं । मान उक्षन्तमुत मान उक्षितम् ॥
मानोवधीः पितरं मोत मातरं । प्रिया मानस्तनुवो रुद्र रीरिषः ॥

म्हणजे हे रुद्रा, आमचे वृद्ध, तरुण, बाल, गर्भ व आमच्या प्रिय वस्तूंचा तूं नाश करूं नकोस. अशा प्रकारची पुष्कळ प्रार्थना केली आहे. नंतर ११ व्या अनुवाकांत त्रैलोक्यांत संचार करणाऱ्या रुद्रास नमस्कार करून ' तेभ्यो नमः । ते नो मृडयंतु । ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तं वो जंभे दधामि ' म्हणजे आम्हांस सुखी राख व ज्यांचा आम्ही द्वेष करतों किंवा जे आमचा द्वेष करतात त्यांस खाऊन टाक अशी प्रार्थना केली आहे. चमकांत ऐश्वर्य, आरोग्य, सुख, वैभव इत्यादि इहलौकिक वर आणि पारलौकिक सर्व इष्ट वस्तू मला मिळोत अशी प्रार्थना आहे.

रुद्रांत अनेक मनोरंजक माहिती मिळते. त्यांपैकीं कांहीं माहिती सांगून हा लेख पुरा करतों. नमकाच्या २ ऱ्या अनुवाकापासून ९ व्या अनुवाकाअखेर रुद्राच्या निरनिराळ्या रूपांस नमस्कार केला आहे. पैकीं तिसरे अनुवाकांत ' स्तेनानां पतये नमः ' असें म्हटलें आहे, याबद्दल भट्टभास्कर म्हणतात कीं चोरांचे पापांचा नाश करून त्यांचा उद्धार करतो म्हणून रुद्रास ' स्तेनानां पति ' असें म्हटलें आहे. या अनुवाकांत रुद्रास दिलेलीं कांहीं विशेषणें व त्यांचा अर्थ सायणाचार्यावरून खालीं दिला आहे.

| | |
|---|---|
| १. स्तेनानां पतये नमः | – दुरून येऊन रात्रीं लोकांचें दार उघडून चोरी करतात ते स्तेन. |
| २. तस्कराणां पतये नमः | – तस्कर म्हणजे दरवडेखोर. |
| ३. नमो वंचते परिवंचते | – धान्याच्या विक्रींत पैसा खाणें ती वंचना आणि सर्वत्र पैसा खाणें ही परिवंचना. |
| ४. स्तायूनां पतये नमः | – वेष पालटून चोरी करतात ते स्तायू. |
| ५. नमो निचेरवे परिचराय | – मालकाचे घरीं केव्हां डल्ला मारावयास सांपडेल अशी वाट पहाणारा तो निचेरु; व बाजार, रस्ते, बागा यांत चोरीच्या हेतूनें फिरणारा तो परिचर. |
| ६. अरण्यानां पतये नमः | – अरण्य म्हणजे वाटमारे. |
| ७. नमः जिघाँसभ्यः | – खून करण्याची इच्छा करणारे ते जिघांसु. |
| ८. मुष्णतां पतये नमः | – शेताच्या मालकाचें धान्य चोरणारा म्हणजे मुष्णत्. |
| ९. प्रकृंतानां पतये नमः | – खून करून चोरी करणारा तो प्रकृन्त. |
| १०. नमः उष्णीषिणे | – लोकांसारखीं पागोटीं घालून त्यांच्यांत मिसळून चोरी करणारा तो उष्णीषिन्. |

# ★★★ मराठी लघुनिबंध ★★★

लेखकः—**शरद परशुराम जोग**, ज्यू. बी. एसूसी.

मराठी भाषेतील लघुनिबंधाच्या दालनास प्रथम प्रा. ना. सी. फडके यांनीं सुरवात केली. त्यापूर्वीं लघुनिबंधाच्या धाटणीचें कांहीं लेखन मराठींत झालेंच नाहीं असें नाहीं परंतु त्याचें स्वरूप सर्वस्वीं लघुनिबंधाचें नव्हतें. शि. म. परांजपे व न. चिं. केळकर यांचे कांहीं निबंध 'लघुनिबंधांत' मोडण्यासारखे आहेत. निदान लघुनिबंधाला ते जवळचे आहेत. लघुनिबंधाला लागणारी मनोवृत्ति त्यांच्या लेखांत त्याच पद्धतीनें व्यक्त झाली आहे. प्रा. श्री. म. माटे यांचे कांहीं निबंधहि लघुनिबंधच आहेत. य. गो. जोशी हे सुद्धां कित्येकदां, लघुकथा लिहितांना लघुनिबंधच लिहितात. त्यांचें आत्मचरित्रात्मक लेखन तर लघुनिबंधांतलेच उतारे शोभण्यासारखें आहे. तेव्हां तात्त्विकदृष्ट्या या क्षेत्रास अनेक श्रेष्ठ साहित्यिकांनीं स्पर्श करून लघुनिबंधाचें 'सोनें' करून टाकलें आहे.

परंतु एक गोष्ट मात्र खरी कीं सध्यां लघुनिबंधाच्या क्षेत्राला अवकळा आली आहे. मराठी नाट्यसृष्टि जशी कोलमडली आहे तशी लघुनिबंधाचीहि स्थिति झाली आहे. सध्यां लघुनिबंधाला जर कोणीं थोडेंफार सांवरून धरलें असेल तर तें वि. स. खांडेकरांनीं असेंच आपल्याला म्हणावें लागेल. प्रा. फडक्यांनीं इंग्रजी लघुनिबंधाच्या धर्तीवर कांहीं व स्वतःच्या व्यक्तित्वावर आधारलेले असे कांहीं लघुनिबंध लिहून सुरुवातीलाच मोठें कार्य करून ठेवलें. परंतु नंतर खांडेकरांनीं या क्षेत्रांत खूपच भर घातली. सारांश लघुनिबंधाचें 'बेट' प्रा. फडके यांनीं शोधून काढलें असलें, तरी त्या बेटावर वसाहत करून बगीचा फुलवण्याचें कार्य खांडेकरांनींच केलें आहे.

प्रमुख लघुनिबंधकार पाहिले तर एक गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे, कीं लघुनिबंधानें आपल्या वाङ्मयीन कार्याला सहसा कोणींच सुरवात केलेली नाहीं. यावरूनच लघुनिबंध लिहणें किती अवघड आहे याची कल्पना येईल. बहुतेक लेखकांनीं आपल्या वाङ्मयीन जीवनाच्या मध्यावर किंवा शेवटीं लघुनिबंधलेखनाचें कार्य केलें आहे. त्याचप्रमाणें दुसरी गोष्ट आपल्या लक्षांत येते ती ही कीं, ठराविक व्यक्तित्व असलेले लेखक अधिक चांगले लघुनिबंध लिहूं शकतात. 'नाटककार' सहसा 'लघुनिबंधकार' झालेला आढळणार नाहीं. अर्थात् एखाद्याचें व्यक्तित्व सर्वांगीण असल्यास गोष्ट निराळी. परंतु प्रा. फडके व खांडेकर हे कांहीं 'नाटककार' नाहींत, व नाटककार अत्र्यांनीं कांहीं लघुनिबंध लिहिलेले नाहींत. प्रा. फडक्यांनीं नाटकें लिहिलीं आहेत परंतु तीं नाटकाच्या भाषेंत न लिहितां कादंबरीच्या भाषेंत लिहिलीं आहेत. तेव्हां 'नाटककार फडके' म्हणण्यापेक्षां 'कादंबरीकार फडके' असें म्हणणेंच रसिकांना अधिक आवडेल. तेव्हां आपल्याला असें म्हणायला हरकत नाहीं कीं कादंबरीकार व लघुकथाकार हे लघुनिबंध अधिक चांगले लिहूं शकतील. अर्थात् वाङ्मयांत निश्चित असा कोणताच नियम सांगतां येत नसला, तरी अनेकांच्या बाबतींत वरील विधान योग्य ठरूं शकेल. नाहीं तरी वाङ्मयांत काय किंवा शास्त्रांत काय, नियम हे अनेकवार निरीक्षण व प्रयोग करूनच केलेलें असतात किंवा ठरवलेले असतात.

आतां लघुनिबंधकाराला कोणत्या प्रकारचें व्यक्तित्व लागतें तें जर आपण पाहूं लागलों तर आपल्याला असं म्हणतां येईल कीं त्याला प्रत्येक क्षेत्रांतील चांगला चांगला भाग अवगत असेल तर त्याचा लघुनिबंध अधिक सरस होईल, ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून इंद्रादिदेवांच्या रक्षणाकरतां व सुंदोपसुंद या राक्षसांच्या नाशाकरतां विश्वकर्म्यानें, प्रत्येक रत्नांतील 'तिळ तिळ' असा चांगला भाग घेऊन 'तिलोत्तमा' ही अप्सरा निर्माण केली. तिळ तिळ चांगला भाग घेऊन तिची निर्मिति झाल्यानेंच तिला तिलोत्तमा म्हणतात. लघुनिबंधाच्या बाबतींतहि लघुनिबंधकारानें अशीच विश्वकर्म्याची भूमिका घ्यावयास हवी. काव्य, कथा, नाट्य, निबंध, पत्रलेखन व विनोदी लेखन या वाङ्मयप्रकारांना आवश्यक असे अनेक गुण घेऊन त्यांनीं आपला लघुनिबंध त्यानें सजवावयास हवा. लघुनिबंधांत हे गुण कशा रीतीनें येतात तें पाहूं. (१) **लघुनिबंधांत काव्य जरी नको तरी काव्यमय भाषा व काव्यमय कल्पना अवश्य हवी.** हे दोनहि गुण वि. स. खांडेकरांच्या लघुनिबंधांत विपुल प्रमाणांत आहेत. त्यांचे लघुनिबंध सुभाषितांनीं व काव्यमय वाक्यांनीं फुलून गेलेले असतात. चांदणें व चांदण्या याशिवाय तर खांडेकर लघुनिबंध लिहूंच शकत नाहींत, त्याचप्रमाणें चहाहि त्यांना खूपच आवडता आहे. मोत्या कुत्रा व सूर्याचें कोवळें ऊन हेहि मधून मधून डोकावत असतात. (२) **लघुनिबंध म्हणजे 'नाटक' नव्हे. परंतु नाट्यमय प्रसंग—कीं ज्यावरून लघुनिबंध सुचला असं दाखवण्यांत येतं—व सुरवात ही सुद्धां नाट्यमय व आकर्षकच असली पाहिजे.** खांडेकरांचे बरेचसे लघुनिबंध संवादांनीं सुरू झालेले असतात व त्यांत कुणाचे तरी उद्गार एकदम कानांवर पडल्यामुळें 'नायक' कानाजवळून गोळी जावी तसा दचकलेला असतो ! 'नायक' या शब्दावरून आठवण झाली. लघुनिबंधाला नाटक व कादंबरीप्रमाणें शारीरिक नायक सहसा लागत नाहीं. त्यामुळें नायकाच्या शारीरिक वा बाह्यवर्णनास त्यांत फारसा वाव नाहीं. विचार-चिंतन व वैचारिक बैठक यालाच अधिक वाव असल्यानें लघुनिबंधांत बाह्य 'नायक' असा नसतोच ! **लघुनिबंधांत नायक विचारांच्या रूपानेंच केवळ वावरत असतो.** त्यानें कपडे कसे घातले आहेत व तो कुठें चालला आहे याला फारसं महत्त्व दिलेलं नसतं. उलट या गोष्टी अनेकदां मोघमच ठेवलेल्या असतात. 'मीं कुठेसं वाचलं कीं,—' 'मी कुठें तरी चाललों होतों, आणि इतक्यांत—' अशींच वाक्यें लघुनिबंधांत बरेच वेळां आढळतात. 'स्वतःशींच केलेलं स्वतःचेंच आत्मचिंतन' हा जो स्वच्छंदीपणा हाच लघुनिबंधाचा आत्मा असल्यानें, त्याचा मित्र काय किंवा त्याला विचार करायला लावणारा प्रसंग निर्माण करणारी व्यक्ति काय, यांपैकीं कोणीच कित्येकदां महत्त्वाचे ठरत नाहींत. लघुनिबंधकाराला ठराविक विषय देऊन या व्यक्ति निघून जातात व मग 'मी विचार करूं लागलों—' अशी स्थिति होऊन लेखकाचें आत्मचिंतन सुरू होतें. अर्थात् आत्मचिंतनाचा आत्माविष्कार खूपच अवघड, व आविष्कार केला तरी अगदींच थोडी जागा व्यापणारा. लघुनिबंधांत, ना. मा. संत तर कित्येकदां एखादी वस्तु घेऊन पत्नीला आंत पाठवतात व मग आत्माविष्काराला सुरवात होते. सारांश नायक किंवा कोणतेंच मानवी पात्र यांच्यावर लघुनिबंधाचा वेल बहरत नसून, तो लेखकाच्या बौद्धिक व्यक्तित्वावर व त्याच्या आविष्कारावरच बहरत असतो. हीं मानवी पात्रें केवळ आपलीं कार्यं करून निघून जातात. बाकीचं महत्त्वाचं कार्य लेखकाच्या मनालाच करायचं असतं—व तें सुद्धां हलक्या हातांनीं व खेळत्या पावलांनीं करून चटकन् निघून जायचं असतं—कीं जणू कांहीं झालंच नाहीं !

(३) **लघुनिबंधलेखन व पत्रलेखन यांतहि खूपच फरक आहे. पत्रलेखनांत आढळणारी खेळकर वृत्ति, मनमोकळेपणा व खाजगीपणा त्यांत अवश्य असावा;** परंतु अति खाजगीपणा व्यक्त झाल्यास तो बाधकच ठरण्याचा संभव आहे. पत्रांत असणारा कांहीं औपचारिकपणा व व्यवहारीपणा तर मुळींच नसावा. प्रत्यक्षतः सरळ सरळ खाजगी गोष्टी न आणतां खाजगी जीवनावर मनमोकळी चर्चा मात्र लघुनिबंधाच्या वातावरणाला बाध आणणारी नाहीं. (४) **लघुनिबंध म्हणजे लघुकथाहि नव्हे.** परंतु कित्येकदां अनेक लघुनिबंधांवर लघुकथेंतल्या वातावरणाची छाप पडलेली असते. कित्येक लघुनिबंध हे लघुकथा व निबंध यांच्या सीमारेषांवर उभे असतात. **लघुनिबंध व निबंध यांत तर खूपच फरक** आहे. (५) **लघुनिबंध व तत्त्वचिंतन यांतहि फरक आहे. लघुनिबंध म्हणजे केवळ तत्त्वचिंतनहि नव्हे.** कित्येक लघुनिबंधांत तें धाग्याच्या स्वरूपांत असतें. 'आडवी रेघ' या खांडेकरांच्या लघुनिबंधांचें खूपच तत्त्वचिंतन आहे. मृत्यूबाबतचें खांडेकरांचें तत्त्वज्ञानच त्यांत त्यांनीं सांगितलें आहे. परंतु तें अगदीं निराळ्या रीतीनें; प्रचारीपणा, उपदेशाचा ठराविक कंटाळवाणा सांचा, तर त्यांत मुळींच नाहीं. भाषेचा फुलोरा व आकर्षकपणा यांच्या साह्यानें खांडेकरांनीं तत्त्वज्ञान कलेमध्यें गुंफलें आहे. तेव्हां **लघुनिबंधकार हा बुद्धीनें तत्त्वचिंतक असला तरी मनानें कवि पाहिजे व या दोहोंचा सुंदर मिलाफ त्याच्या लघुनिबंधांत सुंदर रीतीनें झाला पाहिजे.** म्हणजे बौद्धधर्मप्रसारार्थ ज्याप्रमाणें बुद्धानें संस्कृत भाषा न वापरतां सोप्या पाली भाषेचा उपयोग केला, त्याप्रमाणें लघुनिबंधकारानें तत्त्वज्ञान सांगतांनाहि शास्त्रीय जड भाषा व गंभीर निबंधपद्धति न वापरतां कलात्मक भाषेचा उपयोग केला पाहिजे. (६) **विनोदी लेखनांत लागणारी विनोदी वृत्ति ही सुद्धां त्यास आवश्यक** आहे. 'उंचावरचा बगीचा' हा खांडेकराचा निबंध त्यांच्या इतर लघुनिबंधांपुढें साधारणच म्हणावा लागेल. परंतु त्याचा शेवट एका लहान विनोदामुळें चांगला झाला आहे. व शेवट चांगला झाल्यामुळें लघुनिबंधहि 'चांगला' वाटतो. उंचावर–गच्चीवर असलेली बाग पहातांना गलिच्छ खेडेंहि लेखकाला उंचावरून चांगलें दिसतें, व 'उंची मग ती तात्त्विक विचारांची असो वा इमारतीची असो त्यामुळें जीवन चांगलें दिसतें' *असा आशय* काढून त्यानें लघुनिबंधाचा शेवट होतो. शेवटीं सर्व खेडूतमित्र निरोप धावयास येतात. त्यावेळीं ते म्हणतात--'पुन्हां या ना कधीं–' लेखक म्हणतो 'हो. येईन कीं, तसं मी सांगूनच आलों आहें–' त्याच्या मित्राला वाटतें कुणाला सांगून ठेवलं आहे? कादंबरीच्या नायकाप्रमाणें याचें फटकन् कुठें 'जमलें' कीं काय? तो विचारतो 'कुणाला?' लेखक म्हणतो 'त्यांना–त्या बागेंतल्या फुलांना!' विनोद नाजूक आहे. परंतु त्यानें मोठं कार्य केलं आहे. हा खांडेकरांचा विनोद झाला. फडक्यांचा विनोदहि लघुनिबंधाला असाच साज चढवून निघून जातो. मित्रानें वाचावयास दिलेलें पुस्तक त्यांचे हातून वाचून होत नाहीं. फार काय, त्यानें कोणतें पुस्तक वाचायला दिलें हेंहि ते विसरून जातात. शेवटीं ठाण मांडून बसलेल्या मित्राला घालवण्याकरतां ते त्याला एक पुस्तक वाचायला देतात. परंतु हाय! तें पुस्तक पूर्वी त्या मित्रानेंच त्यांना वाचावयास दिलेलें असतें! सारांश, विनोद हा लघुनिबंधाचा स्थायी भाव नसला तरी लघुनिबंधाला चुरचुरीतपणा आणण्यास आवश्यक अशा अंगांपैकीं तो एक महत्त्वाचा मालमसाला आहे यांत शंका नाहीं.

सारांश, लघुनिबंधांत काव्य नको पण काव्यमय भाषा व कल्पना पाहिजेत. लघुनिबंधांत नाटकांतल्याप्रमाणें जहरी संघर्ष नको पण नाट्यमय प्रसंग व आकर्षक सुरवात ही पाहिजेच, लघुनिबंधाला शारीरिक नायक नको पण तत्त्वचिंतक नायक अवश्य पाहिजे, त्यांत सुभाषितें नकोत पण सुभाषित सदृश वाक्यें पाहिजेत. लघुनिबंधांत सर्वस्वीं पत्रलेखन नको परंतु पत्रलेखनांत असणारा खेळकरपणा पाहिजे, लघुनिबंध म्हणजे व्यासपीठावरील भाषण नव्हे. परंतु चांदण्यांत मारलेल्या त्या गप्पा निश्चितच आहेत. लघुनिबंध म्हणजे लघुकथा नव्हे, परंतु त्याच्या सुरवातीवर लघुकथेची छाप असली तरी ती चालेल. लघुनिबंध म्हणजे निबंध नव्हे. तरीहि लघुनिबंधाचें एखादें अंग—निबंधास आवश्यक असलेल्या–ज्ञानामुळें बांधलें जाऊं शकेल. लघुनिबंध म्हणजे केवळ तत्त्वचिंतनहि नव्हे, तर काव्य व तत्त्वचिंतन यांचें तें निर्मळ रसायन आहे. आणि लघुनिबंध म्हणजे केवळ विनोदी लेखनहि नव्हे. परंतु विनोदाचा फुलोरा हा त्यांतहि शोभा आणणारा आहे.

लघुनिबंधाची अगदीं पुस्तकी भाषेंत व्याख्या ठरवायची झाली तरी सुद्धां त्या व्याख्येचा संबंध लेखकाच्या आंतरिक प्रवृत्तीशींच जोडावा लागेल. या लघुनिबंधाच्या व लघुकथेच्या आतांपर्यंत अनेकांनीं अनेक व्याख्या केल्या आहेत. परंतु प्रत्येकाच्या लघुनिबंधांत व लघुकथेंत स्वतंत्र असें वैशिष्ट्य आहेच. आतां फडके, खांडेकर, काणेकर हे तिघेहि लघुनिबंधकार आहेत. फडके, खांडेकर व संत हे एकाच गटामधले मानतां येतील. परंतु त्यांतहि फडक्यांच्या लघुनिबंधांत इतरांच्या मानानें शृंगार अधिक प्रमाणांत आहे. भाषेचा फुलोरा आकर्षक, व लिहिण्याची पद्धत हळुवार आहे; तर खांडेकरांचे लघुनिबंधांत गूढ तत्त्वचिंतन व आत्मनिरीक्षण अधिक आहे. संतांनीं फडक्यांच्या धर्तीवर काव्य व कांहींसा शृंगार यावर भर दिला आहे. फडके, खांडेकर, संत यांचे लघुनिबंध कधीं कधीं कांहींसे कृत्रिम, गूढ, वरच्या पातळीचे आहेत, तर काणेकरांचे लघुनिबंध सरळ, व्यवहारी, वकिली बाण्याचे, वादविवादप्रधान, व सडेतोड असे आहेत. फडक्यांचे लघुनिबंध काव्यमय भाषा वापरलेले व विस्तारानें मोठे असे आहेत, तर काणेकरांचे लघुनिबंध हे समाजवादी व विस्तारानें लहान आहेत. काणेकरांचे लघुनिबंध हे व्यवहाराचा अधिक विचार करणारे व त्या विचारामागें समाजवादी दृष्टिकोन असल्यानें सुटसुटीत, नैसर्गिक व आग्रही वृत्तीचे आहेत. त्यांत भाषेचें सौंदर्य, विचारांचें सौंदर्य तर नक्कीच व तेंहि खूपच आहे. त्यांच्या लघुनिबंधांत सुंदर भाषा नसली तरी समाजाची सुंदर रचना करण्याच्या कांहीं कल्पना तर निश्चितच आहेत. सारांश, काणेकरांचे लघुनिबंध हे ' जीवनाकरतां कला ' या स्वरूपाचें वाटतात, तर फडक्यांचे लघुनिबंध हे ' कलेकरतां कला ' या स्वरूपाचे वाटतात.

एकूण लघुनिबंधाची जर आपल्याला सर्वसाधारण व्याख्या करावयाची असेल तर ती आपल्याला अशीच करावी लागेल कीं, स्वभावाच्या विशिष्ट वैशिष्ट्यामुळें, अंतःकरणांतील सौंदर्यशोधक दृष्टीमुळें, जीवनाकडे पहाण्याच्या मनाच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळें, आपल्या प्रभावी व्यक्तित्वाची छाप बाह्य प्रसंगावर वा वस्तूंवर पडल्यामुळें मूळ स्वरूपापेक्षां त्यांच्यांत जो सौंदर्यपूर्ण बदल झालेला असतो, लेखकाच्या प्रतिभेमुळें त्यांना जें अलौकिकत्व आलेलें असतें व त्यामुळें ते प्रसंग वा त्या वस्तू जो थोर आशय व्यक्त करीत असतात, किंवा वर वर दिसणाऱ्या त्यांच्या क्षुल्लक स्वरूपापेक्षां त्यांना जें महत्त्वपूर्ण स्वरूप आलेलें असतें, व त्या क्षुल्लक वस्तूहि लेखकाचें व्यक्तित्व व तत्त्वज्ञान व्यक्त करीत असतात, अशा ललितलेखनाला लघुनिबंध म्हणावें,

सामान्य वस्तूंतील असामान्यत्व दाखवावयाचें, उपेक्षित सौंदर्याचें प्रकटीकरण करावयाचें, रूक्ष जीवनांत आनंदाचे झरे दाखवावयाचे, वाळवंटांत बगीचा फुलवावयाचा, व जीवनावर श्रद्धा बसवावयाची हेंच लघुनिबंधकाराचें कार्य होय.

अंतःकरणांतील सौंदर्यदृष्टीमुळें व तत्त्वशोधक वृत्तीमुळेंच बाह्य वस्तूंवर सौंदर्य, विशिष्ट तत्त्व वा अर्थ दिसूं लागून, त्याचा स्वस्वभावानुरूप जो उत्कृष्ट आविष्कार होतो त्यास लघुनिबंध म्हणतात. तर एखाद्या बाह्य प्रसंगानें लेखकाची जी प्रचारी वृत्ति, न्यायाची कल्पना, बुद्धीचे कौशल्य, विचार, व प्रतिपादनशैली व्यक्त होते त्याला प्रबंध असें म्हणतात. प्रतिपक्षाच्या खंडनावर व स्वपक्षाच्या मंडनावर प्रबंध अवलंबून असल्यानें तात्त्विक कठोरता हाच प्रबंधाचा पाया असतो, तर स्वीकाराच्या बुद्धीमुळें सुहृद्भाव हाच ललित निबंधांचा आत्मा असतो. आत्मप्रकटीकरण हाच ललितनिबंधाचा गाभा असल्यानें त्याच्या विषयाला महत्त्व नसून, त्या विषयाच्या अनुषंगानें लेखकाचें जें बौद्धिक व्यक्तित्व व्यक्त होत असतें, त्यालाच महत्त्व असतें, तर निबंधांत विषयालाच अधिक महत्त्व असतें. ललितनिबंधांत एकदां विषयाला महत्त्व नाहीं असें ठरल्यावर–किंवा असल्यास तें ए.जी. गार्डिनरनें म्हटल्याप्रमाणें हॅट अडकविण्याच्या खुंटीइतकेंच आहे असें ठरल्यावर, लेखकाचे आत्माविष्कारास वाव देणाऱ्या विषयांतरास लघुनिबंधांत अवश्य स्थान दिलें पाहिजे. या उलट निबंधांत प्रचारार्थ पुनरुक्तीनें तोच तोच मुद्दा मांडावयाचा असल्यानें त्यास विषयांतराचें वावडें आहे. प्रबंधाचें स्वरूप ठरलेलें असतें; प्रथम अवतरण, सुरुवात, दोन्ही पक्ष, खंडन, मंडन व शेवट, परंतु लघुनिबंधांस अशा ठरीव सांच्याचें वावडें आहे. लघुनिबंधाचें स्वरूप जितकें विस्कळित, विषयांतरपूर्ण व नैसर्गिक तितकी त्याची मनोज्ञता वाढते, मात्र अशा विस्कळीत रचनेनें निबंधाची हानि होते. लघुनिबंधांत लेखक आपण वाचकांपैकींच एक आहोंत, त्यांच्याहून ‘ निराळे ’ नाहीं असा भास निर्माण करीत असतो, तर प्रबंधांत लेखक स्वतःला ‘ आम्ही ’ इ. शब्दांनीं अलंकृत करून आपण वाचकांपेक्षां ‘ निराळे ’ आहोंत असा भास निर्माण करीत असतो. सारांश, प्रबंध म्हणजे व्यासपीठावरून केलेलें भाषण असेल, तर लघुनिबंध म्हणजे चांदण्यांत गच्चीवर मारलेल्या गप्पा होत. लघुनिबंधाचें स्वरूप सोप्या रीतीनें असें सांगतां येईल कीं – दोन परस्पर भिन्न टोकें घ्यावयाचीं, व त्यामध्यें आपल्या प्रभावी व्यक्तित्वाची सुंदर मनोज्ञ गुंफण करून, तीं वर वर परस्पर भिन्न दिसणारीं टोकें कलात्मक रीतीनें एकमेकांशीं निगडित दाखवावयाचीं.

लघुनिबंधावर सरळ सरळ आक्षेप कुणींच केलेले नसले तरी अनेक वाचकांच्या मनांत अनेक आक्षेप येऊन जातात. लघुनिबंधाला नांव अगदीं साधं दिलेलं असतं, व तेंहि असं कीं त्यावरून आंतील विषयाची मुख्य कल्पना वाचकांना येऊं नये, व मुख्य कल्पना व लघुनिबंधाचें नांव यांची संगति वाचकांच्या अगदीं उशिरांत उशिरां लक्षांत यावी, व या साध्या नांवांतहि मोठा अर्थ भरलेला आहे असं त्याला वाटावं. परंतु कित्येकदां यामुळें अगदीं साध्या साध्या विषयावरहि लेखन होऊन जातें. तसेंच ‘ पत्र ’ ‘ पत्रांची पेटी ’ हे विषय तर बहुधा प्रत्येक लघुनिबंधकार घेतो. ‘ सुभाषित ’ यावरहि फडके, खांडेकर या दोघांनींहि लिहिलं आहे. संतांच्या ‘ पोस्टाच्या पेटीला ’ तर इतिहासपुराणांतील काव्यमय प्रसंगाच्या जंत्रीचं स्वरूप आलें आहे. सर्वसाधारण वाचकांना सहज येणारे साधारण अनुभव, लहान मुलांचं कौतुक, पत्रांची वाट पहाणं व खेळकरवृत्तीचा कृत्रिम अंगिकारहि लघुनिबंधांत अनेकदां असतो. साध्या साध्या विषयावर उगीचच काव्यमय भाषेचा साज चढवूनहि अनेकदां लघुनिबंध सजलेला असतो. थोरांच्या

बाबतींत आपण म्हणतों कीं some are born great, some achieve greatness, and some have greatness thrust upon them ' लघुनिबंधाच्या बाबतींतहि अगदीं असेंच आहे. कित्येक लघुनिबंध जन्मतःच 'श्रेष्ठ' असतात. कारण त्यांना जन्म देणारी तत्त्वचिंतन व ध्येयवादी दृष्टि हीच श्रेष्ठ असते. तर कित्येक लघुनिबंध, प्रचलित गोष्टी (परंतु विशिष्ट संदर्भांत), इतिहास काव्यांतील संदर्भ, भाषा व विनोद यांनीं 'श्रेष्ठत्वास' नेलेलें असतात, तर कित्येक कृत्रिमतेनें सजलेलें असतात ! म्हणजे समजा, आपल्याला 'माकड' या विषयावर लघुनिबंध लिहावयाचा आहे ! तंत्राप्रमाणें नांव तर अगदीं साधं झालं आहे. आतां या माकडावर खूप मोठा अर्थ आपण लादला पाहिजे ! त्याचा संबंध मानवी संस्कृतीशीं जोडला पाहिजे ! तो अशा रीतीनें जोडतां येईल—" खरोखर ! माकडांत केवढं काव्य भरलेलं आहे ! माकड म्हणजे माणूस ! याच माकडांनीं प्रभु रामाला मदत केली ! म्हणजे यांनींच भारतीय संस्कृति वडविली ! माकड म्हणजे मानवी उत्क्रांतीचा इतिहास ! माकड म्हणजे उत्क्रांति ! माकड म्हणजे श्रेष्ठत्व ! आणि म्हणूनच ! जेव्हां जेव्हां मी माकडाला पहातों, तेव्हां तेव्हां माझें हृदय (उगीचच--) भरून येतं ! व नकळतच माझे हात जोडले जातात !!! ' विनोद सोडून दिला तरी कित्येक लघुनिबंधाची अशी स्थिति झालेली असते. असो.

सध्यां जरी लघुनिबंधाची अशी स्थिति असली तरी हें क्षेत्र नित्यशः वाढत जाईल यांत शंका नाहीं. राजकारणांत नव्या तरुण रक्ताची जशी नित्यशः जरुरी असते तशीच ती साहित्याच्या क्षेत्रांतहि नित्यशः असते. जुनीं मूल्यें, जुनीं तंत्रें व जुन्या पद्धति मोडून साहित्याच्या अनेक क्षेत्रांत सध्यां नाविन्याचा संचार सुरू झालेला आहे. जुने कादंबरीकार कांहींसे मागे पडून नवे लेखक पुढें येत आहेत. नवकवींचें अस्तित्वहि जाणवूं लागलें आहे. नवे लघुकथाकारहि पुढें येत आहेत. मात्र अजून नवे लघुनिबंधकार व नाटककार अस्तित्वांत नाहींत. परंतु साहित्य-शारदेचें हें आव्हान निश्चितपणें नव्या पिढीकडून स्वीकारलें जाईल, व पुनः एकदां शारदेच्या मंदिरांत, ललितनिबंधाच्या दालनांत, लघुनिबंधकाराच्या काव्यमय व्यक्तित्वाचे झंकार निनादूं लागतील व त्या झंकारांच्या तालावर पुनः रसिकांना तल्लीन होतां येईल, अशी आशा करावयास हरकत नाहीं.

---

## निशा संगीत

लेखक :—**ज. नि. लोखंडे**, ज्यु. बी. ए.

'या निशा सर्वभूतानां ........' रात्रीच्या वेळीं जागणारे अनेक प्रकारचे आणि अनेक लोक असतात. यांपैकीं कोणत्याच प्रकारांत कदाचित् तुम्ही बसत नसाल पण शहराच्या गजबजलेल्या आणि मध्यवर्ति भागांत तुम्ही रहात असाल, तर तुम्हांला जागें ठेवून 'संयमी' बनविण्याच्या प्रयत्नांत असलेले अनेक प्राणी आणि गोष्टी—आढळतील. असाच मारून मुटकून 'संयमी'—बनविला गेलेला मी आहें. मी रात्रीं झोपेची आराधना करीत जागतों किंवा जागविला जातों.

आठ-नऊ वाजायला आले कीं रस्त्यावरची रहदारी कमी होऊं लागते. वातावरण शांत होऊं लागतें. अन् घराघरांतून रेडिओ सुरू होतात. आणि सरमिसळ अशा वस्तींतून तुम्ही रहात असला म्हणजे तुम्हांला सिलोन, धारवाड, मद्रास, पुणें आणि उत्तर हिंदुस्थानांतलें एखादें जालंदर सारखें स्टेशन ऐकावयास मिळतें. सिलोनवरचें 'लारालप्पा', धारवाडचें कानडी गाणें, मद्रासी गायकांनीं सप्तस्वरांवर मारलेल्या उड्या, पुण्याच्या शोकान्त श्रुतिका, मुंबईवरचा गुजराथी कार्यक्रम आणि उत्तर हिंदुस्थानांतील 'ऐसी ना मारो पिचकारी कान्हा' म्हणून मारलेली एखादी तान!' अहाहा, आंतरभारतीचें स्वप्न अगदीं साकार झाल्यासारखें वाटतें! रात्री जे विविध ध्वनि तुमची झोंपमोड करायला सज्ज असतात त्याच्यांतला हा पहिला प्रकार, आणि मग तुमचे डोकें ठिकाणावर रहाणार नाहीं याची मी तुम्हांला खात्री देतों. साऱ्या भाषाभगिनींनीं एकत्र नांदावें असें म्हणणारे महाभाग जर स्वतः हा 'कार्यक्रम' ऐकत बसतील आणि माझ्यासारख्या अभागी जीवांना या यातनांतून सोडवितील तर...? अजून आपल्या लोकांना हळू रेडिओ लावायला शिकायचें आहे!

साधारण साडेदहाच्या सुमाराला एकेक रेडिओ थंड होऊं लागतो आणि वातावरणहि शांत होऊं लागतें. आणि मग कधीं कधीं तुमच्या कानवर एक विचित्र आवाज पडतो. दोन मांजरें रडतांना किंवा भांडतांना तुम्ही ऐकलीत? अरे राम! त्यांचें तें ओरडणें, उत्तराला प्रत्युत्तर (बेटीं कशी अगदी आलटून पालटून ओरडत असतात!) आणि विव्हळणें या वेळेपर्यंत तुमची झोंप पार उडालेली असते. एखादी जहांबाज सासू आणि तिची तितकीच खट सून यांच्यांतील भांडणाखेरीज जगांतील दुसऱ्या कोठल्याहि भांडणाशीं त्याची तुलना होऊं शकणार नाहीं!

तुमच्या शेजारीं एखादा संगीतप्रेमी (?) मनुष्य रहात असेल तर या प्रकारची तुम्हांला प्रचीति येईल. आमच्या शेजाऱ्याला ऐन रात्रीच्या वेळीं गाण्याची तयारी करण्याची हुक्की येते आणि कसल्या प्रकारचें गायन? शास्त्रोक्त! आलेंच तुमच्या लक्षांत आजूबाजूच्या लोकांची काय करमणूक (की हाल) होत असेल ती! आणि—यामुळेंच गाण्याची 'तालिम' करणें असें कां म्हणतात, तें माझ्या लक्षांत आलें. ख्रिस्ताला जर असला शेजारी मिळाला असता तर त्यानें उभ्या आयुष्यांत 'शेजाऱ्यावर प्रेम करा' असें म्हटलें नसतें!

आणि तो त्रस्तसमंध कांहीं वेळानें शांत होतो अन् दुसरें एक संगीत सुरु होतें. आजूबाजूच्या घरांतील एखाद्या लहान मुलाचें रडणें! असें जीव खाऊन ओरडत असतें तें मूल कीं बस्! त्याला वाटत असावें —'आराम हराम है' आणि म्हणूनच त्याला येणारी एकमेव गोष्ट तें करीत असावें. पण मग —'आराममें राम है' ही गोष्ट माणसाला आराम न मिळाल्यामुळेंच अधिक पटते. कुठला शहाणा, मुलें हीं फुलें आहेत, असें म्हणाला कुणास ठाऊक?

धाड धाड करीत जाणारी मोटार, नुकताच मोटारसायकल चालवायला शिकलेल्या माणसानें तिचा वाढविलेला आवाज, मरतुकड्या घोड्याच्या नांवानें ओरडणारा स्टेशनरोडनें जाणारा किंवा येणारा टांगेवाला, ऑटोरिक्षा, डासांचें संगीत...सारें तुम्हाला 'संयमी' बनविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत असतात. आणि मध्येंच बारा वाजतां एक रहदारीची लाट येते. सिनेमा सुटल्यानंतर! आणि याच गर्दीतला एखादा रेंगाळणारा माणूस त्यानंतर तासा दोन तासांनीं घरीं जात असतो. त्याला एकदम गाणें म्हणायची लहर येते. अन् आपल्याच तंद्रींत आणि भसाड्या आवाजांत तो गातो 'आवारा हूँ!' खरंच. कांहींच प्रश्न नाहीं. नक्कीच 'आवारा!' अन् अशा माणसावर गल्लींतली सारी वारशीं आणि बेवारशीं कुत्रीं भुंकूं लागतात.

काय झपाट्यानें ती साथ सर्वत्र पसरते! कुणाची नि कशाची आठवण येते माहीत आहे? ... पण तुम्हीच ओळखा ना?

यावेळेपर्यंत माझी झोंप पार उडालेली असते, आणि मग मी एकदम चिडून ओरडतों? " मला झोंप येणार कीं नाहीं?--' जागतिक शांतता ' प्रस्थापित होणार कीं नाहीं? "

---

# [] वटवृक्षाचें आत्मवृत्त []

लेखक:—**विजया देशपांडे,** एफ्. वाय्. आर्ट्स (क)

**' असार जीवित! केवळ माया! ' रडगाणें हें गाउं नका!**

खरंच! कै. ह. ना. आपट्यांनीं किती योग्य असे हे काव्योद्गार काढले आहेत. वास्तविक आमचें जीवन किती रूक्ष! कोणाचें नको पोट भरायला किंवा शब्दानें सहानुभूति दाखवितां यायला! नुसतं एरंडासारखं वाढायचं. काय अर्थ आहे त्यांत? मानवी प्राण्यांच्या वस्तींत —पुण्यासारख्या शहरांत प्रामुख्यानें आढळणारी एक प्राण्यांची जात, जिला ' ढेकणाचा बुजबुजाट ' म्हणतात, तिच्याप्रमाणेंच--आम्हीहि निरर्थक वंशवेल वाढवावी. काय उपयोग? ... पण नाहीं; मुळींच नाहीं. हा क्षुद्र विचार कस्पटाप्रमाणें झटकलाच पाहिजे. जगांत किती उच्च विचारसरणी दिसून येते. मलाहि असेंच म्हटलें पाहिजे कीं, –' हललें हृदयीं कांहीं। निनादले स्वर देहीं ॥ ' – पण या स्वरांचा प्रतिध्वनि प्रत्यक्षांत उमटत असेल ना? कै. ह. ना. आपट्यांच्या सांगीप्रमाणें, ' काय हें जीवन! ' असें म्हणत सुस्कारे टाकण्यानें काय होणार?

तसं म्हटलं तर आम्ही – वटवृक्षांनीं किती समाधान मानून घ्यायला पाहिजे. या श्रेष्ठ, उपयुक्त स्थळीं – नव्हे कुळीं जन्मास येण्याबद्दल! वटवृक्ष-कुळ किती नामांकित, उच्च! यमराजाला चातुर्यानें शब्दांत पकडून जिंकणाऱ्या पतिव्रता, सुशील सावित्रीचा दीर्घायुषी (की, अल्पायुषी) पति सत्यवान् याचा मृत्युकाल समीप आला असतां ज्याच्या आश्रयाखालीं, ज्याच्या आधारानें निजला, तोच हा – माझ्या पूर्वजकुलांतील एक भाग्यवन्त वटवृक्ष! म्हटलेंच आहे – पूर्वजें सत्कर्म केलें। फळ घेतलें बाळें॥ ' याबरहुकूम आर्यस्त्रिया आमची पूजा – आमच्यांतील श्रेष्ठत्व मानून पूजा करतात. त्यावेळीं मला, शिवाजीच्या वंशजांनीं शिवाजीचा, आपल्या कुळाचा अभिमान धरावा, तसा अभिमान वाटतो.

धार्मिक दृष्टयाच काय, पण राजकीय तत्त्वप्रणालीला योग्य असें आचरण आम्ही ठेवतों; तें म्हणजे ' समता. ' मानव–पशु–पक्षी कोणीहि आमच्याकडे येवो; आम्ही त्याला आसरा देतों. माझा तर देहविस्तार इतका भव्य आहे कीं, माझ्या नुसत्या छायेमध्यें कित्येक मानवी प्रवासी येऊन आराम करूं शकतात. पण जो तो आपल्या कर्मानें उपभोग घेतो, खरें ना? म्हणूनच मानव, पशु ह्या कोटींतील प्राणी शीण उतरतांच निघून जातात, उत्साहाचें लेणें घेऊन त्या शांत छायेचा त्याग करतात. कांहीं प्राणीमात्र कृतघ्नतेनें माझ्या श्रेष्ठत्वाची कदर न करतां आसपास घाण करून ठेवून जातात. पण जाऊं द्या! ' सुख सांगावें जनां। दुःख सांगावें मना॥ ' माझ्या

अंगाखांद्यावर खेळणाऱ्या, पोसल्या जाणाऱ्या पक्ष्यांच्या गोड किलबिलाटानें मन मोहरून जातें. अशा वेळीं ह्या छोट्याशा जीवांना कांहींतरी खाऊ द्यावासा वाटतो. मग मी पर्णांचीं कपाटें उघडून त्यांना लाललाल व गोड चवीची फळें देतों. हो ! मी मानवांना व पशूंना जरी कृतघ्न म्हटलें तरी माझें प्रेम सर्वांवरच आहे. त्या मुक्या पशूंना तरी काय कल्पना होणार माझ्या अंतःकरणाची ? त्यांनाहि मी माझीं ओलींसुकीं पानें देतों. वाटतं, ' तुम्हीहि संतुष्ट व्हा. ' आणि मानव तर काय ? प्राणीमात्रांचा राजा. तेव्हां त्यांना कांहींतरी अल्पस्वल्प नजर करायलाच हवें. माझ्या सुंदर पानांचा त्यांना खूप उपयोग होतो. तो म्हणजे पत्रावळींसाठीं. पण खरं म्हणायचं म्हणजे मनुष्यप्राणी माझ्या क्षुद्र पानांचाहि उपयोग करून घेतात. नाहींतर तीं पानें जीर्ण-शीर्ण होऊन वायूबरोबर पाचोळा म्हणून उडून गेलीं असतीं. किती उपकार ह्या मानवाचे कीं त्यांनीं मला अशा तऱ्हेनें मान दिला. त्यांच्यासाठीं मी जरी माझें कातडें सोलून दिलें किंवा रक्त जरी आटविलें तरी तें यःकश्चित् ठरेल. हो, पण माझ्या कातड्याचा, सालीचा आणि रक्ताचा-चिकाचा उपयोग त्यांनीं औषधीसाठीं केलाच आहे.

सांगा, मग मी कां म्हणूं ' असार जीवित ! केवळ माया ! ' ? छे ! छे ! जन्मास आलेल्या प्रत्येक जीवाचा, प्राण्याचा, वस्तूचा उपयोग असतो, हा सिद्धान्त काय खोटा आहे ? मी तर हा सिद्धान्त सदैव प्रतिपादत राहीन आणि माझ्या वंशवेलींना-माझ्या पारंब्यांना हाच संदेश देत राहीन कीं—उत्तिष्ठत जाग्रत—

---

# आनंदवनभुवनाची राजधानी

लेखकः—**मुकुंद ब्रह्मे**, साहित्य प्राज्ञ, इन्टर सायन्स ए

सायंकाळची वेळ होती. मागल्या अंगाच्या पर्वतराजीआड सूर्य झांकळला होता व संधिप्रकाशांत डोंगरमाथ्यावरील झाडीं महिरपी तयार केल्याप्रमाणें भासत होती. पुढल्या अंगास-ध्यानस्थ रायगड अधून मधून दर्शन देत होता. चिमुकल्या कोंझरमधून गडाच्या चढणीस सुरुवात झाली. परंतु आतां मात्र दुर्गराजाचा माथा अदृश्य झाला. आकाशाच्या निळ्या चांदव्यांत सुळके खुपसून उभा असलेला हा डोंगर पहातांच, वर प्रचंड राजवाडे व तट असतील असें चुकून सुद्धां वाटलें नाहीं. डोंगरमाथ्यावर हळूंहळूं आम्ही वर चढूं लागलों व झाडींतून अंधारानें झराझरा जाळें विणण्यास सुरुवात केली. नुकतीच वळवाची सर येऊन गेली होती व काजव्यांनीं रान भरून राहिलें होतें. क्षणांत त्यांचे थवे इकडून तिकडे जात तेव्हां विद्युल्लता चमकल्याचा भास होई. चंदेरी बुट्ट्यांच्या आवरणानें सारीं वृक्षराजीं जणूं आच्छादली होती. पानापानांतून काळोख ओसंडत होता व काजव्यांचें कायातेज सर्वत्र विखुरलें होतें. दुर्गराजाच्या कुशींत पायथ्यापासून सुमारें तीन मैलावरील पाचाड गांव शक्यतों गांठावें हा आमचा प्रयत्न होता. परंतु काजव्यांमुळें चांगलीच फसवणूक होत होती. पुढल्या वाकणावर गांवचे दिवे दिसतात असें वाटावें, उत्साहानें तेथपर्यंत जावें तों काजव्यांचा थवा भुर्रकन् उडून सगळीकडे दाट काळोख व्हावा असें चाललें होतें. अंधारामुळें पायाखालची वाट जेमतेम दिसत होती. वाट तर संपेना. उत्साह अगदीं मावळण्याच्या

बेतांत आला होता. इतक्यांत झाडींतून हळी दिलेली कानावर आली तेव्हां सर्वांनीं समाधानाचा सुस्कारा सोडला. साधारण दरडीवर गडाचा रखवालदार व इतर चार पांच पहाडी लोकांच्या मिळून झोपड्यांचा थवा दृष्टीस पडला. रात्रीचा गार वारा सुटला होता तरी सारें अंग घामानें निथळून निघालें होतें. रखवालदारानें पाणी आणून देतांच किती पिऊं नि किती नको असें झालें. बऱ्याच वेळानंतर मऱ्हाठमोळ्या मनाचा घरोबा तेथें आढळून आला.

रात्र बरीच झाल्यामुळें तेथेंच मुक्काम करावा असा बेत ठरला. दिवसभराच्या श्रमानें अतिशय ग्लानि आली होती. संपूर्ण निद्रा नाहीं व पूर्ण जागहि नाही अशी अर्धवट स्वप्नवत् स्थिति झाली होती. रखवालदारानें दिलेल्या घोंगडीवर पाठ टेकवून शांतपणें मीं आकाशाकडे पहात होतों. आभाळाच्या धूसर चांदव्यावर आतां ताऱ्यांची प्रभावळ जमल्यानें तो अधिकच वैभवशाली दिसत होता. चांदणें अगदी नितळ होतें. ज्योत्स्नेच्या झिरझिरित वस्त्रांतून आसपासचें वातावरण कसें प्रशांत वाटत होतें. उजव्या अंगाला गडाचा माथा अस्पष्ट दिसत होता. मूक राहून तो सर्वांना सन्निध पाचारण करीत होता. काजव्यांची गुणगुण साऱ्या वातावरणांत भरून राहिली होती. खालच्या बाजूस उतारावर ठिकठिकाणीं रान पेटलेलें होतें. रात्रीच्या निस्तब्ध वातावरणांत जिवंतपणाची तेवढीच एक जाणीव होती. चोहोंबाजूनीं लहान मोठ्या सह्याद्रीच्या फाट्यांनीं फेर धरला होता व मध्यभागीं हा प्रचंड दुर्गराज पहुडला होता. हळूं हळूं चांदणें विरळ होऊं लागलें. धूसरता क्षणोक्षणीं वाढूं लागली व दुर्गाच्या त्या कुशींत निद्रेचें पाश केव्हां गळ्यांत पडले तें उमजलें देखील नाहीं.

कोंबड्याच्या आरवण्यानें भल्या पहांटेच जाग आली. झोपेंचा वारा पिवून आतां पुढें धावायला मन उत्सुक होतें. अचर सृष्टि अजून अर्धवट निद्रेंतच होती. पहांटेचा ढवळा प्रकाश देखील डोंगरापलीकडे अजून रेंगाळत होता. आमच्या आधींच रखवालदाराचें सारें कुटुंब जागें होऊन कामास लागलें होतें. भातसडीचा धप् धप् आवाज, गाईंचें हंबरणें व अधूनमधून खालून आलेली एखादी ललकारी यांमुळें वातावरणांत उल्हास भरून राहिला होता. समोर टाकलेल्या जीर्ण दुर्गावर भराऱ्या मारण्यास मन कसें आतुर झालें होतें. थोड्याच अवकाशांत रखवालदाराचा निरोप घेऊन आम्ही पुढल्या मार्गास लागलों. झाडीमधून हळूहळूं धवल प्रकाशाचा पदन्यास सुरू झाला. विहंगांचें स्वर्गीय गुंजन पिऊन कान तृप्त झालें. हा विहंगवृंद म्हणजे वन-सृष्टीचे भाट! त्यांची स्तुतिस्तोत्रें समजावून घेण्याचा प्रयत्न मन करीत होतें. जसजसें आम्ही पुढें जाऊं लागलों तसतसा चढ जाणवूं लागला. नागमोडी वळणावळणांनीं आम्हीं चित् दरवाजाशीं येऊन पोहोंचलों. दरवाजाच्या वरच्या अंगास 'खूबलडा' बुरजानें डोकें वर काढलें होतें. **चित् दरवाजा** म्हणजे रायगडची वेसच! येथून गडाची खरी चढण सुरू होते. सूर्याची सोनेरी किरणें, ह्यावेळीं गडाला मुलामा देत होतीं. समोर प्रचंड दुर्ग व त्यामागें रविराज अशी स्थिति असल्यानें किल्ल्यावरील तट व बुरूज यांना पिवळसर प्रकाशाची पार्श्वभूमि मिळून ते अधिकच उठून दिसत होतें. दूरवर एका अंगाला **टकमक टोंक** दिसत होतें व उजव्या अंगाला दूरवर **हिरकणी बुरूज** दिसत होता. यापुढील वाट नागिणीसारखी कड्यांच्या खांद्यावरून गेली होती. गडाचा मुख्य दरवाजा कोठें असावा याची अजूनहि नीटशी कल्पना येत नव्हती. वर माथ्याकडे दृष्टि टाकली व तत्क्षणीं खालीं नजर गेली कीं, खोलदऱ्या व तुटलेले कडे यांनीं ऊर दडपून जात होतें. एके काळीं छत्रपतींना राज्याभिषेक या गडावर झाला. डोली, मेणे, पालख्या

हत्ती, घोडे यांची सारखी रहदारी गडावर चालू होती. ही रहदारी या वाटेनें चालू असेल यावर विश्वासच बसत नाहीं. दुसरा मार्ग म्हणावें तर गडाला येवढी एकच वाट आहे म्हणून अनेक ठिकाणीं उल्लेख आढळतो. त्या अवघड नागमोडी वाटेचें अवलोकन करीत मन पुढें धावत होतें. प्रत्येक वळणावर आधीं जावून पुढें डोकावून पहाण्याची उत्सुकता त्याला लागली होती. अखेर काळ्या फत्तरांचे दोन बुरूज व त्यामधील चिंचोळा पण भव्य दरवाजा दृष्टीस पडला. चढ संपला म्हणून मोठें हायसें वाटलें पण प्रमुख भाग अजूनहि वरच होता. दुरून बुरुजांच्या भव्यतेची कल्पना येणें शक्य नव्हतें. पण प्रत्यक्ष दरवाजाच्या उंबरठ्यांत बसून दोन्हीं अंगांचें दोन बुरुज त्यांचें प्राचंड्य व अभेद्यता पाहून मन थक्क होतें. जें बांधकाम पुण्याच्या शनिवारवाड्यांत पेशवे करूं शकले तेवढें भव्य व अभेद्य तट व बुरुज या कड्यावर कसे उभारले असतील याची कल्पनाच करणें दुर्घट होते. रानावनांतील या अवशेषांकडे पाहिलें तर त्यांत प्राचीन स्थापत्य-शास्त्राचें केवढें विशाल दर्शन आपल्याला होतें हें कोणी विचारांत घेतलें आहे काय ? आमच्या पूर्वजांच्या हातीं जी कला होती ती आज आमच्यांत नाहीं. स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासांत आयुष्याची पहिली उमर खर्चून आम्हीं संपादन केलेलें ज्ञान या अवशेषांत लपलेल्या कुसरीपुढें किती तोकडे वाटतें ! हा विरोधाभास मनांत कायमचें घर करून राहिला. ह्यावेळपर्यंत आम्ही गडावरील वसतिगृहापर्यंत येऊन पोहोंचलों होतों. गडावरील प्रवाशांसाठीं बांधलेलें ठिकाण व आसपासची चोख व्यवस्था पाहून मला सर्वांत आश्चर्य वाटलें. आजपर्यंत अनेक गड पायाखालीं घातलें. केवळ मनाच्या अतृप्त आकांक्षेच्या बळावर गड पहाणें म्हणजे जीवाची लाहीलाही करून घेणें हें जणूं ठरल्यासारखेंच झालें होतें. पण रायगडाच्या बाबतींतील अनुभव मात्र अगदीं भिन्न होता. गाद्या, रुजामे, पलंग येथपासून पाणी प्यावयाच्या फुलपात्रापर्यंत सर्व सामान प्रवाशांसाठीं मोफत मिळण्याची सोय पाहून कां आश्चर्य वाटणार नाहीं ? वसतिगृहाच्या खोलींत सामान ठेवून अखेर समाधानाचा सुस्कारा सोडला. आमच्यापैकीं कांहींजण न्याहरीच्या तयारीला लागले. स्वस्थ बसवेना म्हणून मी सहज फेरफटका करण्यास निघालों.

रायगडावरील रत्नभांडार माझ्यासमोर खुलें होतें, व डोळे सौंदर्यपानांत गुंग झालें होतें. जरा पुढें जातांच गंगासागर तलावाचें नयनरम्य दृश्य समोर दिसलें. दुर्गांच्या एका दरडीमागून सूर्यनारायणाचें प्रथमच दर्शन झालें होतें. त्याच क्षणीं कानाऐवजीं दोन डोळें अधिक असतें तर फार बरें झालें असतें असें वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. तलावाच्या निळसर, निस्तब्ध जलाशीं उगवत्या किरणशलाकांचा खेळ चाललेला होता. तलावाला लागून दोन मनोर निळ्या पाण्यांतील आपलें प्रतिबिंब न्याहाळीत होतें. कधींकाळीं शिवराय देखील चवऱ्यांच्या झोतांत एकाग्रचित्त होऊन सायंकाळीं याच मनोऱ्यांच्या एखाद्या कमानींतून गंगासागर तलावाची ही शोभा अवलोकन करीत असतील असा विचार मनांत चमकून गेल्याखेरीज राहिला नाहीं. तलावाचें पाणी देखील निर्मळ, थंड व गोडीला कांहीं वेगळेंच लागलें. सिंहगडावरील देवटाक्याची व प्रचंडगडावरील पद्मावती तलावाची मला आठवण झाली. तलावाचा विस्तार बराच असून आजूबाजूस खडकांची दाटी आहे. मनोऱ्यांच्या दोहों अंगांस राजवाड्याचे तट दृष्टिपथांत येत होते व जवळच आंत शिरण्यासाठीं असलेला प्रचंड दरवाजा होता. तलावांत डुंबण्याची उत्कट इच्छा झाली होती पण जवळ असलेला सूचना फलक पाहून तो मोह आवरावा लागला.

कासराभर दिवस वर आला • अन् न्याहारी आटोपून आम्हीं 'आनंदवन भुवनाची'

राजधानी पहाण्यास निघालों. प्रथम तलावाच्या कांठाकांठानें राजवाड्याकडे मोर्चा वळविला. गडावरील प्रत्येक दरवाजाला २ आडवे लोखंडी गज दीड फुटाच्या अंतरावर मध्यभागीं लावलेले आढळले. चौकशी करतां कळलें कीं गुरांनीं आंत जाऊन अवशेषांची नासाडी करूं नये म्हणून ती व्यवस्था करण्यांत आली होती. आम्ही ज्या दरवाज्यांतून आंत शिरलों तिकडे राजवाड्याचा पार्श्वभाग होता. आंत शिरतांक्षणींच उजव्या बगलेला आठ राण्यांचे वाडे ओळीनें बांधलेले आढळले. आठ महालांचे जे कांहीं अवशेष राहिले आहेत त्यावरून त्यांच्यांतील कमालीचें साम्य लक्षांत येतें. या वाड्यांच्या परिसरांत धान्याचीं व दारूगोळ्याचीं कोठारें, व पेवें आढळतात. त्यांच्या अग्रभागीं खलबतखान्याचें बरेंच अवशेष शिल्लक आहेत. बांधकामांतील टिकाऊपणा व ठसठशीतपणा हें दोन विशेष लक्षांत घेण्यासारखे आहेत. राजवाड्याच्या या भागांतून पुढें गेलें कीं, राजदरबाराचा पार्श्वभाग दृष्टिक्षेपांत येतो. राजघराण्यांतील मंडळी, स्वतः महाराज व अष्टप्रधान यांनीं येऊन स्थानापन्न होण्यासाठीं जे मार्ग आहेत तेथून आंत जातांक्षणींच विशालदरबाराचे अवशेष नजरेंत भरले. मन वेधून घेणारी पहिली गोष्ट म्हणजे दरबाराचा प्रवेशदरवाजा. काळ्या पाषाणांनीं मढलेला तो विशाल दरवाजा आज चांगल्या स्थितींत आहे. मुंबईबंदरांतील 'गेटवे ऑफ इंडिया' च्या चतुष्कोणी दरवाजाची आठवण मला झाली. अगदीं त्याच प्रकारची बांधणी येथें आढळून येते. द्वाराच्या अग्रभागीं अश्वगजादींच्या आकृति पाषाणांत खोदलेल्या आहेत. उजव्या व डाव्या बगलेच्या दोन कमानींतून नगारखान्यांत जाण्यासाठीं जिने आहेत. नगारखान्याच्या मध्यावर ध्वजारोहणाची जागा आहे. आज ध्वजस्तंभ बोडकाच आहे, पण राज्याभिषेकाच्या दिवशीं भगवा ध्वज येथें किती डौलानें फडकला असेल हें मनांत येऊन मस्तक आपोआप झुकलें व महाराष्ट्राच्या जरीपटक्यास मनोभावें प्रणाम केला.

नगारखान्यांतून दरबारचें दिसणारं विहंगम दृश्य मोठें विलोभनीय व मनाची पकड घेणारें होतें. दर्शनी दरवाजांतून सुमारें १०० यार्डांवर सिंहासनाचा चबुतरा दिसतो. आज तेथें चौथराच शिल्लक आहे पण ज्याला महाराष्ट्राचा इतिहास ज्ञात आहे त्याच्या नजरेसमोर राज्यारोहणाचा सोहळा उभा राहतो. या पवित्र सिंहासनावरच काशीच्या विद्वान पंडितांनीं गीर्वाणमंत्रांच्या उद्घोषांत गंगा–यमुनेच्या पवित्र जलानें महाराजांना अभिषिंचन केलें असेल. हें चित्र मनःश्चक्षूसमोर येतांच मस्तक विनम्र होतें. सिंहासनाच्या पुढील दोही अंगांस अष्टप्रधानांच्या आठ जागा व त्यांसमोरील गवाक्षें आजहि दिसतात. त्याच्या मागें जनानखाना बसण्यासाठीं जागा आहे. दर्शनी दरवाजा व सिंहासन यामध्यें विस्तीर्ण आवार असून त्याच्या चारी बाजूनें चौथरे बांधून काढले आहेत, व मधला भाग मानकऱ्यांसाठीं आहे. सिंहासनाच्या चबुतऱ्यावरून बोललेल्या शब्दाचा प्रतिध्वनि दरवाजांतून येतो. दूरध्वनिक्षेपकाची उणीव तेथें अशा तऱ्हेनें भरून काढलीं आहे. संपूर्ण रायगडावर मन उद्विग्न होत असेल तर ते येथें. राजवैभवाचें तें भयाण अवशेष आज धूळखात तेथें पडले आहेत. त्यांची योग्य ती निगा ठेवून त्यांची महति ध्यानांत घेणारे फारच थोडे. प्रतापगडावर हाच प्रकार. अफझलखानाची कबर चांदीनें मढवली आहे. अत्तरांच्या सुगंधानें शामियाना सदैव दरवळलेला असतो, तर अंबिकेच्या देवळांत आरतीस फुटकी वाजंत्री व धूपाची सुद्धां वाण भासते. जिचा शुभाशीर्वाद घेऊन महाराज अफझलखानाच्या भेटीस गेलें त्या या महाराष्ट्राच्या कुलदैवताची काय ओज आम्ही ठेवली आहे!

रायगडावरील सिंहासन तर मूर्तिमंत उज्ज्वल व ज्वलंत स्फूर्तिस्थान आहे. स्वातंत्र्यसूक्तें

गाणारांनीं या स्थानाचें एकदां अवश्य दर्शन घ्यावें अशी या ठिकाणाची महति आहे. सामान्य माणसाच्या नजरेंत यांतील स्फूर्तिदर्शन भरत नाहीं, परंतु खऱ्या महाराष्ट्रीयाला तेथें स्फूर्तीचा जिवंत झरा आढळल्याखेरीज रहाणार नाहीं. एके काळीं येथें निनादलेल्या दुंदुभी दिल्लीपर्यंत ऐकूं गेल्या होत्या. एखाद्या जीर्ण अंधाऱ्या गवाक्षांतून अचानक दोनचार पांखरें फडफड करीत जावीत, त्याप्रमाणें वरील विचार सांखळीप्रमाणें मनांत चमकून गेले. त्याच क्षणीं महाराष्ट्राचा इतिहास जगविणाऱ्या अनेक थोर विभूतींची पुण्यस्मृति मला झाली. कल्पनाशक्ति सह्याद्रीच्या तावडींत सांपडली कां सह्याद्रि तिच्या तावडीत सांपडला हें कोडें शिवरामपंत परांजप्यांना कां पडलें असावें, हें मला तेथील वातावरण पहातांच चटकन् उमगलें. महाराष्ट्राचा इतिहास गोळा करणें हें एक पवित्र कार्य आहे अशी भावना असणाऱ्या थोर व्यक्तींपैकीं इतिहासाचार्य राजवाड्यांची आठवण मला प्रकर्षानें झाली. पिता, पितामह यांच्या श्राद्धदिनाप्रमाणेंच नियमानें शिवछत्रपतींचें श्राद्ध घालणारी कर्मठ मूर्ति माझ्या नजरेसमोर आली. महाराष्ट्रावर त्यांचे किती उपकार आहेत याची जाणीव मला त्यावेळीं झाली. किल्ले, राजवाडे, घळी, घाट पायीं तुडवून अनेक दप्तरें हस्तगत करून आयुष्यभर इतिहासाला वाहून घेण्यामागील त्यांची मनीषा आज मला उलगडली. गडावरील दगडादगडांत आपलेपणा भरला होता. इतिहास सांगण्याची त्याची उत्कट इच्छा होती पण ते मूक होते. अहिल्येसारखी त्यांची स्थिति होती. त्यांना बोलते करणाराची वाट पहात उन्हापावसांत ते अजून तग धरून उभे आहेत–रहातील. त्यांच्यांतील इतिहास वाचणारांची ते आतुरतेनें वाट पहात आहेत. याप्रमाणें विचारांचा ओघ पुढें पुढें जात होता.

सिंहासनासमोर आपण कितीवेळ उभें आहोंत याचें मला भान राहिलें नव्हतें. दर्शनी दरवाजांतून बाहेर पडतांक्षणींच एक मैल लांबीची दुतर्फा दुकानें असलेली भली मोठी बाजारपेठ भग्नावस्थेंत दिसली. प्रत्येक दुकानाच्या मांडणीचा थाट एकच. एक एक खणाएवढ्या काळ्या विटांनीं सारी पेठ बांधून काढलेली आहे. इंग्रजांनीं तोफा डागून तिचा विध्वंस केला. मनाला अगदीं चीड येते. इंग्रजांच्या कुदळी हें बांधकाम नष्ट करण्यास असमर्थ ठरल्या म्हणून त्यावर तोफा डागल्या. अरेरे हतभाग्यानों, त्या तोफासुद्धां हृदयाचें शतशः तुकडे झाल्याप्रमाणें विदीर्ण होत्सात्या आग ओकल्या असतील. इंग्रजांनो तुम्ही धूर्त एवढें मात्र खरें! आमचें स्फूर्तिस्थान कोठें आहे हें तुम्ही नेमके हेरलेत. या दगडादगडांत स्वातंत्र्यसूक्तें खोदलीं आहेत हे तुम्ही बरोबर ओळखलेंत. आम्हांला नामर्द बनविण्याचा उत्तम मार्ग तुम्ही शोधलांत. अन्यथा केवळ या वास्तुदर्शनानें हजारों वीर निर्माण होऊन तुमचें पाऊल येथें रहातेंच ना? या राजवैभवाची ही धूळधाण होत असलेली पाहून अचर सृष्टि देखील धाय मोकलून रडली असेल, पण तुम्ही कसले निष्ठुर. शनिवारवाड्याचे सातहि मजले तुम्ही जाळून आज काय ते निष्प्राण धूड मागें ठेवलें आहे. विचारशलाका अधिकाधिक प्रसरत होती. दुरून राजवाड्याचा दरवाजा अत्यंत आकर्षक व मनोवेधक दिसत होता.

नंतर आमचीं पाउलें महाराजांच्या समाधीकडे वळली. ज्या पुण्यपुरुषाच्या कर्तबगारीनें महाराष्ट्राचें स्वरूप पालटून आनंदवनभुवन झालें तो युगपुरुष ज्या ठिकाणीं शांत निद्रा घेत होता ती जागा पहातांना हृदय आंदोळून गेलें. पूर्वीपासूनच तेथें असलेल्या शिवालयासमोर ही समाधि आहे. मंदिर दुरून अगदी मशिदीप्रमाणें वाटतें. वरील घुमट व बाजूचे मनोरे मुसलमानी पद्धतीचे

आहेत. मंदिरांत पाऊल टाकतांच मन एकदम प्रसन्न झालें. साऱ्या गडावरील शांति जणूं त्या देवालयांत एकवटली होती. नंदादीपाच्या मंद प्रकाशांत त्या पुरातन शिवपिंडीचें दर्शन झालें, व मनांत भक्तिभाव वृद्धिंगत झाला. शिवरायाला या दैवतानें अनेकदां आशीर्वचें दिलीं असतील. ज्या शिवाचा अवतार म्हणून छत्रपति समजले जातात त्याच महेशाच्या चरणाशीं त्यांची समाधि बांधण्यांत मोठें औचित्य दिसून येतें. प्रत्यक्ष समाधि पहातांना तर मनाचा विलक्षण कोंडमारा झाला. महाराजांच्या अंतःकाळचा प्रसंग नजरेसमोर येऊं लागला. चराचरसृष्टीची अवस्था त्यावेळीं काय झाली असेल या जाणीवेनें अंतःकरण जड झालें. भडाग्नीच्या अस्मानांत जाणाऱ्या ज्वाळा पाहतांना साऱ्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाट वाहात असतील, परंतु त्यानें त्या ज्वाळा थोड्याच शमणार ? उलट त्यांनीं प्रत्येक हृदयांत दुखाग्नि प्रज्वलित केला. दूर एकीकडे जाऊन मनसोक्त अश्रविमोचन करावेंसें मला वाटलें. "शिवरायाचा आठवावा प्रताप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं ॥" याखेरीज दुसरें काय करतां येण्यासारखें आहे ?

महाराजांच्या समाधिसमोरच त्यांच्या लाडक्या वाघ्याची समाधि आहे. या इमानी मुक्या प्राण्याची स्वामिनिष्ठा ज्वलंत होती. महाराजांच्या मृत्यूनें सर्वांपेक्षां त्याला दुःख होऊन जळत्या चितेंत त्यानें उडी घेतली. जन्मभर त्यांच्या सान्निध्यांत राहून अंतःकाळीं देखील तें इमानी जनावर त्यांच्या सोबतीस गेलें. चबुतऱ्यावर असलेली वाघ्याची प्रतिमा पाहून नकळत दोन अश्रुबिंदु त्यावर ठिबकले. महाराजांच्या लाडक्या प्राण्याला ती श्रद्धांजलि होती. मन अत्यंत उद्विग्न झालें. पिसाटासारखें तेथेंच बसून रहावें असें वाटत होतें. गडावर अधिक हिंडण्याची इच्छाच होईना. महाराजांच्या समाधीला वंदन करून पावलें बाहेर वळलीं पण मन मात्र सारखें आंत घोंटाळत होतें. या महापुरुषाच्या योगानें पावन झालेल्या महाराष्ट्रभूंत आपण जन्मलों याबद्दल धन्य होत्साते आम्ही वसतिगृहांत परत आलों.

मध्यान्हीला गड उतरण्यापूर्वी रखवालदारानें प्रतिवृत्ता ( रिपोर्ट ) साठीं वही पुढें केली. त्यांत काय लिहावें नी काय नको असें होऊन गेलें. मन सुन्न झालें होतें. अखेर कर्तव्यबुद्धीनें किल्ल्यावरील चोख व्यवस्थेबद्दल प्रशंसनीय उद्गार काढून मी नोंदवही परत केली. दुपारींच गड उतरण्यास आम्हीं सुरुवात केली. परततांना मनाची जी विचित्र स्थिति झाली ती वर्णन करतां येणार नाहीं. पाचाडला रखवालदाराचा निरोप घेतांना देखील मन भरून आलें. कोंझरपर्यंत उतार उतरून आम्हीं केव्हां आलों हें माझें मलाच समजलें नाहीं. पुन्हा पूर्ववत् दुर्गराज दुरून दिसत होता. आम्हीं त्याच्या माथ्यावर हिंडून आलों हे खरेंसुद्धां वाटत नव्हतें. सायकलींवर टांग टाकून महाडच्या दिशेनें आम्हीं निघालों. चाके गरगरां फिरत होतीं. मैलाचे दगड मागें पडत होते. गडापासून आम्ही दूर दूर चाललों होतों, पण मन मात्र त्या भग्न दुर्गावर घिरट्या घालीत होतें.

---

# त्रायस्व मित्राद्विभो

लेखकः—वा. का. क्षीरसागरः, इंटर आर्ट्स बी.

अतीते किल हायने ग्रीष्मेऽतिभीष्मे निशीथिन्यामेकस्यां स्वसदनाट्टालिकायां जलधाराऽसकृत्सेकापनीतपरितापायामास्तीर्णे कटे सुखमधिशयानः सार्धैकादशवादनावसरे द्वारि कश्चन ध्वनिमश्रौषम्। तदा सपद्येव च निद्राभङ्गप्रकुपितमानसः सनासाक्षिसङ्कोचं 'कः कोऽत्र भोः' इत्यप्राक्षम्। 'त्वदीयः श्वशुर' इति समासादितं परिहासविजल्पितम्। अन्तर्हत्यातितापदं सन्तापं द्वारमुदघाटयम्। पश्यामि तावद्दृष्टिगोचरमयान्माधवः। स चागत्य सधूलिपुञ्जपिञ्जरितपदशरित्राणं निःसङ्कोचं निपत्य मत्पर्यङ्के सप्ततल्पहास्यनिनादाच्च विगलितातिताम्बूलधूमपानादिकसेवनताम्रदशनपङ्क्तिः प्रकटितत्रासमाश्रितजोषं मामवेक्ष्यावादीत्–'कुद्धेन त्वया भाव्यम्। अरे, इदानीं केवलं द्वादशवादनसमयः एव संवृत्तः। आगम्यतां मया साकम्।' किन्तु किञ्चिद्विचार्य पुरतः प्रोवाच–'अथवा तिष्ठतु आगमनम्। श्रान्तोऽसि। त्वं तावन्मे प्रियसखः। तदा मदर्थे कार्यमेकमवश्यं कर्तव्यम्।' प्रागेव मया ज्ञातं यद्यथाऽयं महाभागोऽद्य लाङ्गूलं चालयति तथा तत्र किञ्चिदुपन्यस्तं स्यात्। अतः पुरस्तात्सावधानोऽभवम्–'भवान् पश्यत्येव यन्मत्परित्राणमिदमत्यन्तमुपयोगानर्हम्। श्वस्तावत्केनापि धनिनाऽभ्यागतेन सह चित्रपटं द्रष्टुं गमिष्यामि। तदा––

किन्त्वधिगततदाशयः पूर्वानुभवावगततत्प्रकृतिः सक्रोधं सकम्पं च न्यगदम्–'न कदापि दास्यामि पादत्राणम्। यतः दिनद्वयात्प्रागेव मया तत्परिक्रीतमासीदापणाद्विपणौ। अतस्तन्मेऽत्यन्तं प्रियम्। किन्तु ह्य एव सायं ममाधन्यतयाऽनेन तद्दृष्टम्। अन्ततश्चाधुना सङ्कोचशीलं मामनुनीय कथञ्चित्तद्गृहीत्वाऽसौ गृहं गतः। ननु कथयत वाचकमिश्राः, किं कर्तव्यमिदानीमिति। सम्पीडितोऽस्मि खल्वेतेनामित्रवदाचरता मित्रपरिवारेण। अत एव च हताशेन मया प्रार्थितम्–'त्रायस्व मित्राद्विभो' इति।

येन महाभागेन लिखितम्–'कर्तव्याः सुहृदो बुधैः।' तेन नूनं वनौकसा मित्रविरहितेन भाव्यम्। स कदाचिदद्य पुनरुत्पत्स्यते तर्हि 'अकार्याः सुहृदो बुधैः' इति भणिष्यति। यत इदानींतने जगति मित्रचिकीर्षवो न बुधाः किन्त्वबुधा एवेति अपि च सुहृदः सु-हृदो न किन्तु दु-र्हृद एवेति स्वानुभावपरिपुष्टं मे दृढं मतम्। साम्प्रतं सुहृदो बदरिकाकारा बहिरेव मनोहराः। एतादृशानां सख्यं पात्रमप्यपात्रीकरोति। गुणान् दहति। स्नेहमाशु विनाशयति। अमले मलं नियच्छति।

कस्मादपि कालात्प्राक् कानिचिन्मासिकानि नूतनानि वाचनस्य हेतोरानीतानि। अथ कश्चन सम्प्राप्तः। अवेक्ष्य तानि सञ्जातसंमोदसंकुलस्वान्तः स्वानीव 'अरे मा मा' इति गृहीत्वा निषिध्यन्तं निषिध्य मां गतः। हताशोऽस्मि। भवतु, यदा प्रत्यर्पितानि तदा तानि विपाटितान्तश्चित्रावस्थां मध्ये मध्ये च मसीकृतचिह्नदशामवापुः। यावदुक्तव्यं तावत्स्वल्पमेव।

अथापरः प्रसङ्गः—महाविद्यालये प्राध्यापकानां व्याख्यानानां टिप्पणीः समवचित्य

सर्वैलक्ष्यपूर्वकं कस्मिंश्चित्पुस्तके ताः सङ्गृहीता आसन्। शुण्ठवरेण्यः कश्चिदकस्मादागत्य 'कुतस्ते संग्रहष्टिप्पणीनामित्युक्त्वा मदनुज्ञामन्तरेण मामकीने पुस्तकालये आमूलाग्रमालोक्य टिप्पणीसङ्ग्रहोऽग्रहीष्ट। न मे रोचते कदापि कस्यापि मदीयव्यवहारे एवं हस्तक्षेपः। किन्तु सङ्कोचशीलतया किं करणीयम्। तदा तस्यायं विपरिणामः। अथ मां कुपितं विदित्वा मत्प्रसादनहेतुतया विहस्योच्चैरुदचीचरत्—'ए। ननु भवान् प्रकाण्डपण्डितः। धीमतस्ते किमर्थमस्यावश्यकता। त्वदपेक्षया मदर्थेऽस्याधिकावश्यकते'ति। ननु निवेद्यतां वाचकमिश्रैः, किं वक्तव्यमेतस्य शुण्ठवरेण्यस्य पुरतः।

महाविद्यालये प्रथमोऽयमुपक्रमः—'जीवनं ( Restaurant )' गत्वा कषायपेयं पिबाम इति कृतमतयः पाटलजलपानेच्छया मां तत्र नीत्वा पीत्वा यथेच्छं मामेवान्ते प्रतिभुवं कृत्वा धनसमये पलायन्त इत्यहो दुर्निवारता एतेषाम्।

केनापि मित्रेणान्येन सह महाबलेश्वरं गतः। तत्र स मां स्थाने स्थाने उपदिशति वारंवारम्। इदममुकनामधेयममुकमिति। वस्तुतः प्रतिस्थानं नामाक्षराणि लिखितान्यासन्। स तु मामशिक्षितमिव मन्यते। यदा वयं 'बिंडो पॉइंट' नाम्नि शिखरे गतास्तदाऽवदत्—भयङ्करोऽयं शिखरविशेषः। चक्षुर्वै सत्यमेतत्। किं पुनः कथनेन। किन्तु वृथा स्वस्यागाधपांडित्यपरिचयप्रदानार्थं मध्ये मध्ये निष्प्रयोजनमुपन्यस्यति। तदा पश्चात्तप्तः अहम्। कुत एतेन बृहस्पतिप्रपितामहेन साकमत्रागत इति।

अथैकदा त्रिमितिपटं (3 D.) द्रष्टुं गतोऽस्मि। मत्सहचारिणा प्रथममाज्ञप्तः। मा भेतव्यम्। एतद्द्विशिष्टचित्रपटे वस्तूनि चलन्तीव भान्ति इति। वाचकमिश्राः, कस्यापि ज्ञातपूर्वमेवैतत्।

न मे 'कर्तव्याः सुहृदो बुधैः' इत्यस्मिन्विषये मतान्तरात्यन्ताग्रहः। किन्तु सम्यक्परीक्ष्य ते कर्तव्याः। वृथा पांडित्यपरिचयप्रदर्शनशीलाः अहंमन्या न कर्तव्याः। यतः एवंविधैर्मित्रवर्यैर्बहु पीडितः। अत एव मित्रचिकीर्षूणां वाचकानां लाभार्थं लेखस्यास्य प्रपञ्चः कृतः। अधुना ज्ञातं किमर्थं मया प्रार्थितम्—

'त्रायस्व मित्राद्विभो' इति।

—इति शम्—

---

# काव्य-कुंज

## माळावरती झुरतो लिंब

( चन्द्रशेखर मराठे, सी. बी. ए. )

बापुडवाणी संध्याकाळ
थिजुनि जेव्हां होते कबरी
लांडें शेपुट हलवित हलवित
मख्खपणानें फिरते बकरी.

उसवलेल्या आभाळाला
लाविति ठिगळें जेव्हां तारे,
पेंगुळलेल्या निश्चलतेला
आर्त टिटविची साद चिरे.

झपाटलेल्या माळावरला,
पिसाट जेव्हां वारा पळतो
कुडकुडणाऱ्या अंधाराला,
चन्द्रावरचा ससा हांसतो.

प्रकाश खुपतां मग चंद्राचें
लपूं लागतें जेव्हां बिंब
सरपटणारें जीवन बघुनि
माळावरती झुरतो लिंब

---

# स्वप्नाची समाप्ति

( शकुंतला माढेकर, ज्यु. बी. ए. )

( कवि कुसुमाग्रजांच्या ' स्वप्नाची समाप्ती ' वरून )

स्नेहहीन ज्योतिपरी खिन्न होई रे चेहरा
काळया मुखमंडलास किनारती घामधारा
स्वप्नासम एक एक तास विरतो काळांत
खिरे स्मृति कणकण विस्मृतीच्या सागरांत
काढ सख्या गळयांतील मऊ शाल ही बाजूस
चार दिसांपलीकडे उभें परीक्षेचें भूत १

छोट्या चिंगीचा रे आर्त नाद नच कानीं पडे
संपवुनी भागवत आजोबाही पेंगूळले
परीक्षेचे गार वारे चोरट्यानें अंगावर
येती, पाय वाजतात-- वह्यांच्या रे पानांवर
भीति आणि विषण्णता दाटलेली मनांतून
घड्याळेंही गर्जतील बघ घटकेनें दोन
जमूं लागलेलें चित्र पोरीचें त्या पाटीवर
पूसती रे नयनींचे अश्रु तव ओलसर
काढ सख्या गळयांतील मऊ शाल ही बाजूस
चार दिसांपलीकडे उभें परीक्षेचें भूत २

टेबलाच्या पायथ्याशीं पडे पुस्तकांची रास
वाऱ्यावर वाहती हे तुझे दाटलेले श्वास
मिल, बेकन, स्पेन्सरची होईल कां कधी गट्टी ?
वेड्यापरी घोकतों या लॉजिकमधल्या कॉन्ट्रोव्हर्सी
व्हराड्यांत बांधलेलें कुत्रें होवोनिया जागें
माझें काव्य पाठांतर ऐकोनिया भुंकूं लागे
स्वप्नांतील नायकाचा झाला काय प्रेमभंग
झोपेंतच वटवट नको करूं जाग जाग
काढ सख्या गळयांतील मऊ शालही बाजूस
चार दिसांपलीकडे उभें परीक्षेचें भूत ३

होतो म्हणूं आजारीच परीक्षेच्या ऐन वेळीं
होते म्हणूं पेपरच कठीण निकालावेळीं
निराशेच्या पावलांची चाहूल ये कानावर
ध्वज तीचे लागतील कॉलेजाच्या बोर्डावर
ओततील आग जगीं टीकानेत्र लक्षावधी
निकालांत मठ्ठ, मूर्ख आणि ठरूं अपराधी
काढ आतां तरी सख्या मऊ शाल रे बाजूस
चार दिसांपलीकडे ट्रॅजिडीच मूर्तिमंत ४

# निरोप

कमलबेन चितळे, सी. बी. ए. ( इंग्लिश ).

दूर देशीं जाणार तूं
तुझा निरोप घ्यावया
आलों उदास मनानें
व्याकुलता शान्तवाया
धावतच आलीस तूं
तोरड्यांची रुणझूण
त्यांत साठलें आपुलें
वेडें भोळें बालपण
तुझ्या डोळ्यांचे किरण
ओल्या माझ्या गालांवर
झिरपण चांदण्यांची
भिजलेल्या पानांवर
माझे रेशमाचे हात
तुझ्या हातांत मखमली
दोन केवड्याचीं पानें
एकमेकांत गुन्तलीं
' पोपटा, तूं खिन्न कां रे ?
बोल तांबड्या चोचीनें
सांगतांना आवरसी
तुझें बारिक स्फुंदणें
डोळ्यांतील हास्य फुटे
तुझ्या इवल्या ओठांत
आणि ओठांतील दुःख
काळ्याशार नयनांत
पोलक्याच्या खिशांतून
कांहीं क्षण स्तब्धतेनें
एक बदाम फोडिला
चिमणीच्या तूं दातानें
इवलासा घास होता
तुझ्या निष्पाप प्रेमाचा
आठवतो प्रसाद तो
तुझ्या दुधाच्या दातांचा
तोच क्षण अखेरचा
मावळत्या शैशवाचा
तुझी स्मृति चढविते
साज चन्द्राच्या कोरीचा

---

# प्रवासांतील तत्त्वज्ञान

शशिकांत जोशी, ज्यू. बी. ए.

( छंदः— जीवनलहरी )

" कोठे निघालांत ? " " पृथ्वी-पर्यटना !
विविध लोकांच्या, स्वभाव-लेखना "
पृच्छा त्याची मग " आज काय आहे ! "
" देशाच्या पित्याची, जयंती हो आहे.
यासाठीं हे ध्वज, पताका डुलती;
पुतळे, चित्रें हीं, हारांनीं फुलतीं. "
दुःखें भारावूनी विचारी तो मना,
कसें आवरावें यांच्या भावनांना.
दिवसापुरता, उदो, उदो होई
सारें वर्ष मग स्मरणही नाहीं
त्याचें थोर कार्य बाजूलाच राही
सत्य, अहिंसेचा लवलेश नाहीं
अशाच जयंत्या, उत्सवही येती
असेंच जन ते साजरे करती
नवे, नवे देश त्यानें पाहियले
चोहीकडे हेंच पुन्हां देखियलें

---

## वेडा बुलबुल

अनिरुद्ध पुनर्वसु, ज्यु. बी. ए.

हंसले सारें रान पाहुनि शुक्राची चांदणी
आनंदानें गाउ लागला बुलबुल मधु गाणीं
उगवतिच्या वेळीं नेमानें रोज गाइ बुलबुल
रानपांखरा वाटु लागलें गाण्याचे कुतुहल
गाणीं कसलीं ! करी आळवणी प्रीतिची बुलबुल
शुक्राच्या चांदणी संगती गोष्टी करी गुलगुल
हंसतें सारें रान पाहुनी अद्भुत ही प्रीति
पांखराची ती पवित्र प्रीति चेष्टेवर नेती
परि सांगतो बुलबुल सर्वां करुनी आक्रंदन
प्रीत कुणावर कुणी करावी यांस नाहीं बंधन
शुक्राची तारका मानली प्रिया बुलबुलानें
हंसले सारे परि न सोडला नाद पांखरानें
जीवन भर तो गात राहिला बुलबुल नेमानें
आणि एकदिन गेला संपुन गातांना गाणें
शेवटीं ऐसा प्रीति करतां मरतां तो बुलबुल
रानपांखरें करूं लागलीं दुःखानें किलबिल
अमर जाहला वेडा बुलबुल गतप्राण होऊन
शुक्राची चांदणी उगवतां अजून रडतें रान.

---

## स्मृतिपूजा

कमलाकर नाईक, इंटर आर्टस्, ए.

जीवनांतलें काव्य उमललें
    तुझिया वदनावरति ।
स्मितांत तुझिया उषःप्रभेची
    नवोन्मेष दीप्ति
त्याच स्मिताच्या तरल छटेनें
    मन माझें मोहरलें ।
मंगलतेच्या प्रसन्नतेच्या
    मूर्तिस मन नमलें
ठाऊक न मजला कुठली तूं गे
    कोण कुणाची तनुजा ।
सुखमय स्नेहानें परि उजळसि
    जीवनास या माझ्या
नंदादीप मी तुझ्या स्मृतीचा
    लावुनी माझ्या जीवनीं
तव मूर्तीची करीन पूजा
    सदैव भाव फुलांनीं

---

## निरर्थक ठरणारीं फुलें

नि. ह. वायकोळे, एफ. वाय. सायन्स

नयनमनोहर फुलें उमललीं लतेवरी रानीं
गंध तयांचा पवनहि नेई उगाच त्या विजनीं
असला सुंदर रंग तयांचा सुखद जरी भारी
गंध सुवासिक, व्यर्थचि सारें, भकास रान उरीं
रसिक न कोणी पाहूं शकला जड-मन रिझवाया
नाहीं आला कविहि कोणी सुंदरता गाया
कधीं न झाला स्पर्श जयांना रसिक मधूपांचा
काय फायदा एकांतीं त्या विकसित कुसुमांचा
अखेर तपलीं, सुकलीं, गळलीं सारीं त्याच स्थळीं
झाली माती, नव्हती फुललीं जणूं कदां काळीं
असतील फुलें, फुलतील पुढें किती तरी रानीं
अज्ञात परी, हाय ! निरर्थक, रसिकांवाचूनी

---

## कां उदास ?

( बा. ल. बोरगे, एफ्. वाय्. आर्टस्. बी. )

हांस, नाच ! कां उदास ? तूं बघ—
चैतन्यानें भरलें असें जग ॥ ध्रु० ॥
तरुवेली त्या मोदें डुलती
रानपांखरें सुस्वर गाती
फिरतीं जगिं या स्वच्छंदें तीं
सहभागी तूं होउनि त्या बघ-चैतन्यानें...
अथांग सागरिं जाउनि पाही
भरती त्यासी ये लवलाही
ओहोटी मग पुन्हां असे ही
आयु आपुलें त्यासम तूं बघ-चैतन्यानें...
भयाण रानीं बहार येई
फुलाफळांना गणती नाहीं
वसंतात ह्या, आनंदाही
ऊठ, लूट हा बहार तूं बघ-चैतन्यानें...
तिमिरामाजी प्रभा फांकते
नैराश्यांतुन आशा निघते
दुःख जाउनि सुखहि येतें
उदासीनतेंतुनि मोदा बघ-चैतन्यानें...

---

# फाया

'आशाश्री' एफ. वाय. आर्टस्

सुहृज्जन जरी गेले
मला टाकून एकला
तरी माझ्या संगतीला
आहे अत्तराचा फाया ॥
नियतीच्या करणीनें
पिंजलेलीं दोन मनें
त्यांच्या शुभ्र कापसानें
केला अत्तराचा फाया ॥
स्थितीचक्रांत पिळून
भाव कोमल मनींचे
गळे अत्तर तयाचें
त्याचा केला असे फाया ॥
एकदांच झालें सारें
पुन्हां कधीं न व्हायचें
मन सदन शांतीचें
त्यासी कारण हा फाया ॥
झालें सारें एकदांच,
झाला एकदांच जाच
पडे निर्माल्याचा खच
परी मिळाला हा फाया ॥
कधीं नव्हतें हो केलें
असें भलतें धाडस
मन भेदरे रूढीस
कैसा बने मग फाया ? ॥
कधीं नाहींच कळलें
दैवी लिखित आगळें
नको प्रतीक वेगळें
आहे अत्तराचा फाया ॥

---

# आशे !

जगन्नाथ रक्तवडे, एफ. वाय. आर्टस् बी.

सत्प्रेमानें भरल्या जीवा
तूंच जीवन सर्वस्वहि तूं
उन्मादितं अन् बेहोष हृदयां
तूंच औषधी वनस्पती तूं.
प्रेमाचा मम झरा वाहिला
फुलुनि उगवल्या नव्या चेतना
शृंगाराचा सागर बनला
नीतिचा ना ठावठिकाणा.
आशे ! भुलविशि तूं सकलांना
खोटे तव मृगजळ दावुनि
ध्येय ठेवुनी पुढचें, तुजवर
वेडे होतें मन तुज बघुनि.
दुःखें अनंत पृथ्वीवरचीं
लाथाडुनि मी एकच प्राणी
प्रेम करीं केवळ तुजवरतीं
आशे ! भयंकर तुझी मोहिनी.
तरुण कालचे वृद्धहि बनती
पुढती ज्यांच्या मरण असें
वृद्धहि बनविशि तरुण तूंच गे
जवळि जादु अशी काय असे ?
अद्भुत अशी तूं आशादेवी
तुजवांचुनि जगतीं कोण ?
मृत्यूचे द्वारीं, आशेवांचुनि
जगण्यास्तव झगडे कोण ?

---

# शास्त्रीय विभाग

## $६.०६ \times १०^{२३}$

लेखिका :—**कु. नलिनी तारकुंडे**, इंटर सायन्स बी.

$६.०६ \times १०^{२३}$! आकाशांतील तारका आणि ही संख्या, दोन्ही सारख्याच अगम्य! केवढी मोठी आहे ही संख्या! मोजावयाची कशी हें मुद्दां आपणांस माहीत नाहीं. आपण फार फार तर $१०^{१०}$ म्हणजे खर्व निखर्वपर्यंत भरणाऱ्या संख्या साधारणपणें समजूं शकतों. परंतु या संख्या " $६.०६ \times १०^{२३}$ " या संख्येच्या मानानें किती क्षुद्र! वाचकांच्या मनांत असें कुतूहल निर्माण होण्याची शक्यता आहे कीं, या संख्येनें एका लेखाचें शीर्षक भूषवावें असें काय वैशिष्टय आहे या संख्येंत!

मला तर या संख्येकडे पाहून एका मोठ्या शास्त्रज्ञाची आठवण होते. हा इटालियन् शास्त्रज्ञ ॲव्होगाड्रो ( Avogadro ) त्याच्या अंगच्या नम्रता, उद्योगप्रियता आणि तीव्रबुद्धि या गुणांनी शास्त्रीय जगतांत एक तपस्वी म्हणून मानला जातो. परंतु दुर्दैव असें कीं, त्याच्या हयातींत त्याच्या अंगच्या गुणांचें चीज झालें नाहीं. त्याच्या बुद्धिमत्तेची झांक त्यानें ज्या प्रबंधांत दाखविली त्या प्रबंधाची त्याच्या समकालीन शास्त्रज्ञांनीं हेटाळणी करून ॲव्होगाड्रोची मानहानी केली. अर्थात् लोकांनीं हेटाळणी केली म्हणून स्वतःच्या मनाला पटणारे विचार सोडून सर्वसामान्य समाजाच्या मतौघाबरोबर जर विद्वान वहात गेला तर तो शास्त्रज्ञ कसला? कारण शास्त्रज्ञाचा बाणाच मुळीं हा कीं,

सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात्।
न ब्रूयात् सत्यमप्रियम्॥
प्रियं च नानृतं ब्रूयात्।
एष धर्मः सनातनः॥

ॲव्होगाड्रो खरा शास्त्रज्ञ होता. त्याला आपल्या आयुष्याची शेवटचीं वर्षें बरोबरीच्या शास्त्रज्ञांकडून त्या चांगल्या प्रबंधाची झालेली अवहेलना ऐकत घालवावीं लागलीं. तथापि शांतपणें हा प्रज्ञावान् शास्त्रज्ञ एकच म्हणत राहिला—" आज ना उद्यां केव्हां तरी या लोकांना माझें म्हणणें मान्य करावेंच लागेल. "

आणि झालेंहि तसेंच. त्याच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत त्याचा देशबांधव कॅनिझरो

(Cannizaro) यानें त्याच्या शास्त्रीय प्रबंधाची सत्यता शास्त्रीय जगतास पटवून दिली. त्याच्या शोधामुळें संशोधनांत नवीन दिशा सांपडल्याचें आणि नवीन जग निर्माण झाल्याचें प्रत्ययास आणून दिलें. अशा रीतीनें या थोर शास्त्रज्ञाची सदैव आठवण राहावी म्हणून त्याच्या प्रबंधामुळें जो मूलभूत आंकडा शास्त्रामध्यें शोधून काढला गेला त्या आकड्याला शास्त्रीय जगांत त्याचें नांव देण्यांत आलें. "ॲव्होगाड्रोचा अंक" (Avogadro's Number). तो अंक म्हणजेच या लेखाचें शीर्षक $६.०६ \times १०^{२३}$

या संख्येचें गूढ उकलण्याकरतां आपणाला ॲव्होगाड्रोनें काय शोध लावला तें पाहिलें पाहिजे. ॲव्होगाड्रोचें जीवन (जन्म १७७६; मृत्यु १८५०) शास्त्रीय जगताच्या उषःकालांत गेलें. या कालांत हल्लींच्या रसायनशास्त्राचा जनक समजला जाणारा डाल्टन; अत्यंत विद्वान्, कष्टाळू आणि बुद्धिमान् शास्त्रज्ञ बर्झेलिअस्, गेल्यूसॅक, व्हॅंट हॉफ वगैरे अतिरथी-महारथी सृष्टि-नियमांची उकल करण्यामध्यें, पदार्थांचीं अंतरंगें धुंडाळण्यामध्यें आणि अशा तऱ्हेनें नवनवीन शास्त्रीय तत्त्वज्ञानें शोधून काढण्यामध्यें मग्न होते.

$६.०६ \times १०^{२३}$ या संख्येचें रहस्य समजण्यास डाल्टन आणि गेल्यूसॅक यांनीं लावलेल्या शोधांचीही आपणास माहिती हवी. डाल्टन यानें एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत आपल्या अविरत श्रमांनीं केलेल्या असंख्य प्रयोगांवरून असें सिद्ध केलें कीं, या चराचर सृष्टींतील पदार्थ लहान लहान कणांचे बनलेले आहेत. त्या कणांना त्यानें परमाणु (Atom) अशी संज्ञा दिली. त्यांच्या गुणधर्माविषयीं त्यानें कांहीं कयास बांधले व ते आजतागायत रसायनशास्त्रदृष्ट्या अबाधित आहेत व ते 'डाल्टनूस् ॲटॉमिक थिअरी' म्हणून प्रसिद्ध आहेत. मुख्यत्वेंकरून या परमाणूविषयीं त्यानें असें प्रतिपादिलें कीं, हे परमाणु अविभाज्य आहेत; एकाच मूलतत्त्वाचे परमाणु, वजन, रासायनिक गुणधर्म वगैरे बाबतींत एकसारखेंच असतात व निरनिराळ्या मूल तत्त्वांचे परमाणु एकमेकांपासून भिन्न असतात. याच सुमारास म्हणजे १८०८ सालीं गेल्यूसॅक या शास्त्रज्ञानें वेगवेगळे दोनशें प्रयोग करून वायुरूप पदार्थांच्या संयोगाविषयीं नियम शोधून काढला तो त्याच्याच शब्दांत असा मांडतां येईल कीं, "जेव्हां दोन वायुरूप पदार्थ किंवा मूल तत्त्वें एकमेकांशीं संयोग पावतात व त्यापासून निरनिराळे वायुरूप संयुगें तयार होतात तेव्हां संयोग पावणाऱ्या वायुरूप पदार्थांच्या आकारमानाचें प्रमाण किंवा तयार झालेल्या वायुरूप संयुगांच्या आकारमानाचें प्रमाण साध्या आकड्यांत असतें." (Gay Lussac's Law : The volumes of gaseous substances that take part in a chemical reaction, as reacting substances or as products bear to one another a simple ratio, i. e. a ratio capable of being expressed by small integers.)

उदा० :— $H_2 + Cl_2 = 2\,HCl.$ (आ = आकारमान)

१ आ + १ आ = २ आ

$2\,H_2 + O_2 = 2\,H_2O$

२ आ + १ आ २ आ०.

$N_2 + 3\,H_2 = 2\,NH_3$

१ आ + ३ आ २ आ

वरील सर्व समीकरणामध्यें असें दिसून येईल कीं, रासायनिक क्रियेमध्यें भाग घेणाऱ्या व तयार झालेल्या पदार्थांचें आकारमान साध्या १ : २ : ३ यासारख्या आंकड्यांनीं दर्शवितां येतें.

डाल्टन आणि गेल्यूसॅक या शास्त्रज्ञांनीं प्रतिपादिलेले सिद्धांत लक्षांत घेऊन बर्झेलिअस् या शास्त्रज्ञानें एक नवीनच सिद्धांत जगापुढें मांडला. तो असा : " एकच उष्णतामान आणि एकच दाब या स्थितींत जर वेगवेगळ्या वायुरूप पदार्थांचें आकारमान सारखें असेल, तर त्या आकारमानांत असणाऱ्या परमाणूंची संख्या सारखी असते. " उदाहरणार्थ दोन सारख्या आकारमानाच्या भांड्यांत जर एकांत हैड्रोजन व दुसऱ्यांत क्लोरीन घातला व दोहोंचें उष्णतामान आणि दाब सारखे ठेवले तर त्या आकारमानांत जितके परमाणु हैड्रोजनचे तितकेच क्लोरीनचे असतील. याप्रमाणें डाल्टनच्या सिद्धांताची आणि गेल्यूसॅकच्या नियमाची बर्झेलिअस्नें आपल्या बुद्धिवैभवानें सांगड घातली. या बर्झेलिअस्च्या सिद्धांताचे त्यावेळच्या शास्त्रज्ञाकडून फारच कौतुक झालें. इतकें कीं कोणीही हा सिद्धांत बरोबर आहे किंवा नाहीं हें पडताळून पाहिलें नाहीं. सर्वसाधारणपणें वरवर बरीचशीं रासायनिक समीकरणें या सिद्धांताला धरून आहेत ना मग ठीक अशीच एक वृत्ति सर्वांनीं दाखविली. परंतु ॲव्होगाड्रो हा असा एकच शास्त्रज्ञ निघाला कीं, ज्यानें बर्झेलिअस्नें मांडलेल्या सिद्धांताची कसून छाननी केली आणि तो चूक ठरवून आपला नवीन सिद्धांत पुढें मांडला. आज बर्झेलिअस्चा सिद्धांत चूक आहे हें अगदीं सहजरीत्या दाखवतां येतें. वरील समीकरणापैकीं एक समीकरण घेऊं आणि त्यावरून बर्झेलिअस्चा सिद्धांत कसा चूक आहे तें पाहूं.

$$H_2 + Cl_2 = 2HCl$$

१ आ.    १ आ.    २ आ.

या समीकरणांत असें दाखवलें आहे कीं, हैड्रोजन वायु आणि क्लोरीन वायु एकत्र आले असतां त्यापासून हैड्रोक्लोरिक ॲसिड तयार होतें. आतां एका आकारमानामध्यें क्ष परमाणु आहेत असें समजूं म्हणजे परमाणूंच्या भाषेंत समीकरण असें मांडतां येईल.

क्ष परमाणु है + क्ष परमाणु क्लो. = २ क्ष परमाणु है. क्लो. ॲसिड

किंवा १ परमाणु $H_2$ + १ परमाणु $Cl_2$ = २ परमाणु HCl.

तथापि हैड्रोक्लोरिक ॲसिड तपासून पाहातां असें दिसून येतें कीं, त्याच्या लहानांत लहान कणामध्यें एक परमाणु हैड्रोजनचा व एक परमाणु क्लोरीनचा असलेच पाहिजेत तरच ते हैड्रोक्लोरिक ॲसिड होऊं शकेल. आतां गंमत अशी होते कीं, एक परमाणु हैड्रोक्लोरिक ॲसिडचा घेतला तर तो $\frac{1}{2}$ परमाणु हैड्रोजनचा व $\frac{1}{2}$ परमाणु क्लोरीनचा असा एक बनला असें म्हणावयास पाहिजे. परंतु डाल्टनच्या थिअरीप्रमाणें परमाणु हा अविभाज्य आहे आणि हें अशक्य आहे. याप्रमाणें अनेक उदाहरणें अशीं सांपडलीं कीं, तीं समीकरणें बर्झेलिअस्च्या सिद्धांताप्रमाणें जमेनात. आणि इथेंच ॲव्होगॉड्रो यानें आपली बुद्धिमत्ता चालविली. परमाणु शब्दाच्या ऐवजीं अणु ( Molecule ) हा शब्द त्यानें सुचविला व सर्व समीकरणें त्याबरहुकूम पडताळून पाहतां येतात हें दाखवलें. अणु हा दोन वा अधिक परमाणुंचा बनलेला मानला तर तो रासायनिक क्रियेमध्यें विभागूं शकेल व त्याचे परमाणु रासायनिक क्रियेमध्यें भाग घेऊन त्यापासून निरनिराळ्या पदार्थांचें अणू बनूं शकतील. वरील उदाहरणच पुन्हां आपण तपासून पाहूं.

$H_2 + Cl_2 = 2\ HCl.$

१ आ. + १ आ. २ आ.

एका आकारमानांत एक अणू कल्पिला तर वरील समीकरण असें होईल.

१ अणु $H_2$ + १ अणु $Cl_2$ = २ अणु HCl.

आतां १ अणु $H_2$ = २ परमाणु $H_2$

१ अणु $Cl_2$ = २ परमाणु $Cl_2$.

१ परमाणु $H_2$ + १ परमाणु $Cl_2$ = १ अणु HCl

किंवा २ परमाणु $H_2$ + २ परमाणु $Cl_2$ = २ अणु HCl.

(१ अणु) (१ अणु)

हें समीकरण परमाणूची अविभाज्यता कायम ठेवून व गेल्यूसॅकच्या नियमाला बाध न येतां बरोबर विशद करतां येते. याप्रमाणेंच बाकीचीं सर्व रासायनिक समीकरणें बरोबर आहेत असें दाखवतां येतें. अशा तऱ्हेनें ॲव्होगाड्रो यानें परमाणूऐवजीं अणु शब्द वापरून आपला सिद्धांत मांडला. तो असा "एकच उष्णतामान आणि एकच दाब या स्थितींत जर वेगवेगळ्या वायुरूप पदार्थांचें आकारमान सारखें असेल, तर त्या आकारमानांत असणाऱ्या अणूंची संख्या सारखी असते."

हा सिद्धांत ॲव्होगाड्रोनें १८११ मध्यें मांडला परंतु डाल्टन, बर्झेलिअस् आदि शास्त्रज्ञ, अणू आणि परमाणू असे दोन स्वतंत्र कण असणें शक्य आहे ही कल्पनाच मुळीं कबूल करेनात. ॲव्होगाड्रोचा हा सिद्धांत खरा म्हणजे सरळ, सुटसुटीत आणि सुसंबद्ध आहे पण त्याकाळीं लोकांना ती कल्पना रुचली नाहीं. इतकेंच नाहीं तर त्या सूज्ञ लोकांनीं देखील ॲव्होगाड्रोची त्याच्या या संशोधनाबद्दल हेटाळणीही केली, परंतु ॲव्होगाड्रो शेवटपर्यंत म्हणत राहिला कीं, "माझें सत्य आहे तुम्हांला आज पटत नाहीं केव्हांतरी खास पटेलच पटेल."

त्याच्या मृत्यूनंतर सहा वर्षांनीं कॅनिझरो या त्याच्या देशबांधवानें १८५६ सालीं हा धूळ खात पडलेला प्रबंध पुन्हां जगापुढें मांडला. वर दर्शवल्याप्रमाणें जेव्हां बर्झेलिअसच्या सिद्धांताप्रमाणें रासायनिक समीकरण विशद करतांना विसंगति दिसून आली तेव्हां साऱ्या शास्त्रज्ञांना कॅनिझरोनें ॲव्होगाड्रोचा सिद्धांतच ही विसंगती घालवूं शकेल आणि तेंच सत्य आहे असें जोरानें प्रतिपादिलें. सर्व शास्त्रज्ञांना तें कबूलही करावें लागलें. अशारीतीनें मृत्यूनंतर कां होईना ॲव्होगाड्रोचें महत्त्व सर्व जगांस पटलें.

$६.०६ \times १०^{२३}$! आतांपर्यंत इतकें विवरण झालें तरी या अंकाचें काय? हा यक्ष प्रश्न शिल्लक राहिलाच आहे. या आकड्याची पूर्ण कल्पना येण्यास आपल्याला आणखी कांहीं गोष्टींचा विचार केला पाहिजे.

मूल तत्त्वांचे सर्वांत लहान कण म्हणजे परमाणु. घनरूप मूल तत्त्वांच्या परमाणूंना स्वतंत्र अस्तित्व असतें परंतु वायुरूप मूल तत्त्वांचे परमाणु स्वतंत्र असूं शकत नाहींत. दोन किंवा तीन परमाणु एकत्र येऊन त्यांचे अणु बनतात व त्यांना स्वतंत्र अस्तित्व असूं शकतें. हे परमाणु आणि अणु इतके लहान आहेत कीं, त्यांतील एक किंवा दोन असे बाजूला करून त्यांचें मोजमाप करणें केवळ अशक्य. तथापि गणिती युक्ति लढवून त्यांचें मोजमाप करणें सोपें आहे. यासाठीं

वजनांनीं सर्वांत हलकें मूलतत्त्व जें हैड्रोजन त्याच्या परमाणूंचें वजन 'एक' कल्पिल्यास इतरांचीं वजनें त्याच्याशीं तोलून काढणें शक्य आहे. आणि त्याप्रमाणेंच सर्व मूलतत्त्वांच्या परमाणूंचें वजन काढलेलें आहे. यप्रिमाणें ऑक्सिजनच्या परमाणूचें वजन १६ तर नायट्रोजनच्या परमाणूंचें १४ इत्यादि परमाणूंचीं वजनें (Atomic weights) काढलेलीं आहेत. आतां हे जे १४, १६, १२ इत्यादि आंकडे निरनिराळ्या मूलतत्त्वांच्या परमाणूंचीं वजनें दर्शवितात तीं हैड्रोजनच्या एका परमाणूच्या वजनाच्या सापेक्षतेनें. परंतु हे नुसते आंकडे म्हणजे काय? नुसत्या आंकड्यांना कांहींच अर्थ नाहीं. तेव्हां मेट्रिक पद्धतीप्रमाणें हीं वजनें ग्रॅममध्यें मांडलीं जातात. जसे परमाणू $H_2$ चा १ ग्रॅम तर $O_2$ = १६ ग्रॅम $N_2$ = १४ ग्रॅम कार्बनचा १२ ग्रॅम इत्यादि. आपण खरोखरीच १ ग्रॅम हैड्रोजन घेतला तर त्याचें आकारमान काय होईल? कारण या वायुरूप पदार्थांचें आकारमान लक्षांत घ्यावयास हवें. तसेंच तपमान व दाब जसजसा बदलेल त्याप्रमाणें त्यांचें आकारमानही बदलेल. याप्रमाणें १ ग्रॅम हैड्रोजनचें आकारमान निरनिराळ्या तपमानांत व दाबांत निरनिराळें असणें सहज शक्य आहे. अशा अनंत वायुरूप पदार्थांची निरनिराळीं आकारमानें लक्षांत ठेवणें कठिण होईल त्याकरतां एकच एक तपमान व एकच एक दाब याला जर आकारमान काढलें तर सोईचें होईल याकरतां $0°C$. हें तपमान व ७६ से. मी. हा दाब ही स्थिति प्रमाणभूत मानली जाते. आतां १ ग्रॅम हैड्रोजनचें $0°C$ तपमान व ७६ से. मी. दाब या स्थितींत आकारमान काय असेल. तें काढणें सोपें आहे. ते ११२०० घ. से. मी. असल्याचें आढळून आलें आहे. हैड्रोजनचा एक परमाणू अत्यंत सूक्ष्म कीं जो एकटा हाताळणें अशक्य मग हीं कामें करावयाचीं कशी? त्याकरतां १ ग्रॅम हैड्रोजन प्रमाणभूत धरूं आणि त्याला ग्रॅम परमाणु (Gram atom) असें म्हणूं. हैड्रोजनचा अणु दोन परमाणूंचा बनलेला असतो म्हणजे त्याचें अणुवजन झालें २-अर्थात २ ग्रॅम. परमाणु आणि अणु यांचीं वजनें जेव्हां आपण प्रयोगाच्या सोईकरतां ग्रॅममध्यें घेतों तेव्हां त्यांना आपण ग्रॅम परमाणु व ग्रॅम अणु असें संबोधण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ ऑक्सिजनचा ग्रॅम परमाणु म्हणजे १६ ग्रॅम व ग्रॅमअणु म्हणजे ३२ ग्रॅम. कारण ऑक्सिजनचा अणु दोन परमाणूंचा बनलेला आहे. वर आपण पाहिलेंच १ ग्रॅम है. चें आकारमान ११२०० घ. से. मी. असतें. अर्थात् एक ग्रॅम अणूचें आकारमान २२४०० घ. से. मी. होईल. त्याचप्रमाणें ऑक्सिजनचा एक ग्रॅम परमाणूचें आकारमान ११२०० घ. सें. मी. व वजन १६ ग्रॅम आणि एका ग्रॅमअणूचें आकारमान २२४०० घ. सें. मी. व वजन ३२ ग्रॅम. असें होईल. हें सर्व गणित करण्याच्या दृष्टीनें ठीक आहे. परंतु खरोखरी २२४०० घ. सें. मी. मध्यें किती अणु असतील? तेंही शास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या पद्धतींनीं शोधून काढलें आहे आणि असें आढळून आलें आहे कीं, एका ग्रॅम अणूमध्यें म्हणजेच २२४०० घ. सें. मी. आकारमानामध्यें " $६.०६ \times १०^{२३}$ इतके अणू असतात. कोणत्याही मूलतत्त्वाचा एक ग्रॅम अणू घेतला तर त्याचें आकारमान $0°C$ तपमान व ७६ सें. मी. दाब या स्थितींत २२४०० घ. सें. मी. असतें आणि त्यांत अर्थातच ॲव्होगाड्रोच्या सिद्धांताप्रमाणें सारखे अणू म्हणजे $६.०६ \times १०^{२३}$ इतके अणू असतात. हें या संस्थेचें रहस्य.

हें शोधलें कसें? ही संख्या मोजली कशी? हा शेवटचा प्रश्न वाचकांच्या मनांत उद्भवल्या-वांचून राहाणार नाहीं. फक्त या प्रश्नाचें निरसन करून हा लेख संपवतें.

वरील विवेचनावरून आपण असें पाहिलें कीं, कोणत्याहि वायुरूप पदार्थाचें एका ग्रॅम

अणूचें २२४०० घ. से. मी. आहे. व त्यांत $६{\cdot}०६ \times १०^{२३}$ इतकें खरोखरीचे अणु आहेत. संख्या मोजण्यास फार सोपी युक्ति आहे. ती युक्ति लॉर्ड रुदरफोर्ड आणि गॉयगर यांनीं शोधून काढली. १ घ. सें. मी. मध्यें किती अणु आहेत हें शोधून काढलें कीं २२४०० घ. सें. मी. मध्यें किती हें सहज काढतां येईल. त्यांनीं हेंच केलें. आपल्याला माहीत आहे कीं, सध्यांच्या अणुयुगांत, निसर्गांत अशीं कांहीं मूलतत्त्वें आहेत कीं ज्यांचे एकसारखें विघटन होत असतें त्यांना रेडिओ ॲक्टिव्ह पदार्थ असें आपण म्हणतो. रेडियम हा यांपैकीं आहे त्यांतून विघटनामुळें एकसारखा हेलियम् नांवाचा वायु बाहेर पडत असतो. आणि या वायूचे किती अणू बाहेर पडले हें मोजतां येतें; कारण हा अणु जर झिंक सल्फाइडच्या पडद्यावर पडला तर पडल्या क्षणीं तो चमकतो. या निर्माण झालेल्या चमकेलाच सिंटिलेशन ( Scintillation ) असें म्हणतात. हीं सिंकटिलेशनूस मोजलीं आणि निघणाऱ्या वायूचें आकारमान मोजलें तर १ घ. सें. मी. मध्यें किती अणू हें सहज कळूं शकेल. आणि तें कळलें कीं २२४०० घ. से. मी. मध्यें किती हें काढणें काय अवघड आहे? हा अणु मोजण्याचा प्रयोग असा करतात. प्रथमतः एका काचेच्या नळीच्या एका बाजूस झिंकसल्फाइडचा पडदा ठेवतात व दुसऱ्या टोकास रेडियमचा धातु बसवतात. त्यांतून जे हेलियम्‌चे अणु निघतात ते त्या पडद्यावर आपटतात व तेथें सिंकटिलेशनूस् निर्माण होतात. ती किती झाली ते मोजतात आणि जो वायु जमतो त्याचें आकारमान काढतात. तें आकारमान गणितानें 0°C तपमान व ७६ सें. मी. दाब या स्थितींत किती ... तें काढतात. आतां काय सर्वच सोपें. जसे:—सिंकटिलेशनूस् ‘क्ष’ आकारमान ... मी. तर १ घ. सें. मी. ला सिंकटिलेशनूस् क्ष/ज्ञ. म्हणजेच इतके अणु.

शेवटचें गणित :

अणूंतील = १ घ. सें. मी. मध्यें × २२४००
अणूंची संख्या असणारे अणू
= क्ष/ज्ञ × २२४००
= $६{\cdot}०६ = १०^{२३}$.

ही एका ग्रॅम अणूंत असणाऱ्या अणूंची संख्या काढण्याची एक रीत सांगितली. आणखीहि कांहीं आहेत परंतु कोणत्याहि रीतीनें एकच उत्तर येतें ते $६{\cdot}०६ \times १०^{२३}$.

हा आंकडा शोधून काढण्याकरतां ज्या शास्त्रज्ञाच्या सिद्धांताचा उपयोग करावा लागला त्या शास्त्रज्ञाचें नांव या आंकड्यास देऊन त्याचें नांव अजरामर करणें हें उचित नव्हें *काय?* म्हणूनच या आकड्यास शास्त्रज्ञांनीं ॲव्होगाड्रोचा अंक ( Avogadro's number ) असें नांव दिलें. आणि ॲव्होगाड्रोची कीर्ति अमर करून ठेविली. आहेना वैशिष्ट्य या संख्येंत? म्हणूनच या लेखाचें शीर्षक “ $६{\cdot}०६ \times १०^{२३}$ ”.

# आनुवंशिकता

लेखक :—विनायक नरहर ताडे, तृतीय वर्ष शास्त्र

" व्यक्ति तितक्या प्रकृति " अशी एक प्रसिद्ध म्हण आपल्याकडे प्रचलित आहे. प्रस्तुत विधानांतील सत्याचें मूल्यमापन करतांना त्यांतील सूचित तत्त्वांच्या किंवा नियमांच्या मर्यादा विचारांत घेणें अत्यावश्यक आहे. व्यक्तिपरत्वें प्रकृति बदलत असली तरी बऱ्याच बाबतींत कांहीं कांहीं व्यक्तींत पुष्कळच साम्य असतें. व्यक्तिव्यक्तींतील दिसून येणारा निराळेपणा किंवा सारखेपणा यांना कारणीभूत होणाऱ्या गोष्टींत हवामानादि भौगोलिक परिस्थिति, व्यवसायभिन्नता आणि कमीअधिक भाषिक व धार्मिक संस्कार इत्यादींबरोबर किंबहुना अधिकच मानाचें स्थान आनुवंशिक म्हणजे पितामहांपासून पिताजींस व पिताजींपासून पुत्रप्रपौत्रादिकांना वंशपरंपरेने प्राप्त झालेल्या बऱ्यावाईट गोष्टींस द्यावयास पाहिजे.

जीवन म्हणजे अस्तित्वाची जाणीव, आजच्या शास्त्रीय युगांतील विपुल जीवनसंपत्तीकडे पाहिलें तर मानवाला त्याच्या ज्ञानसामर्थ्याच्या जोरावर न करतां येण्यासारखी एकहि गोष्ट अस्तित्वांत असणें शक्य नाहीं, अशी सर्वसामान्य मनुष्याची समजूत झाल्यास विशेष न[illegible] परन्तु जीवन–निर्मितीचीं स्पष्ट मीमांसा मानवाच्या या व्यापक ज्ञानसंभारानें निदान तरी केलेली दिसत नाहीं –जीवननिर्मितीची सत्याधिष्ठित कारणपरंपरा शोधून काढ[illegible] असली तरी मानवी ज्ञानाचें सामर्थ्य त्या दृष्टीनें खूपच मर्यादित आहे यांत शंका न[illegible] आहे. पण प्राप्तज्ञानाच्या जोरावर–साहाय्यानें–मानवानें या बाबतींतहि केलेली प्रगति [illegible]स्पद नाहीं असें कोण म्हणेल ?- आणि म्हणूनच जीवननिर्मितीमागील प्रच्छन्न हेतूंचें आकलन व अवलोकन तूर्त आवांक्याबाहेरचें वाटत असूनहि जीवनांत सूत्रबद्धता आणणारे नियम माणसानें शोधून काढलेले पाहिलें कीं, अज्ञानांधकारांत भांबावून गेलेल्या मानवाला योग्य मार्ग दाखविणाऱ्या शास्त्रज्ञांच्या महान् तपस्येपुढें मस्तक आपोआप विनम्र होतें. प्रथमपरिच्छेदांत वर्णन केलेल्या आनुवंशिकतेबाबत शास्त्रज्ञांनीं प्रदीर्घ संशोधन करून फार मोलाची कामगिरी बजावली आहे. अशाच संशोधनांतील कांहीं भागांचा गोषवारा सदर लेखांत वाचकांपुढें ठेवण्याचा विचार आहे.

पिढ्यान्‌पिढ्या चाललेल्या संशोधनानें आतां सिद्ध केलें आहे कीं, भौतिक जीवन-निदर्शक चिन्हें व्यक्त करण्यासाठीं आत्म्याला कमींतकमी कांहीं विशिष्ट पदार्थांनीं युक्त अशा माध्यमाची आवश्यकता असते. या माध्यमाला आपण शरीर म्हणूं. आपलें मानवी शरीर अत्यंत चमत्कृतींनीं व भानगडींनीं भरलेलें असल्यामुळें आपण, उदाहरणादाखल, अगदीं साध्या एकपेशी जीवांच्या शरीराविषयीं थोडासा विचार करूं. या एकपेशी प्राण्यांचे देह कल्पनातीत सूक्ष्म असतात. पाण्याच्या एका थेंबांत साडेचार लक्षापर्यंत असे प्राणी असूं शकतात यांत कसलीच अतिशयोक्ति नाहीं. या सूक्ष्म शरिरांत थोड्याफार फरकानें महत्त्वाचे असे खालील भाग दिसतात.

( १ ) बाहेरील संरक्षक कवच ( cell wall )

( Genetic element चें ) एखादें [illegible] ( Nucle[illegible] ) त्यांच्या आकारमानांतहि फरक दिसून येतो. प्रोटीन व केतुना[illegible] द्रव्यांत भरपूर [illegible] ) यांच्या मिश्रणानें तयार झालेल्या केतुनाभिक प्रोटीनचें प्रमाण या जनन[illegible] असतें. [illegible] या आम्लाचें वैशिष्ट्य म्हणजे जिवंत प्राण्याच्या अव्यक्त शक्तीद्वारें योग्य का[illegible]णीं, एका शक्तीचें रूपांतर दुसऱ्या शक्तींत करणें इत्यादि कार्यें या आम्लमाध्यमाद्वारेंच होतात. आनुवंशिक गुणधर्माचा आविष्कार केवळ यांच्यामुळेंच होतो.

स्त्री व पुंबीजांच्या संयोगानें मानवी गर्भाचें अगदीं प्राथमिक स्वरूप तयार होतें. अर्थातच या प्राथमिक अवस्थेंतील एकपेशी गर्भांत मातेकडून व पित्याकडून मिळालेल्या प्रत्येकी चोवीस चोवीस क्रोमोसोमसचे एकूण दोन समूह असतात. थोड्या कालावधीनंतर दोन दोन क्रोमोसोमची एक अशा चोवीस जोड्या तयार होतात. एकाच प्रकारची जननद्रव्यें यावेळी एकत्र आणलीं जातात. त्यांची मांडणी विशिष्ट तऱ्हेनें होत असते. या एकपेशी गर्भाचें नंतर द्विभाजन ( mitosis ) सुरू होतें. यावेळीं प्रत्येक जननद्रव्याचें देखील द्विभाजन होतें. एका जननद्रव्यापासून झालेल्या जननद्रव्यांत आकारमान व गुणधर्म इ. बाबतींत तंतोतंत सारखेपणा आढळतो. म्हणजेच पुनश्च ४८ क्रोमोसोमचे धागे स्वतंत्र दिसतात. या प्रत्येक धाग्यांत कांहीं गुणधर्म स्त्रीचे व कांहीं पुरुषाचे असतात हें घडत असतांनाच हळू हळू केतुनाभिक द्रावाचे दोन सारखे भाग होतात, समानगुणधर्मवाहक दोन दोन क्रोमोसोमच्या चोवीस जोड्यांपैकी प्रत्येकी एक एक धागा एकेका भागांत जातो व अशा तऱ्हेनें समानगुणधर्मयुक्त दोन केतुनाभि तयार होऊन त्यांपासूनच पुढे स्वतंत्र पेशींचीं निर्मिति होते. ( क्रोमासोमचा धागा उभा चिरला जात असल्यानें प्रत्येक पेशींत चोवीस जोड्या असतात ) याचीच अनेकवार पुनरावृत्ति होऊन अनेक पेशी तयार होतात. कांहीं पेशींच्या समुदायाला विशिष्ट कार्य करावें लागत असल्यानें त्यांच्या शरीररचनेंत प्रासंगिक बदल होत जाऊन निरनिराळ्या पेशींचे असंख्य समुदाय बनत असतात व त्यांतूनच निरनिराळ्या अवयवांची निर्मिति होते. जननपेशींत मात्र प्राणी वयांत आल्याशिवाय सहसा बदल होत नाहीं. एक गोष्ट मात्र या ठिकाणीं अवश्य लक्षांत ठेवली पाहिजे. ती म्हणजे विशिष्ट जननद्रव्यें (genes) प्रत्येक पेशींत असली तरी विशिष्ट कारणांकरितांच त्यांचा उपयोग होतो. हातांतील किंवा पायांतील पेशींत डोळ्यांचा रंग ठरविणारें जननद्रव्य असलें तरी त्याचा परिणाम येथें कांहींच दिसून येणार नाहीं, अव्यक्त, राहील. त्याचा दृश्य परिणाम केवळ डोळ्यांच्या विशिष्ट पेशींतच पाहावयास मिळेल. अशा तऱ्हेचा कुठलाहि परिणाम हा एकाच जननद्रव्यावर अवलंबून नसून परिस्थित्यनुसार अनेक जननद्रव्यांत होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांचा सांघिक परिणाम म्हणूनच त्याकडे पाहिलें पाहिजे. गर्भवाढीबरोबर चाललेल्या या क्रियाप्रतिक्रियांचें स्वरूप आज संपूर्णतया ज्ञात नसलें तरीहि शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे कीं, ज्याअर्थी शरीरांतील कोणतीहि प्रांगारिक ( organic ) रासायनिक क्रिया जीवरसांच्या ( Enzymes ) माध्यमाशिवाय अशक्य आहे, त्याअर्थी सुरुवातीस जननद्रव्यापासून जीवरसांची उत्पत्ति होत असावी; कारण बहुतेक जीवरस निरनिराळ्या प्रोटीन्सनीं युक्त असतात व जननद्रव्यांतहि केतुनाभिक प्रोटीनचें प्रमाण विपुल असतें.

बऱ्याच वेळां जननद्रव्यांत स्वरूपभेद Mutation घडून येतो. या वेळीं आकारमानाबरोबरच गुणधर्महि बदलत असतात. क्ष किरणादिकांच्या साहाय्यानें बरेच प्रयोग केल्यानंतर असें दिसून

( २ ) कवच्याआंतील गंधक, [illegible] फॉस्फरस, नात्रिकवायू, कोळसा वगैरे पदार्थांच्या विलक्षण मिश्रणानें बनलेला द्राव [illegible] वा इतरत्र ) [illegible] ७५ ते ९० टक्के पाण्याचें प्रमाण असतें.

( ३ ) मध्यभागीं ( [illegible] ल पदार्थांपैकीं कांहींच्या कमीअधिक मिश्रणानें तयार झालेला मध्यबिंदु, [illegible] केतुनाभि Nucleus.

या अतिसूक्ष्म शरिराच्या सर्व अंतस्थ हालचालींचें नियमन हा छोटासा केतुनाभि करीत असतो. त्याप्रमाणें ज्यावेळीं एका पेशीपासून दुसरी पेशी तयार होते किंवा द्विकरण " Cell division " होतें त्यावेळीहि प्रथम एकाचे दोन केतुनाभि होतात व नंतरच शरीरांतील इतर भागांची विभागणी होते.

आपला मानवी देह इतका मोठा अनेकपेशी दिसत असला तरी त्याचीहि सुरुवात इतर अनेकपेशी जीवांप्रमाणें एकपेशीपासूनच होते. मातेच्या गर्भाशयावरील बीज-नलिकेंत स्त्री–बीज Ovum व पुंबीज वा शुक्रजंतु Sperm यांच्या संयोगानें गर्भधारणा होते. प्रख्यात अमेरिकन जीवशास्त्रज्ञ H. G. Muller यांच्या हिशेबाप्रमाणें वीस मिलियन स्त्रीबीजांचें वजन सुमारें १ औंस होईल. जगांतील सध्याची लोकसंख्या निर्माण करण्यास जेवढीं स्त्रीबीजें लागलीं तेवढीं एकत्र आणलीं तर त्यांचें घनफळ फारतर अर्धा गॅलन होईल आणि यांवरूनच त्यांची सूक्ष्मता लक्षांत येईल.

संयोग




आ. १

शुक्रजंतु एकपेशी असून आकृतींत दाखविल्याप्रमाणें त्याचा आकार असतो. दोन बिलियन शुक्रजंतू एकत्र केले तर सगळे मिळून अर्ध्या ॲस्प्रोच्या गोळींत मावतील इतके ते लहान असतात. डोक्यासारख्या भागांत केतुनाभि असतो. संयोगसमयीं फक्त एवढाच भाग स्त्रीबीजाशीं एकरूप होतो. या केतुनाभींत क्रोमोसोमचें अतिसूक्ष्म धागे असतात. प्रत्येक प्राण्यांत ठराविक धागे असतात. मनुष्याच्या शुक्रजंतूंत किंवा बीजांडांत चोवीस धागे असतात. ( मनुष्याच्या सामान्य पेशींत ही संख्या ४८ असते. याचें स्पष्टीकरण पुढें येईलच. इतर वनस्पतींच्या व प्राण्यांच्या पेशींतील संख्याहि त्या त्या जातीपुरत्या ठराविक असतात. उदा. सफरचंद ३४, वाटाणा १४, कुत्रा २० व घोडा ५६. २,२००,०००,००० शुक्रजंतूंतील क्रोमोसोम एकत्र केले तर ॲस्प्रोच्या गोळीच्या चवथा हिस्साहि भरणार नाहीं. वरून दिसायला हे क्रोमोसोमचे धागे जरी एकजिनसी घनपदार्थासारखे दिसले तरी वस्तुतः ते शेकडों, हजारों नव्हे लक्षावधि जनन द्रव्यांचे बनले असल्याचें सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं पाहिलें असतां दिसून येतें. या जननद्रव्यांनींच भूतलावर प्रथम जीवनाचा आरंभ केला अशी सध्यां समजूत आहे. प्रत्येक सूक्ष्मतम जननद्रव्याचे

आलें आहे कीं, या स्वरूपभेदाच्या मुळाशीं अणूंचा संघर्ष Molecular Collision आहे. हा स्वरूपभेद त्या प्राण्याला अपायकारक आहे का हितकारक हें भोंवतालच्या परिस्थितीवर अवलंबून असतें. योग्य बदल कालांतरानें कायमस्वरूपी केले जातात. म्हणूनच अगदीं यथार्थत्वानें म्हटलें जातें कीं, उत्क्रांतीच्या मुळाशीं हा स्वरूपभेदच आहे. याच्या कमीअधिक प्रमाणावर सद्गुण-दुर्गुणांची व आकारविकारांची वाढ अवलंबून असते.

संयोगानंतर तयार झालेल्या जननद्रव्यांच्या जोड्यांत तीन प्रकार असतात. ( १ ) समान प्राथमिक. ( २ ) समान स्वरूपभेदी व ( ३ ) विभिन्न. विभिन्न प्रकारांत प्राथमिक जननद्रव्याचा स्वरूपभेदीवर झालेला परिणाम फार महत्त्वाचा असतो. प्राण्याचें किंवा वनस्पतीचें ठिकाणीं दिसून येणाऱ्या वर्णादिक कुठल्याहि लक्षणांवर ( Characters वर ) या दोनहि द्रव्यांचा प्रभाव पडून परिणामतः दिसून येणारीं लक्षणें त्यांच्या क्रियांचा संकलित परिणाम म्हणूनच ओळखलीं जातात. वरवर पाहिलें असतां मात्र असें दिसून येतें कीं, हीं लक्षणें दोहोंपैकीं एकाच प्रबल ( किंवा कार्यक्षम ) द्रव्यामुळें दृश्य झालीं असून दुसरें निर्बल ( किंवा सुप्त वा लुप्त ) आहे. सर्वसाधारणपणें प्राथमिकद्रव्यें प्रबलतर असतात. एका छोट्याशा उदाहरणानें हा मुद्दा अधिक स्पष्ट करूं या.

अनेक प्राण्यांत त्वचेचा रंग घालविणारे स्वरूपभेदी जननद्रव्य असतें. हें कार्यक्षम असतांना रंगहीन, पांढऱ्या त्वचेचा व पांढऱ्या केसांचा प्राणी मिळतो. ( Albino ). परंतु प्राथमिक जननद्रव्याच्या संयोगानें हें जवळ जवळ तटस्थ बनतें. आतां आ. २ पहा. एक उंदराची जोडी आहे. एकांत त्वचा-रंगाच्या बाबतींत समान प्राथमिक व दुसऱ्यांत विभिन्न जननद्रव्यें आहेत.




आ. १

पहिला उदी रंगाचा व दुसरा काळा. जर या दोन उंदरांपासून एकमेकांच्या संयोगानें झालेल्या वंशावळींत संयोगसत्र चालू ठेवलें तर कांहीं ठिकाणीं दोन विभिन्न जननद्रव्यांचा संयोग होईल. यांतून निर्माण झालेल्या पिढींत संयोगसत्र पुढें चालू ठेवलें तर मिळणाऱ्या संततींत कांहींच्या ठिकाणीं समान प्राथमिक, कांहींच्या ठिकाणीं समान स्वरूपभेदी व इतरांच्या ठिकाणीं विभिन्न

जननद्रव्यें दृश्यमान होतील आणि त्यांच्या रंगांत अनुक्रमें फरकहि दिसून येईल. आकृतिक्रमांक २ वरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

प्रत्येक जातींत केंद्र नाभींतील क्रोमोसोम्सची संख्या निरनिराळी असते, पण एकाच विशिष्ट जातींतील सर्वांच्या सर्व प्राण्यांत अगर वनस्पतींत ती सारखीच असते. सर्वसामान्यपणें सगळीकडे ही संख्या सम ( २ न ) असते. पुं बीज व स्त्री-बीज यांच्या संयोगानें दोन पेशींची मिळून एक पेशी होते. क्रोमोसोमची संख्या यामुळें दुप्पट ( ४ न ) होणार. हें टाळण्यासाठीं संयोग क्रियेपूर्वीच ( स्त्री व पुं बीजें तयार होतांनाच ) विभाजनाची ( Meiosis ) क्रिया होऊन त्यांच्या केंद्रनाभींतील क्रोमोसोमची संख्या निम्मी ( न ) होते म्हणजे संयोग किंवा द्विभाजनाचे ( Mitoeis ) क्रियेनंतर ही संख्या परत सम ( २ न ) बनते. एका उदाहरणानें छान स्पष्टीकरण होईल. अ व ब या दोन व्यक्तींतील क्रोमोसोमची संख्या २ अ आहे. निरनिराळ्या आनुवंशिक गुणांनीं युक्त असल्यामुळें त्यांच्या संयोगानें निर्माण होणाऱ्या संततींत, पुढील आकृतींत ( क्र. ३ ) दर्शविल्याप्रमाणें, आनुवंशिक गोष्टी उतरतात.

**मेंडेलचे नियम :** जॉन ग्रिगॉर मेंडेल ( १८२२ ते १८८४ ) या ऑस्ट्रियन शास्त्रज्ञानें वाटाण्याच्या झाडावर प्रयोग करून आनुवंशिकतेबाबत दोन महत्त्वाचे नियम शोधून काढले. जांभळ्या पांढऱ्या फुलांपासून तयार केलेलें बी जांभळ्या फुलांचें निघालें. पण या जांभळ्या फुलांपासून पुनः जें बीं निघालें त्यांत पावहिस्सा पांढऱ्या फुलांचें व पाऊण हिस्सा जांभळ्या फुलांचें होतें. सर्व जांभळीं फुलें रंगानें सारखीं असलीं तरी गुणधर्मानें सारखीं नव्हती. कांहीं




आ. ३

पहिल्या पिढींतील जांभळ्यांसारखीं व इतर कांहीं दुसऱ्या पिढींतील फुलांसारखीं होती. यावरून पहिल्या पिढींतील पांढऱ्या रंगाचें जननद्रव्य दुसऱ्या पिढींत सुप्त राहिलें तरी तिसऱ्या पिढींत त्यानें पुनः डोकें वर काढलेंच. या व अशाच इतर अनेक प्रयोगांवरून मेंडेलनें खालील नियम शोधून काढले.

[ १ ] कोणत्याहि प्राण्याच्या पेशींत असलेल्या जनन द्रव्याच्या जोडींतील दोन भिन्न जननद्रव्यांपैकीं केवळ एकच स्त्रीबीज वा पुंबीज यांत येईल. कोणतें हें मात्र हमखास सांगतां येत नाहीं.

[ २ ] संयोगाचे वेळीं जर दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक जोड्या एकत्र आल्या तर प्रत्येक निरनिराळ्या व्यक्तिगत क्रोमोसोमशीं संबद्ध असल्यामुळें एका जोडींतील द्रव्यांच्या व्यक्तिगत विभागणींत दुसऱ्या जोडीमुळें व्यत्यय येण्याचें कारण नाहीं. यांतहि अनेक भानगडी आहेत. परंतु स्थलाभावी त्यांचा निर्देशहि करतां येणें शक्य नाहीं.

निर्माण होणारी संतति स्त्रीलिंगी वा पुल्लिंगी कशी बनते हें पाहणेंहि मोठें मनोरंजक ठरेल. स्त्रीलिंगनिर्देशक जननद्रव्याची जोडी नेहमी समान असते. स्त्रीबीजांत एकएक स्त्रीलिंगनिर्देशक जननद्रव्य ( क्ष ) असतें तर पुल्लिंगनिर्देशक ( क्षय ) जननद्रव्याची जोडी नेहमी मिश्र वा विभिन्न असतें. आकृतिक्रमांक ४ वरून संयोगांतून निर्माण झालेल्या संततीची पूर्ण कल्पना येईल.




आ. ४

मेंडलनें वाटाण्याच्या झाडांवर ( वेलांवर ) प्रयोग करून असा निष्कर्ष काढला कीं, पुढील पिढ्यांत आनुवंशिक लक्षणें उतरण्याचेहि कांहीं गणिती नियम आहेत. वर उल्लेख केलेल्या नियमांखेरीज त्यानें आणखी गणिती नियम शोधून काढला. या नियमानुसार जर प्रत्येकीं एक निर्बल व प्रबल ( शुद्ध ) जननद्रव्य धारण करणाऱ्या मातापित्यांच्या पिढींत जर संयोगसत्र चालूं ठेवलें तर पहिल्या पिढींत सर्वच्या सर्व प्रजेंत प्रबल जननद्रव्याचेंच लक्षण दिसून येतें. दुसऱ्या पिढींतील प्रजेंत मात्र हीं लक्षणें धारण करणाऱ्यांचें प्रमाण : १ शुद्ध प्रबल, २ मिश्र ( प्रबल लक्षण दाखविणारे ) व १ शुद्ध निर्बल म्हणजे १ : २ : १ असें असतें.

मानवांत दिसून येणाऱ्या निराळेपणास ( differences ) बाह्य परिस्थिति किती प्रमाणांत कारणीभूत होतें हें ठरविण्यास एकनाळ जुळें ( identical twins ) व द्विनाळ जुळें यांच्या अभ्यासानें फार मदत झाली आहे. साधारणपणें जन्मलेल्या मुलांत ८७:१ असें जुळ्याचें प्रमाण असतें. एकनाळ जुळ्यांची आनुवंशिकता heredity एकच असते. त्यांना व साध्या द्विनाळ जुळ्यांतील मुलांना एकत्र व निरनिराळ्या परिस्थितींत ठेवलें असतां काय होतें हें पाहिलें असतां बाह्य परिस्थितीचा बराच परिणाम होतो असें म्हणावें लागेल. पण आनुवंशिकतेचें माहात्म्य त्यामुळें मुळींच कमी होत नाहीं. खालीं दिलेल्या आकड्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल. ( न्यूमन, फ्रीमन, व होलझिंझर या त्रिकुटानें प्रयोगांतीं मिळविलेले हे आकडे आहेत. )

| फरक | एकनाळ एकत्र ठेवली असतां | ए. ना. दूर केली असतां | साधीं जुळीं एकत्र ठेवलीं असतां |
|---|---|---|---|
| उंचीतील सें. | १·६ | १·८ | ४·४ |
| वजनांतील पौंड | ४·० | ९·९ | १०·० |
| डोक्याची लांबी } मि. मिटर्स | २·६ | २·२ | ६·२ |
| ,, रुंदी } मि. मिटर्स | २·२ | २·८ | ४·२ |
| बौद्धिक प्रमाण | ५·३ | ८·२ | ९·९ |
| स्टॅनफोर्ड ॲचिव्हमेंट ( महिने ) | ६·४ | १६·३ | ११·६ |

साध्या जुळ्यांतील वैयक्तिक मुलांची आनुवंशिकता एक नसल्यानें त्यांच्यांत अधिक फरक दिसून येतो. म्हणजेच आनुवंशिकता हा फार महत्त्वाचा दुवा आहे.

दोन पिढयांतील दुवा-पूल म्हणजे जननद्रव्यें (genes) हें आतां स्पष्ट झालेंच आहे. कित्येकदां अगदीं विलक्षण गोष्टी पाहावयास सांपडतात. कित्येकांना सहा बोटें (एका हाताला) असतात तर कित्येकांचीं बोटें फारच आंखुड असतात (Brachy dactyly). बहुतेक वेळां आंखुड बोटाची पत्नी वा पती यांपैकी एकच व्यक्ति असते आणि म्हणूनच निर्माण होणाऱ्या प्रजेंत मिश्र (या लक्षणा-पुरती hybrid) आंखुड बोटांची, शुद्ध आंखुड बोटांची व लांब बोटांची अशा वर्गांतील अपत्यें असतात. म्हणजेच एखाद्यावेळीं दोन शुद्ध आंखुड बोटांची पति-पत्नी एकत्र येणें शक्य आहे. दोघांचींहि जननद्रव्यें (या लक्षणापुरतीं) विलक्षण (Abnormral) असल्यानें त्यांच्या संयोगांतून निर्माण होणारी प्रजा, या विलक्षण जननद्रव्यांच्या (genes) इतर जननद्रव्यावर पडलेल्या प्रभावामुळें खरोखरीच लोकविलक्षण निपजणेंहि शक्य आहे. अशा तऱ्हेचें एक उदाहरण दोघा नॉर्वेजियन संशोधकांनीं नमूद करून ठेवलें आहे. आई व बाप दोघेहि अत्यंत आंखुड बोटांचे होते. त्यांना दोन मुलें झालीं. एकतर आंखुड बोटांचे होतेंच पण दुसऱ्याला तर मुळीं बोटें व अंगठे (पायाचेहि) नव्हते आणि दुसरीं हाडें इतकी विचित्र होतीं कीं तें फार दिवस जगूंच शकलें नाहीं.

आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट झालें असेल कीं नेहमींच्या बोलण्यांत येतें त्याप्रमाणें आनुवंशिक गोष्टी पुढील प्रजेंत रक्तामधून उतरतात व एकाच आईवडिलांचीं मुलें सारख्याच आनुवंशिकतेचीं असतात हें खरें नाहीं. रक्ताचें नातें त्या दृष्टीनें काव्यांतच शोभण्यासारखें आहे.

मधुमेहासारखे कित्येक रोग पूर्वीं आनुवंशिक समजण्यांत येत असत. पण इन्शुलीनचा शोध लागतांच हें कल्पनेंतील आनुवंशिक मूळ पार उखडलें गेलें. दीर्घ संशोधनानंतर आनुवंशिक रोग फारच थोडे. उदा. परमा व गरमी वगैरे आहेत असें सिद्ध झालेलें असून त्यांचें आनुवंशिक मूळ लक्षांत घेऊनच त्यावर प्रतिउपाय शोधून काढण्यांत शास्त्रज्ञ यशस्वी झाले आहेत. अर्थात् अद्यापहि खूप संशोधनाची आवश्यकता आहेच आहे.

जीवन अनंत आहे. अतिसूक्ष्म परमाणूपासून विराट खगोलापर्यंत यच्चयावत् वस्तुमात्रावर अनियंत्रित सत्ता गाजवीत असलेल्या विश्वनियंत्रण शक्तीची प्राप्ति करून घेऊन कधीही कंटाळा न येणारें सुखी, ज्ञानसमृद्ध व सुरक्षित चिर-जीवन मिळविणें हें मानवाचें ध्येय आहे. यासाठीं पिढयान् पिढ्या कष्ट घेतले पाहिजेत. सातत्याच्या प्रयत्नांशिवाय जगांत कशानेंहि यश मिळत नाहीं. तेव्हां जीवननिष्ठेच्या भूमिकेवरून ज्ञानपूर्ण जीवनसंपन्नतेसाठीं अविरत कष्ट घेत राहणें हें प्रत्येकानें आपलें कर्तव्य ठरविलें पाहिजे. सतत कांहीतरी करीत राहिलें पाहिजे. समर्थ म्हणतात,

'सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें
परन्तु तेथें परमेश्वराचें अधिष्ठान पाहिजे ॥

आजच्या शास्त्रीय युगांत सत्यज्ञान हाच आपला परमेश्वर ! तेव्हां सत्यासाठी संशोधन करून आपणहि आपलें जीवन सार्थकीं लावूं या.

---

# निसर्गांतील बेरीज वजाबाकी

लेखक :—अ. वि. साठे, Sr. B. Sc.

" दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा । कीं तो मासिया वेंटाळी जिभा ॥
तैसें प्राणिये कवणा लाभा । वाढविती तृष्णा ? "

ज्ञा. ९-५१४

वरील ओवींत ज्ञानदेवांनीं जीवनाची क्षणभंगुरता आणि त्यांसाठीं चालणारा दीर्घ कलह फार उत्तमरीतीनें दर्शित केलेला आहे. बेडकाला साप गिळीत असतो पण त्याच क्षणीं बेडूक जिभेनें माशा गिळण्याच्या प्रयत्नांत असतो, केवढी ही जीवनतृष्णा! जोवन सुखानें जगण्यासाठीं या सृष्टींत केवढी प्रचंड धडपड सुरू असते.! शास्त्राच्या प्रत्येक शाखेवर उत्क्रान्तिवादाची विलक्षण छाप पडलेली आहे. त्या प्रसिद्ध प्रणालीचा जनक चार्लस डार्विन (१८०९-१८८२) बिगल जहाजावरून जेव्हां देशाटनास निघाला तेव्हां ब्राझीलच्या जंगलांतील झगडा पाहून तर त्याच्या मनाची मनोमय खात्री पटली. १८३६ सालीं त्याचें पर्यटन संपलें व त्याच्या निरीक्षणास आरंभ झाला. याच सुमारास माल्थसचा अर्थशास्त्रविषयक ग्रंथ प्रसिद्ध होऊन एक महत्त्वाचा निष्कर्ष तज्ज्ञांपुढें येऊन ठेपला. माल्थसच्या मतें अन्नसामुग्रीची वाढ गणितश्रेणीनें होत राहून त्यावर उपजीविका करणाऱ्या माणसांची वाढ मात्र भूमितिश्रेणीनें होत राहते, त्यामुळें जगण्यासाठीं कलह हें संकट अटळ होतें. जगभर केलेल्या प्रवासांतील निरीक्षण आणि वीस वर्षांचें चिंतन यांच्या साह्यानें चार्ल्स डार्विन यानें सन १८५८ सालीं आपला जातींची उत्पत्ति (Origin of species) हा ग्रंथ प्रसिद्ध करून एका नव्या युगास प्रारंभ केला.

डार्विनच्या उत्क्रान्तिवादांतील मुख्य प्रमेय असें कीं, अन्नसामुग्री मर्यादित व त्या मानानें खाणारांची वाढ मात्र बेसुमार झालेली त्यामुळें या जगांत जीवनार्थ कलह (Struggle for existence) एकसारखा चाललेला असून, निसर्ग त्यामधून निवड करतो आणि जे बलिष्ठ असतील ते जगतात आणि जगण्यास नालायक ते नष्ट होतात. नैसर्गिक निवड होऊन कनिष्ठ मरणाच्या पंथास लागतात व शेवटीं बलिष्ठांचे सातत्य मात्र कायम राहतें. माल्थस, डार्विन किंवा वॅलेस यांच्या मतें प्रजेची किंवा प्राण्यांची वाढ भूमितिश्रेणीनें म्हणजे प्रचंड गतीनें होत असते या विधानाचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. रोगराई, दुष्काळ, झडप घालून मारणारे इतर बलिष्ठ प्राणी, किंवा इतर कोणत्याहि कारणांमुळें या जगांत प्राणिहत्या होत नसती तर ? काय भयंकर अवस्था या जगाची झाली असती. माणसास उभें रहावयास जागाच राहिली नसती. साध्या साध्या क्षुल्लक वाटणाऱ्या प्राण्यांची वीण व वाढ अशा झपाट्यानें होत असते कीं ते सर्वच्या सर्व जगून राहते तर जगाचें उग्र स्वरूप निःसंशय भीतिदायक झालें असतें. मादी कॉडमासा दर वेळेला लक्षावधि अंडीं घालते. यापैकीं प्रत्येक अंड्यांतून जर पूर्ण वाढलेला कॉडमासा निघाला असतां तर पृथ्वीवरील सर्व समुद्र एकट्या कॉड माशांनींच भरून गेले असते. घरांतील माशी, केवढा यःकश्चित् प्राणी! पण प्रत्येक वेळीं ती शंभर अंडीं घालीत असते. एका मोसमांत सर्वत्र अंडीं तयार झालीं आणि कोणताच निर्बंध अथवा अडथळा त्यांच्या वाढीच्या मार्गात आला नाहीं तर एका जोडप्यापासून १४,०००,०००,०००,०००,०००,००० इतक्या माशा तयार होतील. आणि जगांतील सर्व माशा याच गतीनें वाढूं लागल्या तर ? बेडकाची मादी एका वेळेस दहा हजार अंडीं घालते.

हीं सर्वच जगणार आणि त्यांपासून बेडूक निर्माण होणार असें झालें तर केवढा अनर्थ ओढवेल? डुक्कर, ससे व उंदीर हे प्रजोत्पत्तीच्या बाबतींत असाच उच्चांक गाठणारें म्हणून प्रसिद्ध आहेत. तेव्हां निसर्गांत होणारी ही वाढ ध्यानांत घेतां तीव्र नियंत्रण आवश्यक आहे असें दिसून येतें. प्राण्यांच्या बेसुमार गतीनें वाढणाऱ्या या बेरजेबरोबर तेवढ्याच प्रमाणांत वजाबाकी चालू असते म्हणून तर जगांतील प्राणी समतोल प्रमाणांत साधारणपणें राहिलेले असतात.

ही वजाबाकी निसर्गांत अनेक प्रकारांनीं होत असते. त्यांतील पहिलें प्रमुख कारण म्हणजे जीवनार्थ कलह हें होय. या कलहांतूनच लहान लहान प्राणी मोठ्या प्राण्यांचें भक्ष्य बनून राहिलेले दिसतात. दुष्काळ, रोगराई, झंजावात अतिवृष्टि इत्यादि कारणांबरोबरच माणसाची शिकारीची हौस ही सुद्धां प्रमुख आहेच. पण या सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे प्रत्येक प्राणी दुसऱ्या प्राण्याचें खाद्य होऊन राहिला आहे. शास्त्रज्ञांनीं अशा प्रकारच्या अन्नशृंखला ( food-chains ) अनेक कल्पिल्या आहेत. झाडांच्या शिरांतून अनेक प्रकारचे रस वाहत असतात. त्या रसावर उपजीविका करणारे असंख्य लहान लहान उंवाप्रमाणें किडे असतात. या किड्यांना खाणारे कोळी व किडे आणि कोळी या दोघांना खाणारे शेंकडों पक्षी असा हा क्रम असतो. या लहानसान पक्ष्यांवर झडप घालणारे बहिरी ससाण्यासारखें आणखी पक्षी आहेतच. एखाद्या तळ्यांत एकपेशीय अशा अनेक वनस्पति असतात. त्या भक्षून कित्येक एकपेशीय प्राणी द्रुतगतीनें वाढत असतात. या प्राण्यांना खाणारे आणखी कांहीं मोठे मासे इतरत्र वावरतातच. त्या मोठ्या माशांना अन्नासाठीं पकडणारीं माणसें आहेतच. आपल्याकडील भावडा कोंढिबा शेतकरी संपूर्ण पीक हातीं यावें म्हणून हिवाळ्यांत भल्या पहांटे हां हूं ... करून गोफणीच्या साह्यानें कणसांवर बसणारीं पाखरें हाकून देत असतो. पण उन्हाळ्यांत जेव्हां पिकाची मळणी सुरू होते तेव्हां पक्षी हांकलून देऊनहि धान्य मात्र यावें तितकें त्याच्या पदरांत पडत नाहीं. बिचाऱ्या शेतकऱ्यास पीक खाणारे पक्षीच तेवढे आहेत असें वाटतें. पण आपणांवर टपून बसलेले पक्षी गोफणींतील धोंड्यांना भिऊन निघून गेले कीं असंख्य किड्यांना चांगलेंच फावतेना. आणि ते तर उभ्या पिकाची नासाडी करतात, धष्टपुष्ट होतात आणि भरमसाट प्रजावाढीमुळें पुनः व्हावयाचा तो धोका निर्माण होतोच. किड्यांची होणारी वाढ शेतावर असणाऱ्या पाखरांवर अवलंबून असते. पाखरें दाणें टिपतात त्याचप्रमाणें असंख्य किड्यांवर ताव मारून पिकाचें एक प्रकारें रक्षणच करितात. चार्लस डार्विननें गवत आणि म्हाताऱ्या बायका यांचा संबंध अतिशय विनोदी रीतीनें समजावून दिला आहे. तो म्हणतो गवताची वाढ होणें न होणें हें म्हाताऱ्या बायकांवर फार अवलंबून आहे. म्हणजे म्हाताऱ्या बायकांना मांजरें पाळण्याची हौस दांडगी असते. ही मांजरें उंदरावर ताव मारीत असतात. उंदीर मधमाशांना खाऊन टाकण्याच्या उद्योगांत असल्यामुळें मधमाशांच्या संख्येवर परिणाम होतो. आणि मधमाशा या गवतावरून त्या गवतावर हिंडत असल्यामुळें गवताच्या बीजप्रसारांचा उद्योग सतत करीत असतात. तेव्हां त्या माशा टिकवावयाच्या असतील तर उंदीर नकोत आणि उंदीर नष्ट होण्यासाठीं मांजरें हवींत व मांजरें असण्यासाठीं म्हाताऱ्या बाया हव्यातच.

अशा प्रकारें निसर्गांत वाढ आणि झीज एकसारखी चालू आहे. ही बेरीज वजाबाकी आहे म्हणून तर जग समतोल राहिलें आहे. हिरव्यागार गवतावर राहणारे कांहीं प्राणी आहेत तर या प्राण्यांवर जगणारे आणखी बलवत्तर प्राणी आहेत. हिरव्या गवतांत किंवा वनस्पतींत पुष्कळ

'अन्न' असतें. पाणी आणि कार्बनडायऑक्साइड यांच्या मदतीनें वनस्पतींत साखर निर्माण झालेली असते. सूर्यप्रकाशापासून त्यांना कार्यशक्ति (energy) प्राप्त झालेली असते. हे सर्व 'अन्न' वनस्पतींकडून शाकाहारी प्राण्यांना (herbivorous) मिळत असतें. वनस्पती खाऊन जगणाऱ्या प्राण्यांना पर्यायानें सूर्यापासूनच कार्यशक्ति प्राप्त झालेली असते. कांहीं प्राणी वर सांगितल्याप्रमाणें लहान लहान प्राण्यावर जगत असतात. म्हणजे वनस्पतींवर जगणारे प्राणी खाऊनच जगणारे कांहीं केवळ मांसाहारी प्राणी (carnivorous) असतात. आणि कांहीं प्राणी वनस्पतीहि खातात व मांसहि खातात. माणसाची जात या तिसऱ्या प्रकारची आहे. कांहीं प्राणी विशिष्ट प्रकारचेंच अन्न खातात. उदाहरणार्थ फुलपांखरें! ही कधींहि मधाशिवाय इतर पदार्थ खाणार नाहींत. अशाप्रकारें प्राणीच एकमेकांचें अन्न बनून राहिल्यामुळें निसर्गांतील वजाबाकी सतत चालू आहे.

बलिष्ठ जीवनार्थकलहांत टिकून राहतात याचा अर्थ त्यांना शत्रूच नसतात असें मात्र नाहीं. वनराज सिंहाला त्याच्यापेक्षां बलवत्तर असा त्याचें मांस खाणारा प्राणी नाहीं ही गोष्ट खरी, पण त्याला सतावून सोडणारे कितीतरी लहान लहान जीव सृष्टींत आहेत. परान्नपुष्ट होणारे असंख्य बारके बारके जीव सिंहाच्या आयाळींत त्याच्या अंगावरच्या केसांत अखंडपणें अक्षरशः चरत असतात. नाना प्रकारचे जीवजंतु खुशाल त्याचे अंगावर बागडून त्याचें रक्त शोषित असतात. हरीण वा गाय यांवर एकदम झडप घालून सिंह त्यांना मारून टाकीत असेल पण लहान लहान जीवजंतु त्याच सिंहास अक्षरशः लुटत असतात याकडे आपलें लक्ष जावयास पाहिजे. वनराज सिंह हा हिंस्र आहे तर जीवजंतु पक्के लुटारु आहेत. एक एकदम फडशा पाडतो तर दुसरे धीरे धीरे निकाल लावतात. आणि हा निकाल मोठ्या हुषारीनें म्हणजे यजमानाच्या अंगाखांद्यावर खेळूनच! आणि पुनः गंमत अशी कीं या जीवजंतूंच्या पोटांत राहून उपजीविका करणारे आणखी कितीतरी लहान जंतू! सिंहाच्या अंगावरील एखादी पिसू घ्या. तिच्या शरीरांत लहान जंतू परान्नपुष्ट (Parasite) असे असतातच. आणि या जंतूंत पुनः एकपेशीय प्राणी असतातच. हीं 'बांडगुळें' स्वतः जगतात आणि यजमानास ठार करतात. पुनः रात्रीं शोषण करणारे निराळे दिवसाचे निराळे!

वरील सर्व विवेचनावरून ध्यानांत येईल की निसर्गतःच सर्व प्राणी एकमेकांचें अन्न असल्यामुळें व जीवनासाठीं एकसारखा कलह सुरू असल्यानें निसर्गांत एकसारखी वजाबाकी सुरू आहे. म्हणूनच बेरीज झपाट्यानें वाढत असूनहि परिणाम भयंकर स्वरूपाचा होत नाहीं. सृष्टींत याच मार्गानें समतोलपणा राहात असतो. कधीं कधीं गंमतीचें वर्तुळहि निर्माण होतें. शेतावर गवत अतिशय माजलें कीं उंदरांना भरपूर खाद्य निर्माण होऊन ते पुष्ट होतात, आणि या पुष्टतेच्या पोटींच त्यांची प्रजाहि बेसुमार वाढते. यामुळें कोल्ह्यांची चंगळ होऊन त्यांना अन्न भरपूर मिळतें व त्यांचीहि प्रजा वाढते. व या वाढलेल्या प्रजेकडून मुळांत वाढलेल्या उंदरांची संख्या कमी होऊन समतोलपणा राखला जातो. आणि उन्हाळ्याच्या दिवसांत गवत संपलें कीं उंदरांचें खाद्य संपुष्टांत येतें. त्यामुळें त्यांची प्रजाहि मंदावतें आणि सहाजिकच मग कोल्ह्यांचें खाद्यहि कमी होतें, आणि पर्यायानें कोल्ह्यांची प्रजा थोडीच राहते. अशीं चक्रें निसर्गांत किती तरी फिरत असतात.

निसर्गाकडून होणाऱ्या या वजाबाकीस मनुष्यहि हातभार लावीत असतो. पक्ष्यांची, प्राण्यांची शिकार करणें, प्राणी-पक्षी परदेशीं पाठवणें, त्यांच्या संहाराची मोहीम काढणें, इत्यादि

प्रकारामुळें माणसानें प्राणीसंहार चालविला आहेच. आणि प्रत्येक प्राणी भक्ष्य म्हणूनच त्याला उपयोगीं पडतात. कांहीं प्राण्यांची हट्टानें पैदासहि माणूस करीत असतो. अर्थात् हे प्रयोग कधीं कधीं अंगावरहि येतात. आणि मग वन्य पशु-पक्ष्यांची कमतरता दिसूं लागतांच 'वाइल्ड लाइफ' दिन साजरा करण्याची मोहीम सुरू होते. प्रयोगासाठीं माकडें यापुढें परदेशीं पाठवावींत कीं नाहीं या गोष्टीचा गांभीर्यानें विचार सुरू होतो. पण मनुष्यकृत प्राण्यांतील बेरीज-वजाबाकी हा आपला विषय नसल्यानें येथें थांबणें इष्ट आहे.

---

# निसर्गांतील शस्त्रक्रियेच्या व स्वसंरक्षणाच्या कांहीं युक्त्या

लेखकः- **मा. ल. गद्रे** बी. एस्‌सी.

जन्माला आल्यापासून स्वसंरक्षण हें माणसाच्या मागें लागलेलेंच आहे. त्यासाठीं अतिप्राचीन काळापासून अनेक युक्त्या-प्रयुक्त्यांचें संशोधन तो करीत आला आहे. दगड, भाले, बुमरँग, धनुष्यबाण, तलवार यांसारख्या साधनांचा उपयोग त्यानें प्रथम केला. पुढें दारुगोळ्याचें युद्ध आलें, नंतर मशीनगन्स आल्या आणि नुकत्याच झालेल्या युद्धांतील अॅटम बॉम्ब हा ताजा शोध आणि हें सारें कां? तर आत्मसंरक्षण.

आणि हीच गोष्ट शस्त्रक्रियेचे बाबतींतील. ह्या कामीं तर मानवानें दूरचा पल्ला गांठला आहे. आजचें युग तर प्लॅस्टिक सर्जरीचें आहे. मनुष्य सुधारला, तो निसर्गाचीं रहस्यें उकलूं लागला. उत्क्रांतीच्या मार्गावरील प्राणिमात्रांत मनुष्यप्राणी वरच्या दर्जाचा व इतर प्राणी खालच्या दर्जाचे आहेत. तथापि इतर जीवसृष्टीहि ह्या बाबतींत खास कमी नाहीं. वनस्पति, प्राणी ह्यांनीहि स्वसंरक्षणाचे बाबतींत नानातऱ्हेच्या युक्त्या योजिल्या आहेत.

निसर्गांतील शस्त्रक्रियेचें उत्तम उदाहरण **हॉर्सचेस्टनट** ह्या झाडांत आपणांस पाहावयास मिळतें. जें पान गळून पडावयाचें, त्यांतील रस प्रथम संपून जातो. मग जोराच्या वाऱ्याबरोबर तें गळून पडतें. पान गळून पडण्यापूर्वी खोडावर त्या पानाचे देठाशीं एक प्रकारचा मऊ बिरदीसारखा भाग निर्माण होतो. हा भाग उघडा राहून कठीण बनतो. ह्यामुळें खोडाला बिलकूल इजा होत नाहीं व झाडावर तें गळून गेल्याची खूण सुद्धां शिल्लक राहात नाहीं.

वनस्पतींतच अशीं स्वसंरक्षक शस्त्रक्रियेचीं साधनें आहेत, असेंच नव्हे तर प्राण्यामध्येंहि तीं आढळून येतात.

**खेकडा** ज्या अवयवांनीं आपली हालचाल घडवून आणतो तें त्या भागांतील स्नायूंच्या आकुंचनानें तो तोडूं शकतो. हा अवयव तुटला कीं त्या ठिकाणाहून रक्त तर बाहेर येत नाहींच पण त्याच्या दोन्ही बाजूंस असलेल्या बॅन्डेजसारख्या पट्ट्या पुढें सरकून ती जखम तावडतोब झांकून टाकतात. त्यानंतर ह्या बॅन्डेजच्या आंतील बाजूस नवीन अवयव निर्माण होतो. तो अवयव खेकडयाच्या नवजीवनप्राप्तीबरोबरच बाहेर पडतो. प्रथम हा भाग नाजूक असतो परंतु नंतर तो कठीण बनत जातो. हें प्राण्यांतील शस्त्रक्रियेचें उत्तम उदाहरण आहे. मनुष्य ह्या बाबतींत अद्याप फारच दूर आहे.

**चक्रमत्स्य ( starfish )** हा एक ताऱ्यासारखा दिसणारा पाण्यांतील प्राणी आहे. एकादेवेळीं ह्याची एकादी भुजा इतरांपेक्षां लहान वाटते. ही गळून गेलेल्या भुजेचेऐवजीं नवीन भरपाई करणारी भुजा होय. भुजा दोन प्रकारांनीं तुटण्याचा संभव असतो. दुसऱ्या एखाद्या प्राण्याच्या तावडींत सांपडून किंवा एखाद्या दगडाखालीं सांपडून हा अवयव तुटला तरी चक्रमत्स्यास कांहींहि इजा होत नाहीं. कारण त्या अवयवाच्या सुरवातीस असलेल्या स्नायूंच्या आकुंचनामुळें हा अवयव अलगद दूर होतो, व रक्तशून्य शस्त्रक्रिया घडून येते.

**माखली cuttle fish** ह्या प्राण्याला तोंडाचे भागाभोंवतीं आठ किंवा दहा लांब लांब बोटासारखीं किंवा सोंडेसारखी गात्रें असतात. या गात्रांस शीर्षपाद असें म्हणतात. गात्रें दहा असल्यास त्यांपैकीं दोन फार लांब असतात. ह्या प्राण्यांना भक्ष्य पकडण्यास हीं गात्रें फार उपयोगीं पडतात. ह्या भुजांपैकीं एक तर सहजरीत्या तोडूं शकतो, कारण त्यामध्यें शुक्रजंतू ( sperms ) सांठविलेले असतात. हा भुज माखली सहजरीत्या आणि रक्तविहीन तोडूं शकतो ही निसर्गांतील शस्त्रक्रिया अजब नव्हे काय ?

शेतांत सांपडणारा **हार्वेस्टमन** लांबटांग्या हा कोळ्याच्या जातींतील प्राणी आहे. ह्याचे पाय त्याच्या शरीराचे मानानें वीसपट मोठे असतात. हा प्राणी जर आपल्या शत्रूच्या तावडींत सांपडला तर तो आपले पाय स्नायूंच्या आकुंचनामुळें तोडूं शकतो. हा तुटलेला पाय हार्वेस्टमनच्या लक्षांतसुद्धां येत नाहीं, कारण त्याच पायानें तो एखादा प्राणी पकडण्यास जातो. ही सुद्धां रक्तविहीन शस्त्रक्रिया आहे.

शस्त्रक्रियेचीं अशीं अनेक उदाहरणें प्राणी व वनस्पतींत आढळतात. निसर्गांतील स्वसंरक्षणाच्या युक्त्यादेखील अशाच अजब आहेत.

'**कांट्यावांचून गुलाब नाहीं...**' ही पंक्ति प्रसिद्धच आहे. हे कांटे गुलाबाला स्वसंरक्षण करण्यासाठींच आलेले आहेत. गुलाबाला जर कांटे नसते तर आतांपर्यंत असलें मोहक फूल औषधासहि उरलें नसतें. **केवड्याला कांटे** आहेतच. त्यामुळें त्याचा सुगंध दुरूनच आपल्याला हवासा वाटतो. शिवाय केवड्याच्या बनांत साप राहातात त्यामुळें आपणांस तें काढतां येणें कठीण. आणि असलें जबरदस्त स्वसंरक्षणाचें हत्यार जवळ असल्यावर केतकीस भिण्याचें कारणच नाहीं. **निवडुंगाचा** हिरवा पानासारखा दिसणारा भाग म्हणजे खोड. ह्या रंगामुळें प्राणी निवडुंगाकडे आकर्षिले जातात, परंतु निवडुंगास **कांटे** असतात आणि अशा प्राण्यास ते टोचतात. ह्याच मुळें निवडुंग आपलें संरक्षण करूं शकतो.

वनस्पतींचें स्वसंरक्षणाचे इतरहि कांहीं प्रकार आहेतच. कांहीं वनस्पतींच्या **विशिष्ट वासानें** त्या आपलें संरक्षण करतात. **सब्जा, लिंबू , तुळस, घाणेरी** ह्या वनस्पति त्यांच्या विशिष्ट वासानें आपलें रक्षण करण्याचे कामीं समर्थ होतात.

कांहीं वनस्पतींत **विषारी पदार्थ** असतात. **अफू, पिवळा धोत्रा, रुई** हे पदार्थ पोटांत गेल्यावर मनुष्यावर मृत्यु ओढवेल. प्राण्यांचीहि तीच गत.

वनस्पतींतच अशीं स्वसंरक्षक साधनें आहेत असें नव्हे, तर प्राण्यांमध्येंहि तीं आढळून येतात ही गोष्ट पुढील लेखावरून ध्यानांत येईल.

**रिक्तोदर अथवा रिक्तमध्य प्राणी ( Coelen terata )** म्हणून कणा नसलेल्या प्राण्यांचा एक वर्ग आहे. उत्क्रांतीच्या दृष्टीनें हे प्राणी अगदीं खालचे थरांतील होत.

यांच्या पिशवीसारख्या शरीरास बाहेरील व आंतील अंग असे पेशींचे दोन निरनिराळे थर असतात व ह्या दोन थरांच्या मधील जागेंत एक तिसरा थर असतो. ह्यांतून अधून मधून एक प्रकारच्या **दंशपेशीहि** निर्माण होत असल्याचें आढळतें. ह्या दंशपेशी क्षोभशील असून बंदुकीच्या घोडयाप्रमाणें होत. ह्यांकडून प्रेरणेचें कार्य घडून येतांना दिसतें. ह्यांतून दंशतीर लांब फेंकला जाऊन तो परतहि घेतला जातो. अस्त्राची प्रेरणा करून अस्त्र परत काढून घेण्यांतलाच हा प्रकार म्हणतात. **हायड्रा ( जलव्याल ), जेली फिश, समुद्र पुष्प, प्रवाल कीटक** हे सर्व प्राणी या वर्गांत मोडतात.

आता **विंचू.** विंचवाला वाळवंट किंवा कोरडया जागा फार पसंत. हे प्राणी निशाचर व भटके असतात. ते दिवसा आडोशासाठीं दगडाआड लपून बसतात. हे कोळ्याच्या जातींतील असून ह्यांना आठ पाय असतात. ते आपल्या शेपटीच्या साहाय्यानें चालूं शकतात. विंचू हा प्राणी दिसावयाला उग्र असतो. त्यांना पाणी जास्त लागत नाहीं. शत्रूचें रक्त त्यांची पाण्याची तहान भागवण्यास पुरेंसें असतें. नवीन प्राणी निर्माण होण्याअगोदरच्या सर्व अवस्था मादीच्या पोटांतच घडून येतात. नवीन जन्माला आलेले प्राणी म्हणजे त्यांच्या आईवडिलांच्या छोट्याशा मूर्तीच असतात. ' विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर ' अशी जो म्हण आपल्याकडे आहे ती विंचवाच्या अंगावर असलेल्या पिलांवरूनच आलेली आहे. ह्या सर्व पिल्लांच्या अंगावरून मादीची नांगी गेलेली असते. त्यामुळें त्यांचें संरक्षण होतें. विंचवाच्या **नांगीची** मोठी गंमत असते. कारण ही नांगी शेपटाकडून वळून पाठीवरून पुढें तोंडाच्या भागापर्यंत आलेली असते. जर एखादा प्राणी विंचवाला त्रास देऊं लागला तर तो प्राणी विंचू आपल्या चिमट्यासारख्या असलेल्या अवयवांत पकडतो. नंतर नांगीनें विंचू त्या प्राण्याला इजा करतो. नंतर त्याचें सर्व रक्त शोषून घेतो. नांगीच्या सुरुवातीसच दोन विषानें भरलेल्या गांठी असतात व ह्यांतून नांगीला विषाचा पुरवठा होतो. एखादे वेळीं त्यांतील विष संपलें तर पुनः त्यांत विष निर्माण होतें.

स्वसंरक्षणाप्रमाणेंच **जातिसंरक्षणाचे** कामींहि एवढ्या युक्त्या-प्रयुक्त्या योजल्या जातात कीं, मन गुंग होऊन जातें. **मुंग्या** व **गांधीलमाशा** ह्यांच्यामध्यें ही गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येतें. जातिसंरक्षणाचे कामीं त्या आपलें बलिदान करतील. हें खरें देशभक्तीचें वा राष्ट्रप्रेमाचें उदाहरण म्हटलें पाहिजे. मात्र त्यासाठीं कोणी फंड उभारत नाहीं अथवा पुतळे उभारत नाहीं.

• **मधमाशीची नांगी** ही तिच्या पोटाच्या शेवटाकडे असते. ही नांगी वास्तविक पाहतां अंडीं घालण्याचें साधन परंतु त्याचें रूपांतर स्वसंरक्षणाचे कामीं झालेलें आढळतें. राणीमाशा, कामकरी माशा ज्या वांझ असतात त्या नांगी मारून इतरांपासून आपलें रक्षण करतात. ह्याचप्रमाणें **मादी मुंगी** हिलासुद्धां अशीच नांगी असते व ती तिच्या रक्षणाचें एकमेव साधन होय. नांग्या ह्या विषारी असतात व त्यांचें विष **फॉर्मिक ॲसिड व इतर दाहक पदार्थ** ह्यांपासून बनलेलें असतें, ह्या विषबाधेच्या जखमेंतून रोगजंतूंचा आयताच शिरकाव होतो. व जखमेला अधिकच तीव्र स्वरूप प्राप्त होतें.

**डांस:** ह्याला प्राणीराज्यांतील डॉक्टरच म्हटलें पाहिजे. आपल्या सुईसारख्या अवयवानें तो अनेक इंजेक्शनें करतों, ही इंजेक्शनें तो विनावेतन करतो. डिग्री नाहीं, डिप्लोमा नाहीं, पाटी नाहीं तरी त्याचें कसब थोडेंच दडणार ? डांसाचा दुष्टपणा वजा केला तर त्याचें कौशल्य मात्र वाखाणण्यासारखें आहे. डांस ही मूर्ति आपणांस लहान दिसली तरी तिची कीर्ति फार मोठी आहे.

तो आपलें रक्त पिऊन जगतो म्हणून, आपण त्याला दुष्ट म्हणतो एवढेंच ! डांसाची लान्सेटसारखी नैसर्गिक हत्यारें पाहिलीं म्हणजे त्याच्या तीक्ष्ण व नाजुक शस्त्रांचें कौतुक वाटतें.

**सुरवंटाचें** शरीरावर झुपकेदार केस असतात. आणि त्याच्या शेपटीवर तर ह्या केसांची अधिकच गर्दी झालेली असते. त्यामुळें सरडा, पाल ह्यांसारखे प्राणी त्याला शक्यतोंवर खात नाहींत, परंतु चुकून ते जर त्याच्या वाटेला गेले तर हा प्राणी आपले शेपटीवरील केस त्या प्राण्याच्या अंगावर टाकतो व त्यामुळें सरडा, पाल, अतिशय हैराण होतात व त्याच्या वाटेला सहसा कधीहीं जात नाहींत.

**स्लोवर्म :** ह्या प्राण्याला हातपाय नसतात असें आपणांस वाटतें परंतु ते आपणांस दिसत नाहींत एवढेंच. ह्या सरपटणाऱ्या प्राण्याची लांबी एक फूट असते, परंतु शेपटीच अर्ध्या फुटाहून लांब असते. जेव्हां हा प्राणी दुसऱ्याच्या तावडींत सांपडतो तेव्हां तो आपली शेपटी स्नायूंच्या आकुंचनानें तोडून टाकतो. नंतर हे दोन्ही भाग वळवळ करूं लागतात. त्यामुळें शत्रूला प्रथम कोणत्या भागाचें भक्षण करावें हें समजत नाहीं. प्रथम शेपटी वळवळ करावयाची थांबते व ती तो प्रथम खाऊन टाकतो. एवढ्या अवधींत मूळ प्राणी निघून जातो. ही ह्या प्राण्याची एकप्रकारची गनिमी काव्याची पद्धत असूं शकेल. हें रक्तविहीन शस्त्रक्रियेचें तसेंच स्वसंरक्षणाचें उत्तम उदाहरण आहे.

**पालीच्या** शेपटीची वळवळ पुष्कळांनीं पाहिली असेल. जातां जातां शेपटीचें थोडेंक टाकून पुढें जावें व शत्रूची फसगत करावी ही अक्कल पालीला कोठून आली कोण जाणे ! ' चुक् चुक् ' आवाज काढून शत्रूपुढून ती केव्हांच पसार होते. पालीच्या शेपटीवर अनेक नाजूक भाग असतात. त्या ठिकाणींच ती आपली शेपूट तोडूं शकते. ही शेपटी अनेक मणक्यांची बनलेली असते. आणि ह्यांतील कांहीं मणके कूर्च्यांच्या गिरदीसारख्या मऊ थरानें विभागलेले असतात, आणि ह्याच ठिकाणीं ती आपलें शेपूट तोडूं शकते. तुटलेल्या जागीं तिला परत शेपूट येतें.

**माखली :** हा प्राणी आपल्या शरीरांतील एका ग्रंथीपासून काळा रंग पाण्यांत सोडून आपला बचाव करतो. आत्मसंरक्षणाची ही युक्ति नुकत्याच संपलेल्या जागतिक युद्धांतील धुराच्या पडद्याप्रमाणेंच होय.

वनस्पती व प्राणी ह्यांमधील शस्त्रक्रिया व स्वसंरक्षणाच्या युक्त्या पाहिल्या कीं मानवानें फार मोठी प्रगति केली कीं नाहीं याविषयीं संदेह निर्माण होतो. प्राणिमात्रांपासून माणसांस पुष्कळच शिकण्यासारखें आहे. प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांमधील आधुनिक संशोधन प्रगति-पथावरील पुढील टप्पा गांठण्यास मोठा हातभार लावील यांत शंका नाहीं.

---

## ' नव्या जगाचीं बीजें '

लेखक :—**पुरुषोत्तम विष्णु जोशी,** ज्युनिअर बी. एस्सी.

आकाशींच्या जीवनधारा आतां बाष्पीभूत झाल्या आहेत. काळ्या आईचा मोहक शालू गुरांनीं खाल्ला आहे, माणसांनीं तुडविला आहे. अगदीं चिंधड्या चिंधड्या उडाल्या आहेत त्याच्या. पण त्याची खंत कोणालाच नाहीं.

तिच्या-स्कंधावर लोळावं, खेळावं, पहुडावं असं मुलींसुद्धां वाटत नाहीं आहे. शिणलेलीं, दमलेलीं, श्रमलेलीं, श्रान्त झालेलीं गात्रें उत्साहानें-उल्हासानें पुनरपि पुलकित व्हावी म्हणून तिच्या

अंकावर क्षणभर जरी टेकवलींस तर-? तर काय होईल ? आलेला थकवा जाणार तर नाहींच, पण वाढेल मात्र; तिच्या जर्जर झालेल्या अस्थीमुळें.

तिच्या अंका-स्कंधावर खेळलेल्या, वाढलेल्या, पोसलेल्या वर्षीय वनस्पतींचें शैशव लोपलें आहे. त्याचा गृहस्थाश्रम सरला आहे. त्यांचे नेत्र पैलतीरी लागले आहेत. ये, मृत्यो ये. खरंच ये. अगदीं असशील तसा ये. डमरू डमडवीत आलास तरी चालेल. शंख फुंकीत आलास तरीहि चालेल. शूल खणखणवीत आलास तरीसुद्धां चालेल. तुझ्या मनाला वाटेल तसा ये. पण ये. त्यांनीं मृत्यूची आळवणी चालविली आहे.

मृत्यूनें यावें अन् घेऊन जावें यासाठीं त्या एवढ्या अगतिक अन् अधिऱ्या कां झाल्या. आहेत ? देवाजीनें दिलेल्या, पुन्हां कधींहि न लाभणाऱ्या सुंदर नी सुरेख जीवनाचा त्यांना कां वीट आला आहे ?

छट्. छट्.

म्हणें छट् छट् ! जीवनाचा वीट नाहीं आला तर मग त्यांना झालें आहे तरी काय ? जीवनाचा जर त्यांना वीट आला नाहीं म्हणतां तर हा विराग कशासाठीं नी काय म्हणून ? काय आहे त्याचें उद्दिष्ट ? काय आहे त्याचा उद्देश ? काय आहे त्याचा हेतु ?

थांबा, थांबा. सांगतों ना !

